# ऐतिहासिक पर्यटन

**(Multidisciplinary Approach)**

सर्व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त-(E-Book)




**डॉ. एस. आर. कट्टीमनी**

[एम.ए., बी.एड., नेट, सेट, पीएच.डी.(इतिहास), बी.जे.एम.एस., एम.बी.ए., एम.ए.(इंग्रजी), डी.एस.एम.]

इतिहास विभाग प्रमुख

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# ऐतिहासिक पर्यटन

## (E-Book)

**डॉ. एस. आर. कट्टीमनी**

[एम.ए., बी.एड., नेट, सेट, पीएच.डी.(इतिहास), बी.जे.एम.एस., एम.बी.ए.,

एम.ए.(इंग्रजी), डी.एस.एम.]

इतिहास विभाग प्रमुख

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

**सिद्धार्थ प्रकाशन, कोल्हापूर...**

ISBN – 978-93-5980-293-0

**प्रकाशक :**

सिद्धार्थ प्रकाशन, कोल्हापूर

29/4 , साने गुरुजी गृह रचना वसाहत ,

प्रज्ञापुरी रुईकर कॉलनी,

कोल्हापूर .416005

भ्रमणध्वनी : 9860090689

siddharthkattimani@gmail.com

© **डॉ. एस. आर. कट्टीमनी**

**(E-Book) सप्टेंबर, 2023**

**अक्षरजुळणी :**

सुपर ऑफसेट, कोल्हापूर.

**किंमत: ₹ 70 /-**

# ऐतिहासिक पर्यटन

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| | ग्रंथासंबंधी थोडेसे | 1-2 |
| | ऋणनिर्देश | 3 |
| | अभ्यासक्रम | 4 |
| 1. | पर्यटन : व्याख्या, उत्पत्ती व व्याप्ती | 5-11 |
| 2. | पर्यटनाचे प्रकार | 12-20 |
| 3. | भारतीय पर्यटनाचा ऐतिहासिक आढावा | 21-29 |
| 4. | भारतातील काही ऐतिहासिक मंदिरांचा पर्यटनाच्या दृष्टीने अभ्यास | 30-43 |
| 5. | महाराष्ट्रातील काही किल्ल्यांचा पर्यटनाच्या दृष्टीने अभ्यास | 44-63 |
| 6. | परिशिष्टे | 64-68 |
| | संदर्भसाधने | 69 |

## ग्रंथासंबंधी थोडेसे ...

**ऐतिहासिक पर्यटन या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे. कारण जगातील ऐतिहासिक वास्तूंची संख्या अमर्याद असल्याने त्या सर्वांचा अभ्यास करणे कठीण आहे. ऐतिहासिक पर्यटन या विषयाला आर्थिक महत्त्व प्राप्त झाले असल्याने या विषयाचे आगळे महत्त्व विशद करता येईल. पर्यटन हा एक बहुआयामी व्यवसाय असुन आधुनिक युगामध्ये कोणीही व्यक्ती, समाज वा देश यापासून विलुप्त राहू शकत नाही.**

**व्यक्तीला आपल्या पूर्वजांच्या ऐतिहासिक बाबींची, घटना घडामोडींच्या माहिती बाबतची उत्कंठा असते. यातूनच ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळते. ऐतिहासिक पर्यटनामध्ये किल्ले, लेण्या, मंदिरे, मुर्त्या, राजवाडे, वस्तुसंग्रहालये व इतर ऐतिहासिक वास्तूंना भेटी दिल्या जातात.**

**भारत हा ऐतिहासिक वारशाच्या दृष्टिकोनातून समृद्ध असा देश आहे. प्राचीन काळापासून आत्तापर्यंत विविध राजवटींच्या कालखंडातील असंख्य ऐतिहासिक इमारती, राजवाडे, किल्ले, मंदिरे, लेण्या भारतात आजतागायत जतन झालेले आहेत. म्हणूनच देश-विदेशातून लाखो पर्यटक प्रतीवर्षी भारतामध्ये ऐतिहासिक दृष्ट्या पर्यटन करत असतात.**

**ऐतिहासिक पर्यटनावर रस्ते, वाहतुक व दळणवळणाची साधने, निवासस्थाने व पर्यटन संस्था या सर्व बाबींचा प्रभाव पडत असतो. उपरोक्त बाबींची उपलब्धता ही ऐतिहासिक पर्यटनाच्या वाढीला व भरभराटीला मदत करते. शासनाकडून पर्यटन व्यवसायाला दिलेली चालना महत्त्वाची ठरते. ज्यामध्ये सुलभ पासपोर्ट व Visa, पर्यटकांच्या जीवित व वित्ताच्या संरक्षणाची हमी, सरकार मान्यता असलेल्या पर्यटन संघटना, रस्ते, प्रवासाची साधने, हॉटेल्स व निवासस्थाने यांचा समावेश होतो.**

थोडक्यात ऐतिहासिक पर्यटन हा पर्यटन व्यवसायाचा महत्त्वपूर्ण अंग असून ज्याव्दारे परकीय चलन प्राप्त होते व देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढण्यास मदत होते.

भारतीय ऐतिहासिक पर्यटनाचा आढावा विद्यार्थ्यांनी घ्यावे व त्यायोगे भारताच्या गौरवशाली इतिहास व वास्तू स्थापत्यांचा सखोल अभ्यास व्हावा या उद्देशाने या संदर्भ पुस्तकाची निर्मिती केली आहे.

डॉ. एस. आर. कट्टीमनी

# ऋणनिर्देश...

ऐतिहासिक पर्यटन हा माझ्या ग्रंथलेखन अनुभवाच्या पुष्पातील चतुर्थ पुष्प असून याचे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे ऑनलाईन पद्धतीने हा ग्रंथ विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करून दिला आहे. सध्याचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग आहे. ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी इंटरनेट वरील विविध संदर्भाचे अवलोकन करून विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याची प्रवृत्ती जडली असल्याने लेखकाने इंटरनेटवर प्रस्तुत ग्रंथ मोफत उपलब्ध करून दिला आहे. ऐतिहासिक पर्यटनाचे आकलन योग्य पद्धतीने होण्यासाठी योग्य तिथे नकाशे, फोटो व परीशिष्टांचा वापर केला आहे.

माझ्या पहिल्या तीन ग्रंथलेखनाचा अनुभव पाठीशी बांधून 'ऐतिहासिक पर्यटन' हा स्पर्धा परीक्षेसाठीचा उपयुक्त ऑनलाईन ग्रंथ विद्यार्थ्यांच्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे. याप्रसंगी ज्यांच्या प्रेरणांनी मला पुस्तक लिहिण्यासाठी उद्युक्त केले अशा सर्वांचे ऋणनिर्देश करणे मी माझे परमकर्तव्य मानतो.

प्रस्तुत संदर्भग्रंथाचे लेखन करताना मला विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य मा. डॉ. आर. आर. कुंभार सरांचे खूप मोलाचे सहकार्य लाभले. विवेकानंद कॉलेजच्या ग्रंथालयातील श्री. राजू साळुंखे यांच्या सहकार्यामुळे ग्रंथ लेखनाचे कार्य व्यवस्थित होऊ शकले. तसेच मराठी विभागातील माझे सहकारी डॉ. स्वप्निल बुचडे यांनी या संदर्भग्रंथाचे मुद्रितशोधन केले, ज्यामुळे संदर्भ ग्रंथाची मांडणी अचूक पद्धतीने आपल्यापुढे मांडता आली. महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या प्रमुख डॉ. श्रुती जोशी मॅडम यांच्या मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळेच संदर्भ ग्रंथ लिखाणाचे कार्य साध्य होऊ शकले. अक्षर जुळवणीचे काम सुपर ऑफसेटचे श्री. विजय बिराजदार यांनी पूर्ण केले. या सर्वांनी केलेल्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदतीमुळेच ग्रंथ लेखनाचे कार्य पूर्ण होऊ शकले या सर्वांचा मी आभारी आहे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कुटुंबप्रमुख व आमचे आधारस्तंभ आदरणीय कार्याध्यक्ष माननीय प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी माननीय प्राचार्य सौ. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कौस्तुभ गावडे यांच्या प्रेरणेमुळे व सहकार्यामुळे प्रस्तुत ग्रंथ लेखनाचे कार्य पूर्ण झाले.

माझ्या शैक्षणिक संदर्भ ग्रंथातील हे चौथे व ऑनलाईन पुष्प गुंफताना मला खूप आनंद होत आहे. उपरोक्त सर्व सहकाऱ्यांच्या व वरिष्ठ मान्यवरांच्या ऋणामध्ये कायमचे असण्यात मी धन्यता मानतो.

माझी आई जगदेवी, वडील राजकुमार, पत्नी सौ. दीपा, चि. अथर्व व चि. आदित्य या सर्वांच्या शुभेच्छा ह्या ग्रंथाच्या लेखनासाठी प्रेरणा असल्याने ह्या सर्व कुटुंबीयांचे मी मनोनित ऋणी राहीन.

**डॉ. एस. आर. कट्टीमनी**

1 सप्टेंबर, 2023

# ऐतिहासिक पर्यटन

## अभ्यासक्रम

**प्रकरण 1: पर्यटन: व्याख्या, उत्पत्ती व व्याप्ती**

- अर्थ , व्याख्या , पर्यटनाचे हेतू
- जागतिक पर्यटन संघटना
- पर्यटनाचे महत्व
- पर्यटनाचे फायदे व तोटे

**प्रकरण 2. पर्यटनाचे प्रकार**

- भारताच्या पर्यटन आकर्षणाची कारणे
- पर्यटनाचे प्रकार

**प्रकरण 3. भारतीय पर्यटनाचा ऐतिहासिक आढावा**

- प्राचीन भारतीय पर्यटन
- मध्ययुगीन भारतीय पर्यटन
- आधुनिक काळातील पर्यटन
- स्वातंत्र्योत्तर भारतीय पर्यटन

**प्रकरण 4. भारतातील काही ऐतिहासिक मंदिरांचा पर्यटनाच्या दृष्टीने अभ्यास**

- तिरुपती तिरुमला - बालाजी मंदिर
- पंढरपूरचे विठ्ठल मंदिर
- दख्खनचा राजा ज्योतिबा

**प्रकरण 5. महाराष्ट्रातील काही किल्ल्यांचा पर्यटनाच्या दृष्टीने अभ्यास**

- किल्ले जंजिरा
- किल्ले रायगड
- दौलताबाद / देवगिरीचा किल्ला

**प्रकरण 6. परीशिष्टे:**

## प्रकरण 1.

## पर्यटन: व्याख्या, उत्पत्ती व व्याप्ती

**प्रस्तावना :**

विसाव्या शतकाच्या शेवटी जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण यामुळे समाजजीवनाच्या सर्वच बाबींमध्ये बदल झालेले आहेत. एकविसावे शतक हे पर्यटनाचे शतक म्हणून ओळखले जाते. म्हणूनच आजच्या या धावपळीच्या जीवनामध्ये पर्यटनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. व्यक्ती समाज व कुटुंबाच्या दृष्टिकोनातून पर्यटन महत्त्वाचे मानले गेले आहे. परंतु बदलत्या परिस्थितीमध्ये पर्यटन हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरदेखील महत्त्वाचे मानले गेले आहे.

प्रवास ही एक दमछाक करणारी आणि अवघड गोष्ट असली तरी ती एक ही एक ज्ञानात्मक व मनोरंजनात्मक क्रिया देखील आहे. पर्यटन व्यक्तीचा थकवा दूर करते. तसेच, एखाद्या ठिकाणची संस्कृती, जीवनशैली आणि परंपरा जाणून घेण्याचा हा एक सोपा मार्ग आहे.

वेगवेगळ्या देशातील विभिन्न राजकीय, आर्थिक व धार्मिक परिस्थिती असलेल्या गोष्टींची नोंद करण्यासाठी ज्ञान प्राप्तीसाठी व संशोधनासाठी म्हणून पर्यटन केले जाते. पर्यटनामुळे देशाला परकीय चलन प्राप्त होते. देशाची अर्थव्यवस्था गतिमान राहते व विकासाला चालना मिळते.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळामध्ये व्यक्तीच्या विकासासाठी, समाज जीवनाला गतीशील बनविण्यासाठी व राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पर्यटनाची आवश्यकता आहे. आधुनिक काळामध्ये बदलत्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय वातावरणामुळेही पर्यटनाची आवश्यकता वाढत आहे.

आजच्या धकाधकीच्या दैनंदिन जीवन शैलीमध्ये व्यक्तीला नानाविध प्रकारची कामे करावी लागतात. त्या कामाचा व्यक्तीच्या शरीर व मनावर परिणाम होतो अथवा दैनंदिन कामाचा कंटाळा येतो. अशा परिस्थितीमध्ये नवीन बदल व्यक्तीला हवा असतो त्यासाठीच पर्यटन आवश्यक समजले जाते. मानवी मनामध्ये प्रेरणा, उत्साह, चैतन्य, निर्माण करावयाचे पर्यटन हे एक महत्त्वाचे माध्यम समजले जाते. व्यक्ती आणि समाजामध्ये जाणीवपूर्वक स्थायी व सकारात्मक बदल करण्याचे प्रबावी साधन म्हणजे पर्यटन होय. त्यामुळेच जागतिक स्तरावर पर्यटनाचा विचार करीत असताना उदयोगधंद्यानंतर दुसरे महत्वाचे स्थान पर्यटन व्यवसायाला देण्यात आलेले आहे.

**पर्यटनाचा अर्थ व व्याख्या:**

आपल्या राहत्या गावापासून/ शहरापासून विशिष्ट गावापर्यंत किंवा शहरापर्यंत व्यक्ती प्रवास करते या प्रक्रियेला पर्यटन म्हटलेले नाही. यावरून पर्यटनामध्ये फक्त प्रवास करणे अभिप्रेत नाही तर व्यक्तीने एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणाला/ शहराला भेट दिल्यानंतर तेथील ऐतिहासिक घटनांचे, स्मारकाचे निरीक्षण करणे, सामाजिक आणि संस्कृतिक गोष्टींची ओळख करून होणे अपेक्षित आहे. थोडक्यात, अज्ञानातून नवीन ज्ञानाची माहिती करून होण्यासाठी व्यक्तीचा जो प्रवास होतो त्या प्रक्रियेला ‘पर्यटन’ असे म्हटले जाते. प्रवासामध्ये विशिष्ट शहराला अथवा ठिकाणाला भेट दिल्यानंतर व्यक्तीला विविध गोष्टींची माहिती मिळते. त्या माहितीचा व्यक्तीच्या प्रगतीमध्ये निश्चितपणे उपयोग होतो .

त्या ज्ञानाच्या आधारावरच विविध स्वरुपाची प्रगती साध्य करण्याची नवीन दृष्टी मानवाला प्राप्त होते, यामुळेच पर्यटनाचे महत्त्व आज सर्वांनीच जाणले आहे. आजच्या आधुनिक काळामध्ये विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासानंतरही कोणतीही व्यक्ती, समाज व राष्ट्र पर्यटनापासून अलिप्त राहू शकत नाही. पर्यटन व्यवसायाचे महत्त्व जाणून घेवून त्याचा योग्य पद्धतीने विकास घडवून आणण्यासाठी जागतिक, राष्ट्र व राज्य पातळीवर कार्य करणाऱ्या विविध संस्था आणि संघटनांची निर्मिती झाली आहे.

पर्यटक या शब्दाला इंग्रजीमध्ये Tourist असे म्हंटले जाते. ज्याचा लॅटिन भाषेमध्ये Tornus असे म्हंटले जाते. पर्यटनाला इंग्रजीमध्ये Tourism असे म्हटले जाते. Tourism हा शब्द लॅटिन भाषेतील Tornus या शब्दापासून तयार झाला आहे. Tourn याचा अर्थ Journey / प्रवास असा होतो. थोडक्यात नवीन स्थळासंदर्भातील माहिती घेणे, अभ्यास करणे तसेच आनंद व मनोरंजनासाठी नव्या स्थळांना भेटी देणे या गोष्टींसाठीचा झालेला प्रवास यामध्ये अंतर्भूत आहे.

पर्यटन हा एक बहुआयामी आणि गतिमान उद्योग आहे. विविध दृष्टीकोन आणि संदर्भानुसार पर्यातानाच्या विविध व्याख्या आहेत. यापैकी पुढील काही पर्यटनाच्या सामान्यतः स्वीकृत व्याख्या आहेत:

1. लीग ऑफ नेशन्सच्या मते, "एखाद्या देशाला भेट देणारी व कमीत कमी 14 तास वास्तव्य करणारी कोणतीही व्यक्ती म्हणजे परदेशी पर्यटक होय."
2. कार्डीफ पर्यटन संस्थेच्या अनुसार, "एखाद्या व्यक्तीने घराबाहेर ऐच्छिक व ठराविक केलेली क्रिया म्हणजे पर्यटन होय. या प्रक्रियेमध्ये त्या व्यक्तीने घराबाहेर मुक्काम केला किंवा नाही या गोष्टीला महत्त्व नाही."
3. ऑक्सफर्ड शब्दकोशानुसार,"जो उत्कंठेपायी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी किंवा गमतीजमतीसाठी अथवा मी प्रवास केला आहे हे सांगण्यासाठी भ्रमंती करतो त्यास पर्यटक असे म्हणतात."
4. आयसेटनुसार, "लोकांनी आपल्या घराबाहेर आपल्या इच्छेनुसार केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय."
5. हर्मर यांच्या मते, "परदेशी माणसाचे एखाद्या देशात, प्रदेशात वा शहरात आगमन, वास्तव्य, भ्रमंती आणि तेथून जाणे म्हणजे पर्यटन होय."
6. हरमन श्यूलर्ड, "पर्यटन म्हणजे असा एक आर्थिक कार्यक्रम की, ज्यात लोकांचा प्रत्यक्ष देशांतर्गत, किंवा परदेशी प्रवास, वास्तव्य, भ्रमंती व हालचाल यांच्याशी संबंध आहे."
7. Swiss Professors, Hunziker and Krapt, and adopted by the International Association of Scientific Experts on Tourism (IASET) aptly describes the concept of tourism: "Tourism is the sum of phenomena and relationships arising from the travel and stay of non-residents, in so far as they do not lead to permanent residence and are not connected with any earning activity."

थोडक्यात, "पर्यटन म्हणजे व्यक्तींचे राहत्या ठिकाणापासून इतर ठिकाणी केलेले अल्पकालीन स्थलांतर होय."

**पर्यटनाचे हेतू / उद्दिष्टे :**

• आनंद मिळवणे
• अभ्यास व संशोधन करणे
• देवी देवतांचे दर्शन करणे
• करमणूक व मनोरंजन करणे
• देशाचा इतिहास व संस्कृती समजून घेणे
• शिक्षण घेणे
• ऐतिहासिक कला स्थापत्य व मूर्ती कलांची पाहणी करणे
• व्यापार, वाणिज्य व व्यवसायातून पर्यटन करणे
• आरोग्याच्या सोयी सुविधा मिळवण्यासाठी पर्यटन करणे

**जागतिक पर्यटन संघटना (World Tourist Organization):**

दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा पर्यटन विकासाला मोठा धक्का बसला. ज्यामुळे लोकांचे प्रचंड नुकसान झाले. हळूहळू जागतिक अर्थव्यवस्थेत सुधारणा होऊन पर्यटनाने उद्योगाचे रूप धारण केले. UNO ने जागतिक पर्यटन संघटनेची स्थापना 1946 मध्ये जागतिक पर्यटनाच्या नियोजित विकासासाठी केली. काळाच्या ओघात पर्यटनाचे जागतिक महत्त्व लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने 1 नोव्हेंबर, 1975 रोजी युनायटेड नेशन्स वर्ल्ड टुरिझम ऑर्गनायझेशन (UNWTO) अशा नव्या नावाने ह्या संघटनेचे कार्य सुरु केले आहे. UNWTO चे मुख्यालय स्पेन देशातील 'माद्रिद' येथे आहे. UNWTO द्वारे जबाबदार, शाश्वत आणि सर्वसुलभ जागतिक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाते. जगभरातील 160 देश हे UNWTO चे सदस्य राष्ट्र असून या संघटनेद्वारे निर्माण केलेले कायदे हे जगातील सर्व पर्यटन संघटनांना बंधनकारक आहेत. 1980 पासून संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक पर्यटन

संघटनेने 27 सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन दिन म्हणून साजरा केला आहे. तेंव्हापासून 27 हा सप्टेंबर हा जागतिक पर्यटन दिवस म्हणून ओळखला जातो.

**काही आंतरराष्ट्रीय पर्यटन संघटना व त्यांची मुख्यालये**

| अ. क्र | पर्यटन संघटना | पर्यटन संघटनेचे नाव | स्थापनेचे वर्ष | मुख्यालय |
|---|---|---|---|---|
| 1 | IATA | आंतरराष्ट्रीय विमान परिवहन संघटना | 1945 | हवाना (क्यूबा) |
| 2 | ETC | यूरोपियन प्रवास आयोग | 1948 | ब्रसेल्स (बेल्जियम) |
| 3 | PATA | पॅसिफिक एशिया प्रवास संघटना | 1951 | बॅंकॉक (थायलंड) |
| 4 | UNWTO | संयुक्त राष्ट्र जगातिक पर्यटन संघटना | 1975 | माद्रिद (स्पेन) |
| 5 | ETOA | यूरोपियन पर्यटन चालक संघटना | 1989 | ब्रसेल्स आणि लंडन |
| 6 | CTO | कॅरिबियन पर्यटन संघटना | 1989 | ब्रिजटाऊन, बार्बाडोस |
| 7 | WTTC | जागतिक प्रवास आणि पर्यटन परिषद | 1990 | लंडन (UK) |
| 8 | APTA | एशिया-पॅसिफिक पर्यटन संघटना | 1995 | कार्य क्षेत्रातील सदस्य देशांच्या माध्यमातून काम करते |
| 9 | SATSA | दक्षिण आफ्रिका पर्यटन सेवा संघटना | 2000 | इलोवो, जोहान्सबर्ग, दक्षिण आफ्रिका |
| 10 | WTCF | वैश्विक पर्यटन शहर संघटना | 2012 | बिजींग (चीन) |
| 11 | ATB | आफ्रिकन पर्यटन मंडळ | 2018 | Cape Town, South Africa |

**पर्यटनाची व्याप्ती:**

आधुनिक काळातील विज्ञान व तंत्रज्ञानातील बदलांमुळे जगभरात प्रवास व पर्यटन करणे सोपे व कमी त्रासाचे झाले आहे. पर्यटनासंदर्भातील व्यक्तींच्या विचारशैलीत विविध कारणांनी बदल होत चालले असून यामुळे पर्यटनाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. आधुनिक काळात खालील काही कारणांनी पर्यटनाच्या व्याप्तीमध्ये वाढ होत चालल्याचे दिसून येते.

1. औद्योगिक क्रांती:

   औद्योगिक क्रांतीने वाहतूक आणि पायाभूत सुविधांमध्ये प्रगती केली, ज्यामुळे मध्यमवर्गासाठी प्रवास अधिक सुलभ झाला. रेल्वे, स्टीमशिप (वाफेवर शक्तीवर आधारित जहाज) आणि सुधारित रस्ते यामुळे पर्यटनात क्रांती झाली.

2. मास टुरिझम:

   20 व्या शतकात मोठ्या प्रमाणात पर्यटनाचा उदय झाला कारण हवाई प्रवास अधिक परवडणारा आणि प्रवेशयोग्य झाला. टूर ऑपरेटर्सनी पॅकेज हॉलिडे ऑफर करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे लोकांच्या विस्तृत श्रेणीसाठी सुट्ट्या अधिक प्राप्य बनल्या.

3. तांत्रिक प्रगती:

   इंटरनेट आणि तंत्रज्ञानाच्या आगमनाने पर्यटनात क्रांती झाली. ऑनलाइन बुकिंग प्लॅटफॉर्म, ट्रॅव्हल एजन्सी आणि नेव्हिगेशन ॲप्सने सहलीचे नियोजन अधिक सोयीचे केले आहे.

4. इकोटूरिझम आणि शाश्वत पर्यटन:

वाढत्या पर्यावरणीय जागरूकतामुळे, पर्यावरणीय पर्यटन आणि शाश्वत पर्यटनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रवासी असे अनुभव शोधू लागले जे नकारात्मक पर्यावरणीय प्रभाव कमी करतात आणि स्थानिक समुदायांना मदत करतात.

5. साहसी आणि विशेष पर्यटन:

साहसी पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन आणि वेलनेस टूरिझम आणि पाककलेच्या पर्यटनासारख्या विशिष्ट बाजारपेठांनी लोकप्रियता मिळवली आहे कारण प्रवासी अद्वितीय आणि प्रामाणिक अनुभव घेतात.

6. डिजिटल भटकेवाद:

डिजिटल भटक्यावादाची संकल्पना उदयास आली आहे, ज्यामुळे व्यक्तींना प्रवास करताना दूरस्थपणे काम करता येते, काम आणि विश्रांतीमधील रेषा अस्पष्ट होते.

7. वैद्यकीय पर्यटन:

लोक आता वैद्यकीय उपचारांसाठी प्रवास करतात, इतर देशांमध्ये अधिक परवडणाऱ्या किमतीत दर्जेदार आरोग्यसेवा शोधतात.

8. स्पेस टुरिझम:

बाल्यावस्थेत असतानाच, स्पेस टुरिझमच्या संकल्पनेकडे लक्ष वेधले गेले आहे, कंपन्यांनी अवकाशात व्यावसायिक सहलीची शक्यता शोधली आहे.

पर्यटनाची उत्क्रांती समाज, तंत्रज्ञान आणि आर्थिक परिस्थितीतील बदल दर्शवते. आज, पर्यटन हा एक जागतिक उद्योग आहे. ज्यामध्ये अनेक प्रेरणा, गंतव्ये आणि अनुभव आहेत, ज्यामुळे तो आधुनिक जीवनाचा आणि जागतिक अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग बनला आहे.

**<u>पर्यटनाचे महत्त्व –</u>**

आज प्रत्येक देश पर्यटन सेवेला उद्योगाचा दर्जा देऊन जास्तीत जास्त परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करतात. पर्यटनाच्या माध्यमातून देशाची आर्थिक प्रगतीही वेगाने होते. आंतरराष्ट्रीय पर्यटनामधील सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणून व्हिसा (VISA- Visitors International Stay Admission म्हणजेच पर्यटक आंतरराष्ट्रीय मुक्काम प्रवेश) कडे पहिले जाते. VISA हा परदेशी पर्यटकांसाठी कायदेशीर दस्तावेज आहे, जो अधिकृत पुरावा आहे आणि एका भागातून दुसऱ्या भागात जाण्याचा परवाना आहे. विकसनशील देश हे विकसित देशांतील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व्हिसा प्रणालीमध्ये सुलभता आणत आहेत कारण हे पर्यटक हेच परकीय चलनाचे मुख्य स्रोत आहेत.

तसेच पर्यटक व्यवसायातील विविध कंपन्या पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी, निवास, हॉटेल, वाहतूक आणि खाद्यपदार्थ, खरेदी इत्यादींवर मोठ्या प्रमाणात सवलती देऊन पर्यटकांना पर्यटनासाठी आकर्षित करतात. यामुळे तेथील भागाचा आर्थिक विकास होण्यास मदत होते.

प्रत्येक देशाने पर्यटकांना आपल्या देशाकडे आकर्षित करण्यासाठी कायदा, शांतता, सुव्यवस्था, सुरक्षितता , आरोग्य सुविधा आणि इतर मूलभूत सुविधांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. जेणेकरून पर्यटकांना पर्यटनाचा आनंद घेताना सुरक्षित आणि आनंदाने प्रवास करता येईल. भारताचा विचार करता, काश्मीरमध्ये पर्यटकांची कमतरता आणि उत्तरांचलमधील वाढ हे कायदा, शांतता व सुव्यवस्थेचे पर्यटनातील महत्त्व स्पष्ट करते.

पर्यटनामुळे भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमध्ये परस्पर संबंध सौहार्दाचे संबंध प्रस्थापित होण्यास मदत झाली आहे. यावरून आपल्याला असे म्हणता येईल की, परदेशी पर्यटक जेव्हा दुसऱ्या देशात जातात तेव्हा तेथील केंद्र आणि प्रादेशिक सरकार त्यांच्या आदरातिथ्याकडे विशेष लक्ष दिल्यामुळे तेथील पर्यटन उद्योगाला चालना मिळते, उत्पन्न, रोजगार आणि परकीय चलन वाढते. जेव्हा दोन देशांमध्ये पर्यटनाचा लक्षणीय विकास होतो, तेव्हा त्यांच्यात परस्पर सहकार्याची भावना निर्माण होते. उदाहरणार्थ, भारत आणि नेपाळ, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड इत्यादी नैसर्गिक आपत्ती आणि जागतिक संकटाच्या वेळी

वेळोवेळी एकमेकांना मदत केल्याचे दिसून येते. थोडक्यात, पर्यटनामुळे दोन देशांमधील संबंध सुधारण्यास मदत मिळते व परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागते.

1. पर्यटनामुळे ऐतिहासिक घटनांना उजाळा मिळतो.
2. पर्यटनामुळे ऐतिहासिक जाणीव निर्माण होण्यास मदत होते.
3. पर्यटनामुळे इतिहासाचे महत्त्व टिकण्यासाठी मदत होते.
4. पर्यटनामुळे नवीन संशोधनाला चालना मिळते.
5. पर्यटनामुळे स्थानिक इतिहास उजेडात येतो.
6. ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन व जतन करण्यास मदत होते.

थोडक्यात, पर्यटनाचे महत्त्व वरीलप्रमाणे सांगता येईल.

**पर्यटन व्यवसायाचे फायदे व दुष्परिणाम:**

WTO म्हणजेच The World Tourism Organisation ज्याचे नाव आता बदलून UNWTO म्हणजेच United Nations World Tourism Organization असे झाले आहे. याद्वारे आंतरराष्ट्रीय पर्यटन व्यवसायाचे नियंत्रण व समन्वय साधण्याचा प्रयत्न केले जाते. पर्यटन व्यवसायाला चालना देण्यासाठी भारताच्या केंद्र सरकार व विविध राज्य सरकाराद्वारे विविध संस्था व संघटनांद्वारे समन्वय साधण्याचा प्रयत्न करत आहे. ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी सरकारने युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (UNDP) शी करार केला आहे.

पर्यटनामुळे मानवी जीवनाच्या कक्षा रुंदावतात, दळणवळणाच्या सुविधा नसलेल्या काळातही व्यापारीवर्ग, यात्रेकरू, फिरस्ते, सैनिक प्रवासाच्या निमित्ताने लोकसंपर्क साधत होते. आधुनिक काळातील पर्यटनविषयक सोयींमुळे व जीवनातील यांत्रिकता दूर करण्याच्या उद्देशाने प्रवासाची आवड वाढते आहे. पर्यटनव्यवसायामुळे आर्थिक उलाढाल वाढली व अनेकांना नवे व्यवसायक्षेत्र उपलब्ध झाले; पर्यटनांमुळे प्रदूषणातही वाढ झाली आहे. सांस्कृतिक प्रदूषणही वाढले; पण याचा दोष नागरी जीवनाची पुरेशी समज नसण्यामध्ये आहे. त्यासाठी पर्यटन व्यावसायिकांना नैतिक जबाबदारीची जाण असणे गरजेचे आहे. समाजघातक सवयींवर पर्यटन व्यावसायिक बंधने घालू शकतात. भारतासारख्या असंख्य पर्यटनस्थळे असलेल्या देशात तर या व्यवसायाला खूप वाव आहे.

**पर्यटन व्यवसायाचे फायदे:**

1. पर्यटनातून पैसा/आर्थिक लाभ मिळतो.
2. पर्यटन देशाच्या विकासाला चालना देते.
3. पर्यटनामुळे आंतरराष्ट्रीय संबंधांना चालना मिळते.
4. अविकसित व विकसनशील राष्ट्रांना जागतिक नकाशावर आणण्यास मदत करते.
5. ज्ञानाची क्षितिजे विस्तृत होण्यास मदत होते.
6. पर्यटन पर्यटकांचा ताणतणाव कमी करण्यास मदत करते.
7. सांस्कृतिक देवाणघेवाण आणि आकलनास मदत होते.
8. सांस्कृतिक वारसचे जतन करण्यास मदत होते.

**पर्यटन व्यवसायाचे दुष्परिणाम :**

1. पर्यटन व्यवसायामुळे पर्यावरणाचे नुकसान होऊ शकते.
2. सांस्कृतिक संघर्ष उद्भवण्यास पर्यटन व्यवसाय कारणीभूत ठरू शकते.
3. पर्यटनामुळे प्रामुख्याने कमी दर्जाच्या नोकऱ्या मिळतात
4. पर्यटन व्यवसायातील नोकऱ्यांचे स्वरूप हंगामी असते.

5. छोटे उद्योग चालू ठेवू शकत नाहीत
6. पर्यटन व्यवसायास अतिरिक्त महत्त्व दिल्याने देशाच्या इतर महत्त्वाच्या क्षेत्रांकडे दुर्लक्ष होते.
7. महागाई वाढ आणि रहिवाशांच्या सोयीसुविधांचा ऱ्हास.
8. पर्यटकांकडून पाण्याचा अतिवापर केला जातो, त्यामुळे पाणीटंचाई सारखे गंभीर प्रश्न निर्माण होतात.
9. पर्यटन व्यवसायामुळे जैवविविधता आणि परिसंस्थांचे ऱ्हास मोठ्या प्रमाणात होण्यास मदत होते.
10. पर्यटन व्यवसायाचा अतिरेक झाल्याने स्थानिक लोकसंख्येचे विस्थापन होते.
11. जमीन व पाणी व वायू प्रदूषण यामध्ये वाढ
12. पर्यटन व्यवसायामुळे मोठ्या प्रमाणावर कचऱ्याची निर्मिती व त्याच्या विल्हेवाटीच्या समस्या निर्माण होत आहे.
13. स्थानिक संस्कृतींचे शोषण पर्यटन व्यवसायामुळे केले जात आहे.
14. पर्यटकांचे गैरवर्तन व स्थानिकांच्या नैतिक मूल्यांची घसरण
15. पायाभूत सुविधांची असमान वाढ पर्यटन व्यवसायामुळे वाढत चालली आहे.

**मूल्यमापन:**

भारतीय पर्यटनासमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे अनेक परदेशी लोकांवर विविध ठिकाणी हल्ले केले जातात. भारतात परदेशी लोकांची छेडछाड, बलात्कार आणि हत्या झाल्याच्या अनेक घटना घडत आहेत. या समृद्ध उद्योगाला आणखी चालना देण्यासाठी सरकारने त्यांना सुरक्षा पुरवण्याची गरज आहे.

वाढत्या पर्यटनव्यवसायाने माहितीपत्रके, प्रवासवर्णने, राहण्याजेवण्याच्या सोयींसाठी इमारती, सदनिका, हॉटेल्स, आपल्या व्यवसायाची जाहिरात इत्यादी अनेक दुय्यम पातळीवरच्या उद्योगांना विकसित व्हायला मदत केली; पण त्याबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, नैसर्गिक दृष्टीने मूळ वातावरण गढूळ करायलाही हातभार लावला हे विसरून चालणार नाही. पर्यटनस्थळांच्या एकंदर सांस्कृतिक वातावरणात गढूळता आणण्याचे दोष काही प्रमाणात पर्यटनव्यवसायाकडे जातात आणि काही प्रमाणात पर्यटकांकडे जातात. या दोघांनी मिळून प्रदूषणामध्ये किती भर घातली, हे तर कोणत्याही पर्यटनस्थळाचे दहा वर्षांपूर्वीचे व आजचे वातावरण पाहिले की सहजपणे जाणवते.

भारताच्या किनारपट्टीचे सौंदर्य तेथील नागरिकांनी जितके गलिच्छ केले नसेल तेवढे या पर्यटकांनी विशेषतः परदेशस्थ पर्यटकांनी केले आहे. स्वतःच्या देशात स्वच्छतेचे महत्त्व जाणणारे हे परदेशी पाहुणे भारतात मात्र खाण्यापिण्याच्या वस्तूंची रिकामी पार्सल्स, प्लॅस्टिकचा कचरा कुठेही टाकून पर्यावरणाचा तोल बिघडविण्याला हातभार लावतात; एवढेच नव्हे तर त्यांचे, आपल्या संस्कृतीच्या दृष्टीने असभ्य ठरणारे वागणे-बोलणे, चालणे पर्यटनस्थळांचे सांस्कृतिक जीवनही कलुषित करायला व तेथील लोकांसमोर नको ते आदर्श उभे करायला कारणीभूत ठरते, जी गंभीर बाब आहे.

सांस्कृतिकतेतील प्रदूषणाइतकेच पर्यावरणाचे प्रदूषणही घातक असते, याचा प्रत्यक्ष जगही प्रत्यही घेत आहे. पर्यटनव्यवसायाने हे प्रदूषण वाढू नये याची तरी खबरदारी घ्यायला पाहिजे; पण केवळ पर्यटनव्यावसायिकच आर्थिक फायद्यांचा विचार करीत आहेत असे नाही तर सरकारही आर्थिक फायद्याकडे लक्ष देऊन प्रदूषणाच्या धोक्याकडे दुर्लक्ष करीत आहे. पर्यटनामुळे वसाहत सुविधा, अन्नपाण्याची सोय, वाढती वाहतूक यंत्रणा इत्यादींमुळे हवेचे प्रदूषण वाढत जाते.

अशा प्रकारचा निसर्गसंपत्तीचा विध्वंस टाळण्याचे उपाय पर्यटनव्यवसायाने शोधायला पाहिजेत. मात्र हा निसर्गविध्वंस फक्त पर्यटनामुळे व पर्यटकांच्या वृत्तीमुळेच होतो, असे समजण्याचेही कारण नाही. एकंदर समाजातच याबद्दल अनास्था व अज्ञान आहे. नागरी जीवनाची समज जोपासणे गरजेचे आहे. कोणत्याही तऱ्हेने का होईना निसर्गाचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे, हे या व्यवसायाने विसरून चालणार नाही. थोडक्यात, पर्यटकांवर अत्यंत कडक व काटेकोर बंधनांचे दडपण ठेवून निसर्गबचावाचे धोरण राबवायला पाहिजे.

## स्वयं अध्ययनासाठी स्वाध्याय:

**प्रश्न 1. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा**

1. Tourism हा शब्द लॅटिन भाषेतील ______________या शब्दापासून तयार झाला आहे.

अ. Toranto ब. Tornus क. Tour ड. यापैकी नाही

2. ______________यांच्या मते, लोकांनी आपल्या घराबाहेर आपल्या इच्छेनुसार केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय.

अ. आयसेट ब. हर्मर क. हरमन श्यूलर्ड, ड. लीग ऑफ नेशन्स

3. ______________हा जागतिक पर्यटन दिवस म्हणून ओळखला जातो.

अ. 1 डिसेंबर ब. 21 ऑक्टोंबर क. 27 सप्टेंबर ड. 21 सप्टेंबर

4. आंतरराष्ट्रीय पर्यटनामधील सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणून ______________ कडे पहिले जाते.

अ. चलन ब. डॉलर क. अन्न ड. व्हिसा

5. पर्यटनामुळे ______________.

अ. ऐतिहासिक जाणीव निर्माण होते.

ब. नवीन संशोधनाला चालना मिळते

क. ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन व जतन करण्यास मदत होते.

ड. वरील सर्व

6. पर्यटन व्यवसायाचे पुढीलपैकी ______________.हे दुष्परिणाम आहे.

अ. पर्यावरणाचे नुकसान होऊ शकते.

ब. महागाई वाढ आणि रहिवाशांच्या सोयी सुविधांचा ऱ्हास.

क. जमीन व पाणी व वायू प्रदूषण यामध्ये वाढ

ड. वरील सर्व

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

1. पर्यटनाचा अर्थ सांगून त्याचे महत्त्व स्पष्ट करा.
2. पर्यटनाच्या कोणत्याही दोन व्याख्यांचे स्पष्टीकरण सांगून त्याची व्याप्ती स्पष्ट करा.
3. पर्यटन व्यवसायाचे फायदे व दुष्परिणाम थोडक्यात स्पष्ट करा.

**प्रश्न 3. टिपा लिहा.**

अ. पर्यटनाचे हेतू

ब. जागतिक पर्यटन संघटना

क. पर्यटनाची व्याप्ती

## प्रकरण- 2.

## पर्यटनाचे प्रकार

**प्रस्तावना:**

मानव हा समाजशील प्राणी असून मानवी उत्क्रांतीच्या काळापासून तो भटके जीवन जगात होता. शिकारीसाठी व आपल्या भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी मानवाने भटकंती केल्याचे पुरावे आपणास उत्खननातील अवशेषांवरून व कातळशिल्पांवरून समजून येते. सिंधू संस्कृतीच्या काळात व्यापारी हेतूने विविध संस्कृतींशी भारतीयांचे हितसंबंध असल्याचे पुरावे प्राप्त होतात. सम्राट अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी भिक्षुंना देशोदेशी पाठवल्याचे पुरावे प्राप्त होतात. प्राचीन काळापासून परकीय हे विविध आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक कारणांनी भारताबद्द्ल आकर्षित झाल्याचे आढळून येते. भारताच्या सामुद्रिक व्यापारावरून प्राचीन कालीन व्यापारी पर्यटनाची कल्पना आपणास येते. तसेच फाहीयान, हुएनसंग व इत्सिंग हे चीनी प्रवाशी बौध्द धर्माचे शिक्षण व माहितीचे संकलन करण्यासाठी भारतात आले होते. मध्ययुगीन भारतीय समाजात देखील राजकीय, आर्थिक व इतर कारणास्तव पर्यटन होत असे. परंतु आधुनिक काळात विशेषत: परकीय कंपन्यांचे भारतात आगमन झाल्यानंतर खऱ्या अर्थाने भारतीय पर्यटनास चालना मिळाली.

भारत हा एक वैविध्यतेने नटलेला आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असा देश आहे, जो जगभरातील पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या विविध प्रकारच्या पर्यटन आकर्षणांसाठी ओळखला जातो.

**भारताच्या पर्यटन आकर्षणाची कारणे:**

भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने पर्यटन उद्योगाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे, 'अतुल्य भारत' मोहिमेसारख्या जाहिरात मोहिमा सुरू केल्या आहेत, ज्याने भारताची संस्कृती आणि पर्यटन स्थळांना संस्मरणीय मार्गाने प्रोत्साहन दिले. या मोहिमेमुळे जगभरातील पर्यटकांच्या मनात भारताची रंगीत प्रतिमा निर्माण करण्यात मदत झाली आणि त्यामुळे त्यांची पर्यटनाबाबतची उत्सुकता वाढली. पर्यटन उद्योगाने इतर क्षेत्रांमध्ये वैविध्यपूर्ण वाढ करण्यास मदत केली आहे.

भारत हा समृद्ध सांस्कृतिक आणि पारंपारिक विविधता असलेला देश आहे. भारतीय संस्कृती, परंपरा, सण आणि प्रेक्षणीय स्थळे यांचा आनंद लुटण्यासाठी लाखो विदेशी पर्यटकांसाठी वर्षाकाठी भारतास भेट देतात. आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, युरोप, आग्नेय आशिया इत्यादी देशांतून पर्यटक भारतात येत आहेत आणि दरवर्षी त्यांची संख्या अनेकपटीने वाढत आहे. भारतातील प्रचंड विविधता जगभरातील पर्यटकांना आकर्षित करते. समृद्ध संस्कृती, कला, परंपरा, इतिहास आणि विदेशी ठिकाणे ही भारतीय पर्यटनाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

1. भारतीय सांस्कृतिक विविधता:

सांस्कृतिक विविधतेमुळे विविध देशांतील पर्यटक भारतीय संस्कृती, भाषा, कला, संगीत, नृत्य, धर्म आणि परंपरा यांचा अभ्यास करण्यासाठी प्रतिवर्षी भारताच्या विविध भागामध्ये पर्यटन करण्यास इच्छुक असतात. थोडक्यात, भारतीय सांस्कृतिक विविधता हे पर्यटकांसाठी एक महत्त्वपूर्ण आकर्षण आहे. भारतीय समाज, चालीरीती, रूढी,परंपरा, सण, उत्सव आणि जीवनशैलीची विस्तृत माहिती मिळवण्यासाठी पर्यटकांचे खास पसंतीचे स्थान म्हणजे भारत होय.

2. ऐतिहासिक वारसा:

प्राचीन काळापासून भारतामध्ये ऐतिहासिक वास्तू, राजवाडे, शिल्प व मंदिरांची निर्मिती झाली. ह्या ऐतिहासिक वस्तू भारताचा समृद्ध इतिहास आणि वास्तुशिल्पाचा पराक्रम दर्शवतात. सिंधू संस्कृतीच्या विविध स्थळांच्या उत्खननानंतर या पुरातत्वीय अवशेषांचा अभ्यास करण्यासाठी जगभरातील प्राच्यविद्या अभ्यासक भारताच्या भेटीला आल्याचे दिसून येते. भारतातील ऐतिहासिक स्मारके, चैत्य, स्तूप, विहार, मंदिरे, किल्ले व लेण्यांचा अभ्यास करण्यासाठी प्रतिवर्षी विविध देशातील पर्यटक व अभ्यासक भारताला भेट देतात.

3. अध्यात्मिक आणि धार्मिक महत्त्व:

भारत हे हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख धर्मासह अनेक प्रमुख धर्मांचे जन्मस्थान आहे. भारतीय धार्मिक व आध्यात्मिक प्रगतीमुळे जगभरातून अनेक अनुयांयाना भारतातील विविध प्रांतातील पर्यटन स्थळांना भेटी देण्यास प्रेरित करतात. वाराणसी, ऋषिकेश, अमृतसर आणि बोधगया सारखी तीर्थक्षेत्रे सांचीचे स्तूप, जैन मंदिरे व हिंदू मंदिरे जगभरातील आध्यात्मिक साधक आणि भक्तांना आकर्षित करतात.

4. नैसर्गिक सौंदर्य:

भारत उत्तरेकडील हिमालयाच्या पर्वतीय रांगापासून ते दक्षिणेकडील उष्णकटिबंधीय समुद्रकिनाऱ्यापर्यंत विविध प्रकारचे नैसर्गिक सौंदर्य पर्यटकांना आकर्षित करतात. केरळचे बॅकवॉटर, महाराष्ट्र व कर्नाटकातील धबधबे, राजस्थानचे वाळवंट आणि केरळ आणि ईशान्य भारतातील हिरवेगार जंगलांची भटकंती करण्यासाठी विविध देशातील पर्यटक भारताच्या विविध भागास भेटी देतात.

5. भारतीय पाककृतीचे आकर्षण:

भारतातील विविध भागात अन्नपदार्थ व खाद्यान्न संस्कृतीने आधुनिक पर्यटनास चालना दिली आहे. भारतीय पाककृती त्याच्या चव आणि विविधतेसाठी जगभरात प्रसिद्ध आहे. प्रत्येक प्रदेशाची विशिष्ट पाककला परंपरा आहे आणि विदेशातील पर्यटक भारतातील मसालेदार करीपासून ते स्ट्रीट फूडच्या विविध प्रकारच्या खाद्यान्नाचा आस्वाद घेण्यासाठी भारतास भेट देतात.

6. साहसी पर्यटन:

भारतामध्ये हिमालयातील ट्रेकिंग, गंगेतील व्हाईट-वॉटर राफ्टिंग, जिम कॉर्बेट आणि रणथंबोर सारख्या राष्ट्रीय उद्यानांमध्ये वन्यजीव सफारी आणि हिमाचल प्रदेशातील पॅराग्लायडिंगसह अनेक साहसी क्रियाकलाप केल्या जातात. त्यामुळे विदेशातील तरुण साहसी पर्यटनासाठी भारत दर्शन करतात.

7. योग आणि आरोग्य:

पाणिनी , पतंजली यासारख्या प्राचीन योगगुरुनी योगक्रियेस आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त करवून दिले. भारत हे योगाचे जन्मस्थान आहे आणि आजही अनेक विदेशी प्रवासी ही प्राचीन कला शिकण्यासाठी आणि सराव करण्यासाठी भारतात येतात. येथील वेलनेस रिट्रीट्स आणि आयुर्वेदिक उपचार देखील लोकप्रिय आहेत. केरळ आणि ऋषिकेश सारखी ठिकाणे योगाभ्यास व पंचकर्म या साठी प्रसिद्ध आहेत.

8. सण:

भारत हा सणांचा देश आहे, ज्यामध्ये वर्षभर उत्सव होतात. गणपती उत्सव , दिवाळी, दसरा, रंगपंचमी, होळी, ईद, दुर्गा पूजा आणि ख्रिसमस सारखे कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे केले जातात, जगभरातून विविध पर्यटक एक या सण व उत्सवांच्या साजरे करण्याने प्रफुल्लीत होऊन सांस्कृतिक अनुभव घेण्यासाठी भारतास भेट देतात.

9. आदरातिथ्य आणि पर्यटन पायाभूत सुविधा:

लक्झरी हॉटेल्सपासून ते बजेट गेस्टहाऊस पर्यंत, निवासाच्या विस्तृत श्रेणीसह भारतामध्ये वाढत्या पर्यटन पायाभूत सुविधा आहेत. अतिथी देवो भव मानले गेल्याने भारतीय लोकांचे आदरातिथ्य पर्यटकांवर कायमची छाप पाडते व पुन्हा पर्यांटनाचा आनंद घेण्यास पर्यटकांना भाग पाडते .

10. स्वस्त प्रवासाचे ठिकाण:

भारताकडे अनेकदा स्वस्त प्रवासाचे ठिकाण म्हणून पाहिले जाते, ज्यामुळे आर्थिक दृष्ट्या कमी बजेट असलेल्या प्रवाशांना ते आकर्षित करते.

11. बॉलिवूड आणि मनोरंजन:

भारतीय चित्रपट उद्योग (बॉलीवूड) जगभरात ओळखला जातो आणि अनेक पर्यटक चित्रपट उद्योगाचे अन्वेषण करण्यासाठी मुंबईला भेट देतात. भारतामध्ये संगीत, नृत्य, नाट्य व कलांनी जगभरातील कलाप्रेमी आणि संगीत प्रेमींना पर्यटकांना आकर्षित करते.

थोडक्यात, भारतीय पर्यटन स्थळे ही भारत देशाप्रमाणेच वैविध्यपूर्ण आहेत. भारताच्या इतिहास, संस्कृती, अध्यात्म, निसर्ग किंवा पाककृती यांचे आकर्षण पर्यटकांना आकर्षित करते.

**पर्यटनाचे प्रकार:**

पर्यटनाची व्याप्ती, प्रवासाचा उद्देश, प्रवासाची पद्धत आणि त्यात समाविष्ट असलेली घटक यासारख्या विविध बाबींवर आधारित पर्यटनाचे विविध प्रकारांमध्ये वर्गीकरण करता येते. पुढील काही पर्यटनाचे सामान्य प्रकार पडतात.

1. **सामाजिक पर्यटन:**

सामाजिक पर्यटन हा एक पर्यटनाचा एक महत्त्वपूर्ण प्रकार पर्यटनाच्या माध्यमातून काही विशिष्ट सामाजिक कार्यक्रम पूर्ण करता येतात. ग्रामीण जीवनशैली, आदिवासी जीवन आणि संस्कृती या पैलूंचा पर्यटनात समावेश केल्यास पर्यटनाला सामाजिक परिमाण प्राप्त होऊन समाजातील दुर्लक्षित घटकांचा विकासात समावेश करता येईल. महाराष्ट्रातील मेळघाटातील आदिवासी जीवन आणि सामाजिक कार्यकर्ते बाबा आमटे यांचा आनंदवन प्रकल्प, राळेगणसिद्धी, हिवरे बाजार इत्यादी आदर्श गावांना भेटी दिल्याने सामाजिक जाणीव निर्माण होते आणि तेथील विकासाला वळण मिळते.

पर्यटनाला एक सामाजिक घटना म्हणून पाहिली जाऊ शकते, ज्यामध्ये पर्यटक आणि यजमान समुदाय यांच्यातील परस्पर संवादाचा समावेश असतो. वेगवेगळया पार्श्वभूमीतील लोकांच्या संपर्कात आल्यावर होणारी सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक देवाणघेवाण यात समाविष्ट आहे.

सामाजिक पर्यटन ही एक आधुनिक संकल्पना आहे की, ज्यामध्ये पर्यटकांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीची पर्वा न करता सर्वांसाठी पर्यटनांचे सर्व अनुभव सर्वांना सुलभतेने उपलब्ध व्हावेत. सामाजिक पर्यटनामध्ये आर्थिकदृष्ट्या कमी उत्पन्न असलेली कुटुंबे, ज्येष्ठ, अपंग लोक, उपेक्षित किंवा वंचित लोकसंख्येला पर्यटनाचे अनुभव स्वस्त व सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिले जातात. सामाजिक पर्यटनाचे प्राथमिक उद्दीष्ट म्हणजे सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचिताना मनोरंजन, विश्रांती आणि सांस्कृतिक समृद्धीच्या संधी प्रदान करून त्यांचे राहणीमान उंचावण्यास मदत करणे. जगभरातील अनेक सरकार व सेवाभावी संस्था 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर सक्रियपणे सामाजिक पर्यटनातील उपक्रमांना प्रोत्साहन देतात. सामाजिक पर्यटनाचा व्यक्ती आणि समुदायांवर सकारात्मक परिणाम होतो, सामाजिक समावेशकता वाढू शकते एकटेपणा कमी होते आणि आपलेपणाची भावना वाढते.

2. **साहसी पर्यटन:**

साहसी पर्यटनामध्ये सहसा शारीरिक आव्हाने असतात. किल्ले पर्यटन, ट्रेकिंग हायकिंग, माउंटन बाइकिंग, रॉक क्लाइंबिंग, व्हाईट-वॉटर राफ्टिंग, कॅव्हिंग, झिप-लाइनिंग स्कायडायव्हिंग, बंजी जंपिंग आणि पॅराग्लायडिंग सारखे रोमांचकारी, आव्हानात्मक , थरारक आणि साहसी अनुभव घेण्यासाठी साहसी पर्यटक भटकंती करत असतात. या प्रकारच्या साहसी पर्यटनासाठी दुर्गम आणि नैसर्गिक वातावरणात जावे लागते, ज्यामुळे जगातील नैसर्गिक सौंदर्याचे संवर्धन आणि जतन करण्याची संधी मिळते.

व्यक्तींना आलेल्या शारीरिक, मानसिक व भावनिक ताणावांतून आलेल्या मरगळी सामोरे जाण्यासाठी पर्यटक साहसी पर्यटनाच मार्ग निवडतात ज्यामुळे शारीरिक , मानसिक विकासासह पर्यटकांचा आत्मविश्वास वाढविण्यास प्रोत्साहन मिळते. जंगल सफरीच्या माध्यमातून अनेक निसर्गनिर्मित जंगलांची भटकंती साहसी पर्यटक करतात त्यामुळे विविध देशातील जंगले, तेथील वनस्पती, नैसर्गिक साधनसंपत्ती व प्राण्यांना पाहण्याची संधी मिळते. उदा. ॲमेझॉन रेनफॉरेस्टचा शोध घेणे, हिमालयात हायकिंग करणे किंवा कोरल रीफमध्ये डायव्हिंग इत्यादी ठिकाणचे पर्यटन हे साहसी पर्यटनांच्या प्रकारामध्ये गणले जाते. या प्रकारच्या पर्यटनामुळे इको-फ्रेंडली, जबाबदार आणि शाश्वत पर्यटनाच्या विकासाला चालना मिळते.

साहसी पर्यटनात सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते, जोखीम कमी करण्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक आणि योग्य त्या सुरक्षेच्या उपाययोजना केल्या जातात. सुरक्षेची खबरदारी घेतल्याने पर्यटकांचा आत्मविश्वास उंचावतो व आलेली निराशा व

उदासीनता कमी होण्यास मदत होते. साहसी पर्यटनामुळे स्थानिक समुदायांशी संवाद साधून त्यांच्या चालीरीती रूढी परंपरा याची देवाणघेवाण होते. ज्यामुळे सांस्कृतिक जडणघडण होते. साहसी पर्यटनामुळे बर्याचदा अविस्मरणीय आठवणी निर्माण होतात.

3. **सांस्कृतिक पर्यटन:**

पर्यटनाला सांस्कृतिक देवाणघेवाण करण्याचे साधन म्हणून देखील पाहिले जाऊ शकते, जेथे प्रवासी विविध संस्कृती, परंपरा आणि जीवनशैली यांच्याशी संवाद साधतात आणि शिकतात. सांस्कृतिक पर्यटनामध्ये एखाद्या विशिष्ट्य भागातील संस्कृती, परंपरा आणि इतिहास शोधणे समाविष्ट असते. पर्यटक संग्रहालये, ऐतिहासिक स्थळांना भेट देतात, सांस्कृतिक कार्यक्रमांना हजेरी लावतात आणि ते भेट देत असलेल्या ठिकाणाची सखोल माहिती मिळविण्यासाठी स्थानिकांशी संवाद साधतात.

4. **ग्रामीण व कृषीपर्यटन:**

ग्रामीण आणि कृषी पर्यटन हा प्रवासाचा एक आधुनिक आणि समृद्ध प्रकार आहे. ज्यामुळे पर्यटकांना ग्रामीण जीवनशैली आणि कृषी पद्धतींची माहिती देण्यास मदत होते. ग्रामीण आणि कृषी पर्यटनामुळे प्रवाशांना शहरी जीवनाच्या धकाधकीतून बाहेर पडून ग्रामीण भागातील शांततेचा अनुभव घेता येतो. थोडक्यात, शहरी भागांतील लोकांना ग्रामीण भागांशी जोडण्याचे काम या प्रकारच्या पर्यटनामुळे होते.

कृषी पर्यटनामध्ये पर्यटकांना शेतात राहणे, शेतीच्या कामांमध्ये सहभाग घेण्याची संधी देणे आणि कृषी जीवनाचे प्रत्यक्ष अनुभव मिळविणे या गोष्टी अंतर्भूत केल्या जातात. विविध हंगामामध्ये ग्रामीण आणि कृषी पर्यटन अनुभव हंगामानुसार बदलू शकतात, फळबागांमध्ये फळे निवडणे, पेरणी, कापणी यांसारख्या शेतीच्या कामांमुळे पर्यटकांना शेतीबद्दलच्या विविध मशागतींच्या  कामाची माहिती मिळते.

ग्रामीण व कृषी पर्यटनामुळे पर्यटकांना ग्रामीण लोकसंगीत, नृत्य आणि पारंपारिक सणांसह, स्थानिक संस्कृती, परंपरा आणि चालीरितींचा शोध घेण्याची संधी यामुळे मिळते. पर्यटकांना शेतातील ताजे आणि रासायनिक खतांचा वापर न केलेल्या पदार्थांचा आस्वाद घेण्याची संधी प्राप्त होते. कृषी व ग्रामीण पर्यटनामुळे हस्तोद्योग, कलाकुसर व विविध स्थानिक व्यवसायांना संरक्षण प्राप्त होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेस चालना मिळते.

कृषी व ग्रामीण पर्यटनामुळे हायकिंग, घोडेस्वारी, पक्षीनिरीक्षण आणि मासेमारी यांसारखे मैदानी उपक्रम केले जातात, ज्यामुळे प्रवासी निसर्गाशी जोडले जातात. कृषी पर्यटनामुळे समुदायांना शैक्षणिक अनुभव प्रदान करण्यास मदत होते. त्यांना शाश्वत शेतीच्या पद्धतीं व पशुपालनाबद्दल माहिती मिळते.

कृषी व ग्रामीण पर्यटनामुळे ग्रामीण परंपरा आणि वारसा जतन होण्यास मदत होते. ग्रामीण आणि कृषी पर्यटन शहरी जीवनाच्या धावपळीच्या जीवनापासून क्षणिक सुटका प्रदान करते, ज्यामुळे प्रवाशांना विश्रांती घेता येते. निसर्गाशी संपर्क साधता येतो आणि ग्रामीण जीवनातील साधेपणाचे कौतुक केले. ग्रामीण आणि कृषी पर्यटन शहरी जीवनातून एक शांत आणि पुनरुज्जीवित सुटका प्रदान करते, ज्यामुळे पर्यटकांना विश्रांती घेता येते, निसर्गाशी संपर्क साधता येतो आणि ग्रामीण जीवनातील साधेपणाचे अनुभव घेता येते.

5. **पर्यावरणस्नेही पर्यटन (इकोटूरिझम):**

पर्यावरणस्नेही दृष्टीकोनातून, पर्यटन म्हणजे पर्यावरणीय प्रणाली, वन्यजीव आणि भूदृश्यांसह नैसर्गिक वातावरणावर परिणाम करू शकणाऱ्या प्रवासी संदर्भ या पर्यटनामध्ये होतो. शाश्वत पर्यटनाचा उद्देश पर्यावरणावरील नकारात्मक प्रभाव कमी करणे हा आहे.

पर्यावरणस्नेही पर्यटन हा पर्यटनाचा एक शाश्वत आणि जबाबदार प्रकार मानला जातो. ज्यामध्ये पर्यावरणाचे संरक्षण, दुर्मिळ परिसंस्थांचे संरक्षण आणि स्थानिक समुदायांच्या कल्याणास प्रोत्साहन देण्यावर जोरदार भर देतो. हा एक प्रकारचा पर्यटन प्रकार आहे जो पर्यटकांना हिरव्यागार वनांचे व निसर्गाचे अनुभव प्रदान करतो. पर्यावरणस्नेही पर्यटन संवर्धन आणि

टिकाऊपणावर भर देऊन नैसर्गिक वातावरणाला भेट देण्यावर लक्ष केंद्रित करते. प्रवासी वन्यजीव सफरी, पक्षी निरीक्षण, आणि पावसाळी धबधबे यांसारख्या क्रियांवर भर देऊन त्यांचा पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करतात.

थोडक्यात, इकोटुरिझम केवळ नैसर्गिक जगाचा शोध घेण्याचेच नव्हे तर येणाऱ्या पिढ्यांसाठी त्याचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचे शाश्वत साधन म्हणून कार्य करते.

6. **वैद्यकीय पर्यटन:**

या पर्यटन प्रकारामध्ये पर्यटक हा आरोग्य सेवा प्राप्त करण्यासाठी अद्ययावत उपचार घेण्यासाठी पर्यटन करतात. जे त्यांच्या देशात उपलब्ध असलेल्यापेक्षा अधिक परवडणारे किंवा उच्च दर्जाचे असू शकतात. सामान्य वैद्यकीय पर्यटन प्रक्रियेमध्ये कॉस्मेटिक शस्त्रक्रिया, दंत कार्य आणि वैकल्पिक शस्त्रक्रिया यांचा समावेश होतो. वैद्यकीय पर्यटन विशेषत: इतर देश किंवा प्रदेशांमध्ये वैद्यकीय उपचार, प्रक्रिया किंवा आरोग्य सेवा शोधणाऱ्या व्यक्तींच्या प्रवासाचा संदर्भ देते.

आरोग्य सुविधांचा लाभ घेण्यासाठी काही पर्यटक भारतात येतात. भारतीय आयुर्वेद, योगासने, प्राणायाम इत्यादींच्या माध्यमातून पर्यटन स्थळांना भेटी देऊन मानसिक शांती व शारीरिक शक्ती प्राप्त करणे हा त्यामागचा उद्देश आहे. भारतीय रुग्णालयांमधील औषधी आणि शस्त्रक्रिया उपचार स्वस्त आहेत आणि म्हणूनच, विविध विकसनशील देशांमधून अनेक रुग्ण उपचारांसाठी येथे येतात. या पर्यटकांना लागणाऱ्या सुविधांमधून वैद्यकीय पर्यटन विकसित होते.

**7. क्रीडा पर्यटन:**

क्रीडा पर्यटन हे पर्यटन व्यवसायाचे एक बहुआयामी क्षेत्र आहे. खेळांशी पाहण्यासाठी व त्याचा प्रत्यक्ष आनंद घेण्यासाठी क्रीडा पर्यटन केले जाते. उत्साही क्रीडा स्पर्धा, किंवा स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी लोक प्रवास करतात. यामध्ये मॅरेथॉन, ऑलिम्पिक स्पर्धा, क्रिकेट व फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत सहभागी होण्यापासून किंवा इतर खेळांशी संबंधित क्रीडा प्रकारांचा सहभाग होतो. अशा क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी झाल्याने ऐतदेशीय खेळाडूंना प्रोत्साहन व नैतिक प्रेरणा मिळते. क्रीडा पर्यटनामुळे आंतरराष्ट्रीय एकता आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीची भावना वाढण्यास मदत होते. आपल्याला असणाऱ्या खेळाची आवड आणि विरंगुळ्याचे ठिकाण ही क्रीडा पर्यटनातील महत्त्वपूर्ण बाब असते.

अनेकदा क्रीडा स्थळांना ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व असल्याने ते क्रीडाप्रेमी आणि इतिहासप्रेमींना आकर्षित करतात. क्रीडा पर्यटनाचा आर्थिक प्रभावही महत्वाचा मानला जातो कारण यामुळे यजमान देश व शहरांसाठी उत्पन्न व महसूल निर्माण होते, स्थानिक व्यवसाय आणि पायाभूत सुविधांच्या विकासालादेखील यामुळे प्रोत्साहन मिळते. क्रीडा पर्यटनामुळे शारीरिक व मानसिक तणाव कमी होण्यास मदत होते.

**8. शैक्षणिक पर्यटन:**

प्राचीन कालखंडापासून मान्यताप्राप्त प्रकार म्हणून शैक्षणिक पर्यटनाकडे पाहिले जाते. ज्यामुळे पर्यटकांना मौल्यवान शैक्षणिक अनुभव प्राप्त होतात. शैक्षणिक पर्यटनामध्ये पर्यटक विविध संस्कृती, भाषा किंवा विषय जाणून घेण्यासाठी प्रवास करतात. यामध्ये परदेशात अभ्यास, भाषा विसर्जन कार्यक्रम आणि ऐतिहासिक किंवा वैज्ञानिक स्थळांच्या शैक्षणिक सहलींचा समावेश आहे. पर्यटनाकडे एक शैक्षणिक संधी म्हणून पाहिले जाऊ शकते, जेथे प्रवासी नवीन ठिकाणांना भेट देताना इतिहास, भूगोल, संस्कृती आणि त्यांच्या सभोवतालच्या जगाशी संबंधित अनुभव शिकण्यात गुंततात.

शैक्षणिक पर्यटन हे आजीवन शिक्षणाच्या संस्कृतीस प्रोत्साहित करते, कारण प्रवासी नवीन पर्यटन स्थळांचा शोध घेताना त्यांचे ज्ञान आणि कौशल्ये वाढतात, जागतिक समस्यांचे सखोल ज्ञान प्राप्त होण्यास मदत होते. यामुळे इतिहास, भूगोल, पुरातत्त्वापासून ते भाषा, पाककृती आणि स्थानिक परंपरांपर्यंत विविध विषयांची माहिती मिळते.

अनेकदा शैक्षणिक सहलींमध्ये स्वयंपाकाचे वर्ग, भाषा शिकण्याचे कार्यक्रम आणि संवादात्मक कार्यशाळा इत्यादी व विविध प्रशिक्षण वर्गांचा समावेश होतो. या विविध प्रशिक्षणामध्ये जीवनावश्यक कौशल्य व प्रत्यक्ष अनुभव देण्यावर भर दिले जाते.

शैक्षणिक पर्यटनामुळे ऐतिहासिक अंतर्दृष्टी प्राप्त होण्यास मदत होते ज्यामध्ये ऐतिहासिक व वस्तूसंग्रहालयांना भेटी देणे या गोष्टी अंतर्भूत असतात. ज्यामुळे पर्यटकांना विविध प्रदेशांचा वारसा आणि ऐतिहासिक दंतकथांशी माहिती प्राप्त होते. शैक्षणिक पर्यटनामुळे प्रवासी स्थानिक संस्कृतींशी खोलवर जोडले जातात.

शैक्षणिक पर्यटनामध्ये सर्व प्रकारचे शालेय व विद्यापीठांच्या कार्यक्रमांचा समावेश होतो. शैक्षणिक सहली, क्षेत्रीय भेटी यामुळे सर्व वयोगटातील विद्यार्थी व शिक्षकांच्या ज्ञानात भर पडते. राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना आणि इतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमामुळे शालेय विद्यार्थ्यांचा स्थानिक समुदायाशी प्रत्यक्ष संबंध येतो. थोडक्यात, शैक्षणिक पर्यटन हे पर्यटकांना जागतिक समुदायाचे जागरूक, मुक्त विचारांचे आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार सदस्य बनण्यासाठी प्रोत्साहित करते व जागतिक नागरिककत्त्वाची भावना वाढवते.

9. **धार्मिक पर्यटन:**

प्राचीन काळापासून प्रचलित असलेला, समाज व धर्ममान्य असलेला तसेच अध्यात्मिकदृष्ट्या समृद्ध असा प्रकार आहे ज्यामध्ये पवित्र स्थळे, मंदिरे, श्रद्धेची ठिकाणे, पवित्र शहरे, मशिदी, चर्च आणि धार्मिक महत्त्वाच्या स्थळांना भेटी देण्यासाठी पर्यटक फिरत असतात.

धार्मिक पर्यटनामध्ये बऱ्याचदा व्यक्ती आपल्या धार्मिक विधी व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी तसेच तीर्थयात्रा करण्यासाठी आणि आपला विश्वास दृढ करण्यासाठी इस्लाममधील मक्का, मदिना, हज तसेच हिंदू धर्मातील काशी, वाराणसी व अयोध्या किंवा ख्रिश्चन धर्मातील जेरुसलेम यासारख्या पवित्र शहरांना भेटी देत असतात.

धार्मिक पर्यटनामुळे विविध धर्मातील विधी आणि चालीरितींमध्ये व स्थानिक संस्कृतीमध्ये पर्यटक समरस होतात. त्यामुळे सांस्कृतिक देवाण-घेवाण होते. विविध धर्माच्या धर्मपरिषदा आयोजित केल्या जातात यामध्ये विविध धार्मिक पार्श्वभूमीचे लोक एकत्र येऊन त्यांचे विश्वास आणि अनुभव यांचे आदान-प्रदान करतात. त्यामुळे आंतरधर्मीय संवाद आणि समजूतदारपणा वाढतो. तसेच सामाजिक व धार्मिक सलोखा वाढीस लागतो.

धार्मिक पर्यटनामुळे स्थानिक कारागीर, व्यावसायिक व इतर समुदायांना धार्मिक कलाकृती, निवासस्थाने आणि मार्गदर्शक सहलींच्या विक्रीद्वारे आर्थिक संधी उपलब्ध होतात. धार्मिक पर्यटन करण्यासाठीची व्यक्ती वैयक्तिक चिंतन, ध्यान आणि आध्यात्मिक विकास यासारख्या गोष्टींना प्राधान्य देतो, ज्यामुळे पर्यटकांना शारीरिक व मानसिक शांती लाभते. विविध धार्मिक स्थळांमध्ये मौल्यवान धार्मिक कलाकृती, कला आणि हस्तलिखिते जतन करून ठेवलेली असतात जी त्या धर्माचा सांस्कृतिक वारसा असतात त्यामुळे धर्माभिमानी भाविक आणि इतिहासप्रेमी या दोघांनाही अशी धार्मिक स्थळे आकर्षित करतात. थोडक्यात, धार्मिक पर्यटनामुळे इतिहासविषयक जाणीव निर्माण होतात व त्या जतन केल्या जातात.

10. **ऐतिहासिक पर्यटन:**

ऐतिहासिक पर्यटनालाच आधुनिक काळात 'हेरिटेज टूरीजम' असे म्हंटले जाते. या पर्यटनामध्ये ऐतिहासिक वस्तू, स्मारके व ठिकाणांना भेट देणे समाविष्ट आहे, जसे की युद्धभूमी, पूर्वीचे तुरुंग चैत्य व लेण्या इत्यादी. इतिहासाबद्दल जाणून घेणे आणि भूतकाळाचा आदर करणे हा हेतू असतो.

ऐतिहासिक पर्यटन हा प्रवासाचा एक आधुनिक काळातील महत्त्वपूर्ण प्रकार आहे. जो पर्यटकांना प्राचीन स्थळे, एतिहासिक स्मारक व वारसा स्थळांना भेटी देऊन मानवी इतिहासाच्या समृद्ध तपशीलांचा शोध घेण्याची संधी उपलब्ध करून देतो.

ऐतिहासिक पर्यटनामध्ये पर्यटकांचा कल हा प्राचीन अवशेष, किल्ले आणि वारसा गावांसह योग्य रीतीने संरक्षित ऐतिहासिक स्थळांना भेट देण्याकडे असतो. ऐतिहासिक स्थळांवरील पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेमध्ये सुधारणा होऊन, शाश्वत पर्यटनाला चालना मिळते आणि स्थानिक रोजगाराच्या संधी निर्माण होतात.

ऐतिहासिक पर्यटनामध्ये शैक्षणिक सहलींचा समावेश केला जातो कारण, गतकाळात घडून गेलेल्या संस्कृतींचा इतिहास, घटना, घडामोडी, वास्तुकला आणि सांस्कृतिक वारशाबद्दल शैक्षणिक अनुभव व ऐतिहासिक दृष्टी यामुळे लाभते.

ऐतिहासिक स्थळे आणि स्मारके यांचे जतन, संवर्धन आणि देखभाल करण्यासाठी ऐतिहासिक पर्यटन महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, ज्यामुळे ही स्मारके पुढील पिढ्यांसाठी टिकून राहण्यास मदत होते.

ऐतिहासिक संग्रहालये, हस्तकौशल्याने निर्मित ऐतिहासिक वस्तू आणि वास्तू, पुरातत्वीय वास्तू आणि वस्तू यामुळे पर्यटकांना गतकालीन जीवनाचा, तेथील चालीरीती, रूढीपरंपरा, वेशभूषा व केशभूषा यांच्याबद्दलची माहिती मिळते. थोडक्यात, ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन, त्यांचे महत्त्व जाणून पर्यटक ऐतिहासिक स्मृती जतन करण्यास आणि मानवतेची सामूहिक कथा सांगण्यास हातभार लावतात.

ऐतिहासिक पर्यटनामुळे मौखिक इतिहास, स्थानिक आख्यायिकांच्या दस्तऐवजीकरणास प्रोत्साहन मिळते आणि सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यास मदत होते.

**11. अंतराळ पर्यटन:**

पर्यटनाचा हा प्रकार अद्याप मान्यता पावला नसला तरी त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात ही मनोधारणा पर्यटकांची होत आहे. अवकाश पर्यटनामध्ये मनोरंजनाच्या उद्देशाने पृथ्वीच्या वातावरणाच्या पलीकडे प्रवास करणे समाविष्ट आहे. अंतराळ पर्यटन हे प्रवास उद्योगातील एक उदयोन्मुख आणि अद्वितीय असे क्षेत्र आहे, जे पर्यटकांना पृथ्वीच्या वातावरणाच्या पलीकडे जाण्याची आणि अंतराळाच्या अनुभवाची संधी उपलब्ध करून देते.

अंतराळ पर्यटनांमुळे अभ्यासू व संशोधकांना अंतराळवीर होण्याचे स्वप्न पूर्ण करता येते ज्यामुळे अंतराळात जाण्याची आणि ब्रह्मांडातून पृथ्वीला पाहण्याची संधी मिळते. स्पेसएक्स, ब्लू ओरिजिन आणि व्हर्जिन गॅलेक्टिक सारख्या कंपन्या व्यावसायिक अंतराळ उड्डाणात अग्रगण्य आहेत, त्यामूळे ते खाजगी व्यक्तींसाठी अंतराळ पर्यटन करणे अधिकाधिक सुलभ झाले आहे.

अंतराळ पर्यटनामध्ये पर्यटक सूक्ष्म गुरुत्त्वाकर्षणात तरंगू शकतात, अंतराळातून विस्मयकारक सूर्योदय आणि सूर्यास्त पाहू शकतात आणि कक्षेत असताना विविध वैज्ञानिक प्रयोग करू शकतात. अंतराळ पर्यटन हे अत्यंत खर्चिक असून इतर पर्यटनांपेक्षा अद्याप तुलनेने महाग आहे, परंतु जसजसे तंत्रज्ञान प्रगती करत जाईल तसतसे खर्च कमी होण्याची अपेक्षा आहे.

अंतराळ पर्यटनामुळे रॉकेट उत्सर्जन आणि अंतराळातील कचऱ्याच्या समस्यांसह अनेक पर्यावरणीय आव्हाने निर्माण होत आहेत. अंतराळ पर्यटनासाठी प्रक्षेपण बिंदू म्हणून काम करण्यासाठी अमेरिका, युरोप आणि आशियातील विकसित राष्ट्रे प्रयत्नशील आहेत. अंतराळ पर्यटनाचे भविष्य हे मानवी अंतराळ संशोधनावर अवलंबून आहे. सध्या जरी अंतराळ पर्यटन सामान्य लोकांसाठी अवघड असले तरी भविष्यात संशोधनाद्वारे अंतराळ पर्यटन हे स्वस्त होईल असा आशावाद आहे.

**12. बिझनेस टूरिझम (MICE):**

विशिष्ट प्रकारच्या उद्योग व व्यापाराच्या विकासासाठी मिटिंग, इन्सेन्टिव्ह, कॉन्फरन्स आणि एक्झिबिशन (MICE) आयोजित केल्या जातात. या प्रकारच्या पर्यटनामध्ये व्यवसायाशी संबंधित उद्देशांसाठी प्रवासाचा समावेश असतो. यामध्ये कॉन्फरन्स, ट्रेड शो, कॉर्पोरेट मीटिंग आणि कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहनपर सहलींचा समावेश आहे.

13. **मानसशास्त्रीय पर्यटन:**

या प्रकारच्या पर्यटनामध्ये मनोवैज्ञानिक गरज किंवा एखाद्याच्या दैनंदिन दिनचर्येतून सुटण्याची आणि नवीन किंवा अपरिचित विरंगुळा शोधण्याची इच्छा म्हणून केली जाऊ शकते. यात प्रवासाच्या अनुभवांद्वारे नवीनता, विश्रांती किंवा वैयक्तिक समृद्धीचा पाठपुरावा करणे समाविष्ट आहे.

**14. पाककृती पर्यटन:**

पाककृती पर्यटक एखाद्या प्रदेशातील स्थानिक पाककृती शोधण्यासाठी आणि अनुभवण्यासाठी प्रवास करतात. ते अनेकदा अनोखे आणि अस्सल खाद्य अनुभव शोधतात, जसे की फूड टूर, कुकिंग क्लास आणि स्थानिक बाजारपेठांना भेटी. विविध देशातील व प्रदेशातील स्थानिक पाककृतींना या प्रकारच्या पर्यटनामुळे चालना मिळत आहे.

**15. विपणन पर्यटन:**

विपणन आणि व्यवसायाच्या संदर्भांमध्ये, पर्यटनाची व्याख्या अनेकदा प्रवासी आणि पर्यटकांसाठी हॉटेल, वाहतूक, टूर आणि आकर्षणे यासारख्या प्रवासाशी संबंधित उत्पादने आणि सेवांची जाहिरात, वितरण आणि विक्री म्हणून केली जाते.

**16. विश्रांती पर्यटन:**

हा पर्यटनाचा सर्वात सामान्य प्रकार आहे, जेथे लोक विश्रांती, मनोरंजन आणि आनंद घेण्यासाठी प्रवास करतात. यात पर्यटन, समुद्रकिनारी सुट्टी, थीम पार्क भेटी आणि सांस्कृतिक शोध यासारख्या क्रियाकलापांचा समावेश आहे. या प्रकारच्या पर्यटन स्थळाच्या विकासासाठी नैसर्गिक साधन संपत्ती व विशेषता ही आवश्यक असते.

**17. स्वयंसेवक पर्यटन (स्वैच्छिक पर्यटन):**

स्वयंसेवक पर्यटक समुदाय सेवा किंवा संवर्धन प्रकल्पांमध्ये सहभागी होऊन प्रवास करतात. स्थानिक समुदायावर किंवा पर्यावरणावर सकारात्मक प्रभावासाठी या प्रकारच्या पर्यटनामध्ये स्वयंसेवा प्रवासाची जोड दिली जाते. यामुळे माणुसकीची भावना जोपासली जाते.

**18. मनोरंजनात्मक पर्यटन:**

मनोरंजन हा हेतू ठेवून मोठ्या प्रमाणात पर्यटन केले जाते. या प्रकारचे पर्यटन गोल्फ पर्यटन, स्कीइंग आणि स्नोबोर्डिंग पर्यटन आणि फिशिंग ट्रिप यासारख्या विशिष्ट मनोरंजक गतीविधींभोवती फिरते.

**19. किल्ले पर्यटन:**

विविध किल्यांची माहिती मिळवणे व साहसी पर्यटनासाठी म्हणून किल्ले पर्यटनास जास्तीची पसंदी आता मिळत आहे.

**20. नॉटिकल टूरिझम:**

नॉटिकल पर्यटक जलयात्रा, नौकाविहार, समुद्रपर्यटन आणि स्कूबा डायव्हिंग यासारख्या क्रियाकलापांसाठी प्रवास करतात.

**मूल्यमापन:**

पर्यटनाचे उपरोक्त प्रकार पाहता या पासून कोणताही देश अलिप्त किंवा विलग राहू शकत नाही. पर्यटन विकासामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मोठी मदत झाली आहे. रेस्टॉरंट्स, दुकाने, वाहतूक व्यवस्था, मनोरंजनाची ठिकाणे इत्यादी पर्यटनामुळे विकसित होतात आणि थेट अर्थव्यवस्थेला हातभार लावतात. तसेच, मूलभूत सुविधा सुधारतात आणि रोजगार निर्मिती होते. जी अर्थव्यवस्थेसाठी अप्रत्यक्षपणे फायदेशीर असते. थोडक्यात, आर्थिक विकासात पर्यटन महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे पर्यटन हा अदृश्य व्यापार असल्याचे म्हटले जाते.

पर्यावरण विकासासाठी पर्यटन चांगले आहे. नैसर्गिक ठिकाणे, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने इत्यादी विकसित करण्यासाठी सरकारकडून पर्यटन उद्योगासाठी आर्थिक गुंतवणूक केली जाते. पर्यावरणपूरक पर्यटन संकल्पनेमुळे पर्यावरणाची काळजी घेत पर्यटनस्थळे विकसित करता येतात. गृहनिर्माण, रिसॉर्ट्स, रहदारीचे मार्ग इत्यादी घटक देखील पर्यावरणपूरक पद्धतीने डिझाइन केलेले आहेत. या प्रकारच्या विकास प्रक्रियेत वीज, पाण्याचा वापर अत्यंत विवेकीपणे केला जातो. रीसायकल आणि पुनर्वापर ही संकल्पना देखील लागू केली जाते. नैसर्गिक पर्यावरण राखले जाते आणि पर्यटनाचाही विकास होतो.

## स्वयं अध्ययनासाठी स्वाध्याय:

**प्रश्न 1. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा**

1. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने पर्यटन उद्योगाच्या विकासासाठी ______________ ही मोहीम सुरु केली .

अ. अजेय भारत ब. Tourist India क. अतुल्य भारत ड. यापैकी नाही

2. साहसी पर्यटना मध्ये खालीलपैकी ______________ समावेश होतो.

अ. ट्रेकिंग ब. रॉक क्लाइंबिंग क. पॅराग्लायडिंग ड. यापैकी सर्व

3. ऐतिहासिक पर्यटनालाच आधुनिक काळात असे म्हंटले जाते.

अ. साहसी ब. सांस्कृतिक क. क्रीडा ड. हेरिटेज टूरीजम

1. ______________ पर्यटनामध्ये धोका संभवतो

अ. साहसी ब. सामाजिक क. क्रीडा ड. कृषी

2. ______________ पर्यटन हे अत्यंत खर्चिक असून इतर पर्यटनांपेक्षा अद्याप तुलनेने महाग आहे.

अ. साहसी ब. अंतराळ क. सामाजिक ड. कृषी

3. भारतीय पर्यटनाच्या आकर्षणाचे ______________हे महत्वपूर्ण कारण आहे.

अ. सांस्कृतिक विविधता

ब. ऐतिहासिक वारसा

क. आध्यात्मिक आणि धार्मिक महत्व

ड. वरील सर्व

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

1. पर्यटनाचे प्रकार स्पष्ट करा.
2. भारतीय पर्यटनाच्या आकर्षणाची कारणे स्पष्ट करा.

**प्रश्न 3. टिपा लिहा.**

अ. ऐतिहासिक पर्यटन

ब. अंतराळ पर्यटन

क. ग्रामीण व कृषी पर्यटन

ड. धार्मिक पर्यटन

# प्रकरण -3
# भारतीय पर्यटनाचा ऐतिहासिक आढावा

**प्रस्तावना:**

एकविसाव्या शतकातील महत्त्वपूर्ण व कळीचा विषय म्हणून पर्यटन ह्या सेवा उद्योगाकडे पाहिले जाते. पर्यटनामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ होते. विविध प्रदेशातील व्यक्तींच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक देवाण-घेवाण होण्यास मदत होते. आजच्या आधुनिक काळामध्ये पर्यटनाला व्यक्ती, कुटुंब आणि समाजाच्या विविध दृष्टीकोनातून महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

असे म्हंटले जाते की,'केल्याने देशाटन... मनुजा चातुर्य येतसे फार'. पर्यटन व सभेमध्ये वावर इत्यादी अनेक मार्गांनी माणसाला चातुर्य येऊ शकते; पण पर्यटन करण्याने पर्यटन व्यवसायालाही अनेक दृष्टींनी फायदा होऊ शकतो, हे आजचे उद्योग क्षेत्रातले त्याचे आर्थिक पातळीवरचे उच्चांकाचे स्थान पाहता सहजपणे लक्षात येते. आजच्या जीवनातील यांत्रिकता व तोचतोपणा पर्यटनाने दूर होऊ शकतो. नवे प्रदेश, नवीन समाजपद्धती, वेगवेगळ्या प्रकारच्या विचारसरणीचे अनुकरण करणाऱ्या जमाती, निसर्गाची भव्यता आणि ऐतिहासिक वास्तू इत्यादींच्या दर्शनाने मानवाला आपल्या जीवनाचा अर्थ समजायला लागतो. पर्यटनामुळे जाती, धर्म, व इतर भेदाची बंधने कमी होण्यास मदत होते. आपण सगळे एकच आहोत, ही एकात्मतेची जाणीव दृढ होऊ लागते.

देशाच्या विविध स्थानिक कलांना प्रोत्साहित करण्याचे काम पर्यटनामुळे केले जाते. स्थानिक व्यवसायाच्या विकासाबरोबरच स्थानिक रोजगारनिर्मितीचे महत्त्वाचे कार्य पर्यटनामुळे केले जाते. यामुळे शासनाच्या दैनंदिन उत्पन्नामध्ये वाढ होते. थोडक्यात राष्ट्राला विकसित करण्याचे महत्त्वाचे कार्य यामुळे पूर्ण होते.

पर्यटन ही जरी आधुनिक संकल्पना असली तरी मानवी उत्क्रांतीच्या विविध कालखंडामध्ये पर्यटनाचा विकास झालेला आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व इतर नानाविध उद्धेशाने जरी मानवाने इतिहास काळापासून पर्यटनास सुरुवात केल्याचे पुरावे आपणास इतिहासात प्राप्त होतात. यासंदर्भात, भारतीय पर्यटनाचा उत्क्रांती काळापासून ते सध्याच्या पर्यटन व्यवसायापर्यंतचा ऐतिहासिक आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**अ. प्राचीन भारतीय पर्यटन:**

पर्यटनाचा उदय, उत्क्रांती आणि विकास हा एक दीर्घ आणि आकर्षक प्रवास आहे. जो मानवाने शतकानुशतकांच्या काळात उलगडला आहे. प्राचीन काळापासून आधुनिक युगापर्यंत भारतीय परीक्षेपामध्ये पर्यटन कसे विकसित झाले याचे थोडक्यात सिंहावलोकन पुढीलप्रमाणे आहे:

**सिंधू संस्कृतीमधील पर्यटन:**

सिंधू संस्कृतीच्या उत्खननातील सापडलेल्या पुराव्यांवरून प्राचीन भारतातील सामाजिक, राजकीय, आर्थिक व धार्मिक जीवनाची कल्पना येण्यास मदत होते. म्हणूनच भारतीय समाजजीवनाच्या सांस्कृतिक व पर्यटनाच्या दृष्टीकोनातून सिंधू संस्कृतीचा कालखंड हा महत्त्वाचा समजला जातो. कारण त्याकाळात भारतीय लोकांचे व्यापाराच्या माध्यमातून परकीय देशाबरोबर जवळचे संबंध निर्माण झालेले होते. हे उत्खननातील साधनावरून स्पष्ट होते. सिंधू संस्कृतीतील स्थळांच्या उत्खननामध्ये बॅबिलोन येथील विटांचे अस्तित्त्व मिळाले आहेत तर सिंधू संस्कृतीमधील काही शिक्के बॅबिलोन मध्ये आढळून आलेले आहेत. यावरून त्या काळात व्यापारी व दळणवळणाच्या अनुषंगाने संबंध निर्माण झाल्याचे स्पष्ट होते. ऋग्वेद काळामध्ये आर्यांच्या स्थिर जीवनाला सुरुवात झाली. त्यामुळे समाजजीवनाला गतीशीलता प्राप्त झाली. भारतात राज्यसत्तेचा उदय झाला. त्यामुळे वेदकाळ आणि उत्तर वेदकाळामध्ये परकिय देशांबरोबर भारताचे दळणवळणाचे संबंध निर्माण झालेले होते. यावरून इतिहासकारांच्या मते भारतामध्ये पद्धतशीर पर्यटनाची सुरुवात ही सिंधूसंस्कृतीपासून झालेली असून पुढील प्रत्येक राजवटींच्या काळात तिचा विस्तार होत गेला व व्याप्ती वाढत गेली.

**मौर्यकालीन पर्यटन :**

प्राचीन भारताच्या इतिहासात मौर्य साम्राज्याचा कालखंड हे सर्वांगीण दृष्टीकोनातून महत्त्वाचे मानले जाते. भारतामध्ये मौर्य घराण्याची सत्ता जवळपास 200 वर्षे टिकून राहिल्यामुळे सामाजिक आणि राजकीय जीवनात दिर्घकालीन कायदा, शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होऊ शकली. चंद्रगुप्त मौर्याने भव्य साम्राज्यविस्तार करून ग्रीक सेनापती सेल्युकस निकेटरचा पराभव केला. याच काळात ग्रीक वकिल मॅगेस्थेनिस हा पाटलीपुत्र राजधानीमध्ये काही काळ वास्तव्य करून होता. याकाळात कला, स्थापत्य, साहित्य व ज्ञान, विज्ञान क्षेत्रात भारतीयांचे ग्रीकांबरोबर देवाणघेवाण चालल्याचे दिसून येते. बिंदूसारच्या काळात इराण व सीरियाचे राजदूत राजधानी पाटलीपुत्र येथे वास्तव्य करून होते.

सम्राट अशोकाने आपल्या राजवटीमध्ये साम्राज्य विस्ताराबरोबरच व्यापार व धर्मप्रसाराकडेही लक्ष दिले होते. याकाळातील बनवले गेलेले रस्ते, दुतर्फा झाडे, बांधलेल्या धर्मशाळा, खोदलेले विहार इत्यादी गोष्टींमुळे या काळामध्ये पर्यटनाला चालना मिळाली.

प्रमुख बंदरापासून ते गावाच्या वेशीपर्यंत परकीय व्यापाऱ्यांचे व प्रवाशांचे रक्षण करण्याची हमी राजाने घेतलेली होती. इतकेच नव्हे तर त्यांच्या व्यापारी मालाचे नुकसान झाल्यास 100 % नुकसान भरपाई दिली जात होती. यामुळेच कल्याण, नालासोपारा, भडोच ताम्रलीप्ती याप्रमुख बंदरातून भारताचे व्यापारी संबंध पाश्चिमात्य देशाबरोबर निर्माण झालेले होते, त्यामुळे व्यापाराच्या माध्यमातून हजारो लोकांचे पर्यटन या काळामध्ये केले जात होते.

**सम्राट अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी पाठवलेले भिक्खू व ठिकाण**

| **अ. क्र** | **भिक्खूचे नाव** | **धर्मप्रसारासाठी पाठवलेले ठिकाण** |
|---|---|---|
| 1 | मझंतिका/महायांतिका | काश्मीर आणि गांधार |
| 2 | महादेव थेरा | महिसमंडला (म्हैसूर) |
| 3 | रक्षिता थेरा | वनवासी (उत्तरी कनारा, दक्षिण भारत) |
| 4 | योना धम्मरखिता | अपरांतक (उत्तर गुजरात काठियावाड, कच्छ आणि सिंध) |
| 5 | महाधम्मरखिता | महाराष्ट्र (महाराष्ट्र) |
| 6 | महारक्हिता | योना (ग्रीस) |
| 7 | मज्झिमा | हिमावंता (हिमालय प्रदेश) |
| 8 | सोना आणि उत्तरा | सुवर्णभूमी (म्यानमार/थायलंड) |
| 9 | ममहेंद्र आणि संघमित्रा | लक्षद्वीप आणि श्रीलंका |

सम्राट अशोकाने आपल्या कारकिर्दीमध्ये बौद्ध धर्माचा स्वीकार करून बौद्ध धर्माला राजाश्रय दिला. तसेच भारतात व भारताबाहेरच्या, देशात, बौद्ध धर्म व तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी हजारो बौद्ध भिक्खूना पाठवले होते. याबद्दलची सर्व माहिती अशोकाने आपल्या शिलालेखात लिहिली आहे. सम्राट अशोकाने मुलगा महेंद्र व कन्या संघमित्रा यांना धर्मप्रसारासाठी श्रीलंकेस पाठवले. तसेच जावा, सुमात्रा, इंडोनेशिया, कंबोडिया, ब्रम्हदेश या आग्नेय देशांमध्ये बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी हजारो बौद्ध भिक्खू पाठवले. तर परकीय देशातील भिक्खू, व्यापारी व प्रवासी मोठ्या संख्येने भारतातील बौद्ध तीर्थ स्थळांना भेटी देण्यासाठी बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी येत होते. यावरून मौर्यकालीन व्यापार, धर्मप्रसार व सांस्कृतीक जीवनाची ओळख होते व त्याकाळात पर्यटनाला चालना मिळाल्याचे दिसून येते.

**सातवाहन काळातील पर्यटन :**

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासाच्या दृष्टीकोनातून 'सातवाहन घराण्याचा' कालखंड हा महत्त्वाचा समजला जातो. या काळामध्ये सातवाहन सत्ताधीशांनी दीर्घकालीन शांतता समाजात निर्माण केल्यामूळे कला, साहित्य आणि व्यापाराला उत्तेजन मिळाले.

या काळात चीनी प्रवासी हुएनसंग याने नाशिक व पैठण येथे भेट दिल्याचे पुरावे प्राप्त होतात. सातवाहन राजवटीमध्ये भारतातील पैठण, तेर, कऱ्हाड, जुन्नर ह्या प्रसिद्ध बाजारपेठा म्हणून ओळखल्या जात होत्या. या काळात महाराष्ट्राचा व्यापार हा ग्रीक व रोमन साम्राज्याबरोबर चालत होता. सातवाहनकालीन भारताच्या व्यापाराबद्दलची माहिती आपणास 'पेरिप्लस ऑफ एरीथ्रीयन सी' या ग्रंथावरून मिळते. तसेच उस्मानाबाद मधील तगर/ तेर या ठिकाणी रोमन व्यापाऱ्यांच्या वास्तव्याचे पुरावे व उत्खननामध्ये शेकडो रोमन नाणी देखील सापडली आहेत. तत्कालीन पश्चिम किनाऱ्यावरील भारतातील प्रमुख बंदराच्या माध्यमातून ग्रीक व रोमानांशी व्यापारी पर्यटन संबंध प्रस्थापित झाल्याचे स्पष्ट होते. तसेच यावर प्रकाश टाकणारी माहिती नाशिक व जुन्नर येथील नाणेघाटच्या शिलालेखात उपलब्ध होते.

**गुप्तकाळातील पर्यटन:**

प्राचीन भारतीय इतिहासामध्ये गुप्त घराण्याचा कालखंड हा स्वर्णयुग मानला जातो. गुप्त घराण्याची सत्ता जवळपास ३०० वर्षापेक्षा अधिक काळ टिकून राहिल्यामुळे आणि या घराण्याला कार्यक्षम सत्ताधीशांची परंपरा लाभल्यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या बाबतीत महत्त्वपूर्ण प्रगती झालेली दिसून येते.


गुप्त काळात आग्नेय आशियायी देशांबरोबर व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत असे. गुप्त घराण्यातील सत्ताधीश समुद्रगुप्त व दुसरा चंद्रगुप्त यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतीत महत्त्वपूर्ण उपाययोजना केल्यामुळेच भारतातून अनेक वस्तूंची निर्यात परकीय देशामध्ये केली जात होती. या काळात कल्याण, भडोच, ताम्रलिप्ती या प्रमुख बंदरातून युरोपीयन देशांबरोबर व्यापार चालत असे.

गुप्तकाळात वेदिक धर्माचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. परंतु गुप्तराजे हे धर्मसहिष्णू असल्याने जैन व बौद्ध धर्माबरोबरच इतर धर्मांचा ही विकास होण्यास मदत झाली. भारतातील बौद्ध धर्म व तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी व प्रमुख बौद्ध तीर्थक्षेत्रांना भेट देण्यासाठी अनेक परकीय भारतात येत असल्याचे पुरावे आपणास प्राप्त होतात.

चंद्रगुप्त II च्या राजवटीत चीनी प्रवासी फाहियान याने धार्मिक हेतूने भारताला भेट दिलेली होती. तसेच श्रीलंकेचा (सिलोन) राजा मेघवर्ण याने देखील भारतातील बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी आपल्या देशातील अनेक प्रवाशांना भारतात पाठविले होते. विदेशी शिष्टमंडळे भारतात आल्याचे पुरावे आपणास प्राप्त होतात. सांची येथील स्तूपांची देखभाल करण्यासाठी श्रीलंकेचे बौद्ध भिक्खू भारतात आले होते असा उल्लेख मिळतो.

गुप्त काळात असे परकीय प्रवाशांच्या मार्गदर्शनासाठी मध्यवर्ती शासनाकडून स्वतंत्र परराष्ट्र विभागाची स्थापना करून वेगवेगळ्या प्रांतात अधिकाऱ्यांचीही नियुक्ती केली जात असे.

गुप्तकाळात कुमारगुप्त राजाने नालंदा विद्यापीठाची निर्मिती करून बौद्ध धर्माच्या अभ्यासबरोबरच इतर विविध विषयांचा अभ्यास करण्यासाठी विदेशी लोकांना प्रोस्ताहित केले. या काळात विदेशातील जवळपास 1000 विद्यार्थी नालंदा विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी येत होते. नालंदा, विक्रमशीला, वल्लभी, काशी ही विदयापीठे प्राचीन भारतात प्रसिद्धीस आलेली होती. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांचे पर्यटन चालले होते. यावरून गुप्त काळामध्ये व्यापार, धार्मिक व शैक्षणिक हेतूने मोठ्या प्रमाणावर पर्यटन केले जात असल्याचे स्पष्ट होते.




**फाहीयानच्या भारत यात्रेचा मार्ग (Okar Research)**

**मध्ययुगीन भारतीय पर्यटन :**

मध्ययुगीन कालखंडात मुहम्मंद गझनी व मुहम्मंद घोरी यांच्या भारतावर स्वाऱ्या झाल्या. या वेळी अनेक सुलतानांनी भारतावर राज्यही केले. जाहिरुद्दिन मोहम्मद बाबर हा तुर्क घराण्यातील सरदार भारतावर आक्रमण करून पानिपतच्या पहिल्या लढाईद्वारे त्याने राज्य निर्माण केले. तसेच मध्ययुगीन भारतात नादिरशाह, अहमदशाह अब्दाली व मंगोलांची आक्रमणे झाली. थोडक्यात, लुटमार व साम्राज्यविस्तार या हेतूने मध्ययुगीन भारतात पर्यटन झाल्याचे दिसून येते. तसेच पर्शियाचा अल्बरुनी, इटलीचा मार्कोपोलो व निकोलो डी कौटी, मोरोक्कोचा रहिवासी इब्न बतुता, पर्शियाचा रहिवाशी अब्दुर रजाक, डोमिंगो पायस, ब्रिटीशांचा कॅ. हॉकिन्स व  थोमस रो इत्यादी परकीय प्रवाशांनी भारतास भेट दिल्याचे समकालीन साहित्यावरून व त्यांच्या प्रवास वर्णनांवरून आपणास समजते.

मध्ययुगात भारतात पायी यात्रा करण्याच्या कल्पनेवर पुण्यसंचयाच्या हेतूने भर दिला जाई. लोकसंपर्क, धार्मिक तत्त्वांचा प्रसार किंवा युद्धातील सैनिक म्हणून, याव्यतिरिक्तच्या चतु:सीमा ओलांडण्याची प्रथा मध्ययुगीन कालखंडात नव्हती. तरीसुद्धा संत ज्ञानदेव- संत नामदेव यांच्यासारखे संतश्रेष्ठ भारतभर वारकरी संप्रदायाचा झेंडा लावीत प्रवास करून आले.

भारताच्या शोधासाठी निघालेला कोलंबसाचा समुदाय किंवा वास्को-दी- गामा तसेच देशोदेशीचे एकमेकांकडचे राजदूत, वकील, पोस्टमनचे काम करणारे सांडणीस्वार, व्यापारीवर्ग हेच काय ते स्वग्राम सोडून फिरणारे फिरस्ते होते. थोडक्यात, मध्ययुगात साम्राज्यविस्तार, लुटमार , व्यापार, युद्ध व धर्मप्रसार या हेतूने भारतामध्ये पर्यटन झाल्याचे आढळते.

**आधुनिक काळातील पर्यटन:**

पूर्वीच्या काळी फारच थोड्या लोकांचा प्रवासाशी संबंध येई. वाहतुकीच्या साधने कमी असल्याने लांबचा प्रवास अभावानेच असे; आणि तो सुलभही नव्हता. तसेच या प्रवासात चोरी व लुटालूटीचा त्रास प्रवाशांना होत असे व त्याचे निवारण करण्याची यंत्रणा राज्यकर्त्यांकडून केली जात नव्हती. म्हणून प्रवास फक्त यात्रेच्या व जत्रेच्या रूपाने केला जात असे. 19 व्या व 20 व्या शतकातील वाहतुकीच्या साधनामुळे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रवास करणे खूपच सोयीचे बनले आहे. पूर्वीच्या काळी आपले पूर्वज जलमार्ग/ सागरी मार्गाने प्रवास करायचे कारण त्या काळातील ते सोयीचे आणि परवडणारे माध्यम होते. परंतु त्यात

वेळ लागत होता. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आपण आता कमी वेळेत कोणत्याही ठिकाणी सहज प्रवास करू शकतो. आधुनिक काळामध्ये मात्र समाजात प्रवासाची आवड वाढत चाललेली आहे. पाश्चात्त्य देशांतील लोकांना तर आठवडाभराच्या नोकरी-व्यवसायानंतर शनिवार-रविवार जवळपासच्या स्थळांना भेटी देत घालविण्याची सवयच आहे. भारतात आल्यानंतर थंड हवेची ठिकाणे पर्यटनस्थळे म्हणून विकसित करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. सर्वसामान्य नोकरदारवर्गही आज सुटीचा कालावधी प्रवासामध्ये घालविण्याचा बेत ठरवितो.

थोडक्यात नव्या वाहतुकीच्या बदलांमुळे काही तासांत हजारो मैलांचा प्रवास व्यक्ती करू शकते. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग हे एक जागतिक खेडे बनले आहे. त्यामुळे पर्यटन या सेवा व्यवसायाची वाढ झपाट्याने होत आहे.

**विविध काळात भारत भेटीस आलेले काही विदेशी पर्यटक व त्यांची प्रवासवर्णने**

| अ.क्र. | प्रवाशाचे नाव | प्रवासवर्णनाचे नाव | रहिवासी देश |
|---|---|---|---|
| 1 | मेगस्थेनीस | इंडिका | ग्रीक |
| 2 | टॉलेमी | **Almagest**-( प्राचीन भारताच्या भूगोलाची माहिती मिळते ) | इजिप्त |
| 3 | फाहीयान | ए रेकॉर्ड ऑफ बुद्धिस्ट किंगडम्स | चीन |
| 4 | हुएनसंग | तातांग-सी-यु-की | चीन |
| 5 | इत्सिंग | भारत आणि मलय द्वीपसमूहातील प्रचलित बौद्ध धर्माचे विवरण | चीन |
| 6 | इब्न बतुता | रहेला | मोरक्को |
| 7 | मार्को पोलो | दि ट्रॅव्हल्स ऑफ मार्को पोलो | इटली |
| 8 | निकोलो डी कौंटी | Le Voyage Aux Indies | इटली |
| 9 | जीन बाप्टीस्ट ट्रेव्हर्नियर | Les Six Voyages de Jean-Baptiste Tavernier (Six Voyages) | फ्रांस |
| 10 | फ्रान्सीस बर्नियर- | ट्रॅव्हल्स इन द मुघल एम्पायर | फ्रांस |
| 11 | अल्बरुनी | किताब-उल-हिंद | पर्शिया (इराण) |
| 12 | सर थॉमस रो (Sir Thomas Roe) | 17 व्या शतकातील भारतीय प्रवास<br>"Travels in India in the Seventeenth Century" | इंग्लंड |
| 13 | ई. एम. फॉर्स्टर | A Passage to India1 | इंग्लंड |
| 14 | सर थॉमस हर्बर्ट (Sir Thomas Herbert) | Some Years' Travels into Divers Parts of Africa and Asia the Great | इंग्लंड |
| 15 | रॉबर्ट नॉक्स (Robert Knox) | "An Historical Relations of the Island Ceylon" | इंग्लंड |
| 16 | जेम्स फॉर्ब्स (James Forbes) | Oriental Memoirs | स्कॉटलंड |
| 17 | सर रिचर्ड फ्रान्सिस बर्टन (Sir Richard Francis Burton) | "Goa and the Blue Mountains" and "Personal Narrative of a Pilgrimage to Al-Madinah and Meccah" | इंग्लंड |

**स्वातंत्र्यानंतर भारतीय पर्यटनाचा विकास**

मनोरंजन व विलासाच्या दृष्टीने भारत हे जगातील सर्वात महत्त्वाचे पर्यटन केंद्र आहे. भारतातील भौगोलिक स्थितीने पर्यटकांना नेहमीच आकर्षित केले आहे. येथील पर्यावरणीय चमत्कार, सौंदर्य आणि अखंड सांस्कृतिक परंपरांच्या अमर्याद

संपत्तीमध्ये प्रचंड विविधता आणि सातत्य आहे. भारतातील बदलते ऋतू, वैविध्यपूर्ण हवामान, बर्फाच्छादित पर्वतरांगा, सुंदर समुद्रकिनारे, सदाहरित वने, चार पवित्र स्थळांची भूमी, विविध धार्मिक स्थळे या सर्व बाबी देशांतर्गत व विदेशी पर्यटनास चालना देतात.

ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून भारत जगातील सर्वोत्तम देशांपैकी एक आहे. हडप्पा संस्कृतीतील उत्खननातील सापडलेले अवशेष, मौर्यकालीन कौशांबी, वैशाली, उज्जैन व पाटलीपुत्र ही शहरे आणि महाराष्ट्रातील अजिंठा, वेरूळ आणि एलिफंटा लेणी, मध्य प्रदेशातील खजुराहो येथील मंदिर स्थापत्य व शिल्पे यांसारखी प्रमुख पर्यटन केंद्रे भारतात आहेत. भारतातील कुतुबमिनार, ताजमहाल, फतेहपूर सिक्री, लाल किल्ला, सारनाथ, अजमेर, बौद्ध गया, नालंदा, अलाहाबादचा संगम, उत्तरांचलमधील गंगोत्री, यमुनोत्री, बद्रीनाथ, केदारनाथ, आंध्र प्रदेशातील भगवान तिरुपतीचे मंदिर असे अनेक पर्यटन स्थळे लाखो पर्यटकांना आकर्षित करतात.

**<u>स्वातंत्र्योत्तर भारतीय पर्यटन व्यवसायाचा विकास:</u>**

नैसर्गिक, सांस्कृतिक, धार्मिक वारशामुळे भारताने स्वातंत्र्यानंतर पर्यटन क्षेत्रात झपाट्याने विकास केला. सध्या पर्यटनाला उद्योगाचे स्वरूप आले आहे. पूर्वी पर्यटन हे शिक्षणाचे माध्यम मानले जात असे. पर्यटन उद्योग ही एक जागतिक शक्ती म्हणून उदयास येत आहे जो जगाच्या सांस्कृतिक एकात्मतेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

1961 मध्ये भारतात येणाऱ्या पर्यटकांची संख्या 1,39,804 होती, जी भारत-चीन युद्धामुळे 1962 मध्ये 1,34,036 पर्यंत खाली आली. 1963 मध्ये तत्कालीन वित्त सचिव एल. झा यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने तदर्थ समिती स्थापन केली. तत्कालीन पर्यटन महासंचालक एस. एन. चैवा यांची या समितीचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. या समितीने पर्यटनाला चालना देण्यासाठी काही सूचना केल्या. 1965 मध्ये 'झा' समितीच्या शिफारशी लागू करण्यासाठी उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली, ज्याच्या आधारे

1. इंडिया टुरिझम कॉर्पोरेशन लि.
2. हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.
3.इंडिया टुरिझम ट्रान्सपोर्ट अंडरटेकिंग लि.

या तीन महामंडळांच्या स्थापनेची तरतूद करण्यात आली. या तिन्ही महामंडळांनी पर्यटकांसाठी निवास सुविधा, ट्रॅव्हल एजन्सीजच्या जेवणासाठी सुविधा, वाहतूक आणि इतर अनेक सुविधा देण्यास सुरुवात केली, परंतु या तिन्ही महामंडळांमध्ये परस्पर मतभेद निर्माण झाले आणि अपेक्षित परिणाम साधला गेला नाही. ही उणीव दूर करण्यासाठी भारतीय पर्यटन विकास महामंडळ या नवीन महामंडळाची स्थापना करण्यात आली.

पर्यटनाचे महत्त्व ओळखून तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी 13 मार्च 1967 रोजी पर्यटन आणि नागरी विमान वाहतूक मंत्रालयाची स्थापना केली. भारताच्या पर्यटन विकासातील हा एक महत्त्वाचा टप्पा होता.

1 ऑक्टोंबर, 1966 रोजी इंडिया टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात आली. तसेच भारतातील पर्यटन विकास आणि संवर्धनाशी संबंधित नियम, कायदे बनवण्यासाठी व प्रशासनासाठी पर्यटन मंत्रालयाची निर्मिती 1967 मध्ये करण्यात आली.

पर्यटकांच्या विविध गरजा लक्षात घेवून त्यांच्या सोयीसाठी व महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांचा सुनियोजित विकास होण्यासाठी 1975 मध्ये (MTDC -महाराष्ट्र टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.

**भारतात येणाऱ्या पर्यटकांची गेल्या काही दशकातील संख्या**

| अ.क्र | वर्ष /दशक | भारतात येणाऱ्या पर्यटकांची संख्या |
|---|---|---|
| 1 | 1950 | 25,282 |
| 2 | 1960 | 69,296 |
| 3 | 1970 | 1,59,690 |
| 4 | 1980 | 2,84,841 |
| 5 | 1990 | 4,15,000 |
| 6 | 2000 | 6,87,300 |
| 7 | 2010 | 9,40,000 |
| 8 | 2017 | 17,91,000 |
| 9 | 2020 | 6,33,000 |

**2007 मध्ये भारतातील देशांतर्गत पर्यटकांना आकर्षित करणारी प्रमुख 10 राज्ये आणि त्यांची एकूण देशांतर्गत पर्यटन भेटींची टक्केवारी खालील तक्त्यात देण्यात आली आहे.**

| अ.क्र | राज्य | देशांतर्गत पर्यटक भेटींची टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | आंध्र प्रदेश | 24.3 |
| 2 | उत्तर प्रदेश | 22.1 |
| 3 | तामिळनाडू | 13.5 |
| 4 | राजस्थान | 7.2 |
| 5 | कर्नाटक | 4.9 |
| 6 | उत्तराखंड | 3.8 |
| 7 | महाराष्ट्र | 3.7 |
| 8 | पश्चिम बंगाल | 3.5 |
| 9 | मध्य प्रदेश | 2.6 |
| 10 | गुजरात | 2.6 |
| | **एकूण** | **88.2%** |

<u>**भारतातील काही पर्यटन संस्था व त्यांची मुख्यालये**</u>

| Sr. No | Short form | Name of tourist organization | Year of establishment | Headquarter |
|---|---|---|---|---|
| 1 | TAAI | भारतीय पर्यटन एजंट्स संघटना | 1951 | मुंबई |
| 2 | IMF | भारतीय माउंटेनियरिंग फाउंडेशन (भारतीय गिर्यारोहण संघटन) | 1957 | नवी दिल्ली |
| 3 | ITDC | भारतीय पर्यटन विकास महामंडळ | 1966 | नवी दिल्ली |
| 4 | IATO | भारतीय प्रवास संघटन | 1982 | नवी दिल्ली |
| 5 | IITTM | भारतीय पर्यटन आणि प्रवास व्यवस्थापन संस्था | 1983 | नवी दिल्ली |
| 6 | MTDC | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | 1983 | मुंबई |
| 7 | TAFI | भारतीय प्रवास एजंट्स (प्रतिनिधी) महासंघ | 1986 | मुंबई |
| 8 | IITA | भारतीय पर्यटक परिवहनकार संघटन | 2nd March, 1989 | नवी दिल्ली |
| 9 | NIWS | राष्ट्रीय जलक्रीडा संस्था | July 1990 | पणजी |
| 10 | ADTOI | भारतीय स्वदेशी प्रवास संघटन | 1996 | नवी दिल्ली |
| 11 | Incredible India | पर्यटन मंत्रालयाने सुरु केलेले विपणन अभियान | launched in 2002 | नवी दिल्ली |
| 12 | TGFSI | दक्षिण भारतीय पर्यटक मार्गदर्शक संघटन | June 2007 | मदुराई |

**सारांश :**

उपरोक्त विवेचनावरून आपणास असे म्हणता येते की, पर्यटनाच्या माध्यमातूनच एका देशाची दुसऱ्या देशाशी ओळख होते. आधुनिक काळात पर्यटन हा एक उद्योग म्हणून विकसित होत आहे. यातून मोठ्या प्रमाणात लोकांना रोजगार मिळतो. पर्यटन स्थळे हे स्थानिक रहिवाशांच्या उत्पन्नाचे मुख्य स्रोत आहेत. पर्यटनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारे महत्त्वाची भूमिका बजावतात, कारण सध्या एखाद्या देशात पर्यटनाचा जितका विकास होत आहे, तितकी ती त्या देशाची अर्थव्यवस्था मजबूत करते. पर्यटन हा परकीय चलन मिळवण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. त्यामुळे भारत सरकारने व विविध राज्याच्या शासकीय पर्यटन मंडळाने पर्यटनाच्या विकासाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

## स्वयं अध्ययनासाठी स्वाध्याय:

**प्रश्न 1. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा**

1. मौर्यकाळात ग्रीक वकिल _______________ हा पाटलीपुत्र राजधानीमध्ये काही काळ वास्तव्य करून होता.

   अ. फाहीयान   ब. मॅगेस्थेनिस   क. सेल्युकस निकेटर   ड. इत्सिंग

2. सम्राट अशोकाने मुलगा महेंद्र व कन्या संघमित्रा यांना धर्मप्रसारासाठी _______________ येथे पाठवले.

   अ. श्रीलंका   ब. अमेरिका   क. इजिप्त   ड. नेपाळ

3. चीनी प्रवासी _______________ याने नाशिक व पैठण येथे भेट दिल्याचे पुरावे प्राप्त होतात.

   अ. फाहीयान   ब. हुएनसंग   क. प्लिनी   ड. एरियन

4. प्राचीन भारतीय इतिहासामध्ये _______________ घराण्याचा कालखंड हा स्वर्णयुग मानला जातो.

   अ. गुप्त   ब. मौर्य   क. वाकाटक   ड. सातवाहन

5. गुप्त काळात_______________ येथील राजा मेघवर्ण याने भारतातील बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी आपल्या देशातील अनेक प्रवाशांना भारतात पाठविले होते.

   अ. श्रीलंका   ब. चीन   क. इजिप्त   ड. नेपाळ

6. _______________ या राजाने नालंदा विद्यापीठाची निर्मिती केली.

   अ. अशोक   ब. कुमारगुप्त   क. चंद्रगुप्त   ड.हर्षवर्धन

7. भारतातील पर्यटन विकास आणि संवर्धनाशी संबंधित नियम, कायदे बनवण्यासाठी _______________ मंत्रालयाची निर्मिती 1967 मध्ये करण्यात आली.

   अ. पर्यटन   ब.नागरी   क. गृह   ड. संरक्षण

8. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाची (MTDC) ची स्थापना _______________ साली करण्यात आली.

   अ. 2000   ब. 2010   क. 1975   ड. 1947

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

1. भारतीय पर्यटनाचा थोडक्यात आढावा घ्या.
2. मौर्य व गुप्तकालीन पर्यटनाचे स्वरूप व महत्त्व थोडक्यात स्पष्ट करा.

**प्रश्न 3. टिपा लिहा.**

अ. मध्ययुगीन पर्यटन

ब. सातवाहकालीन पर्यटन

क. स्वातंत्र्योत्तर भारतीय पर्यटन

## प्रकरण- 4

## भारतातील काही ऐतिहासिक मंदिरांचा पर्यटनाच्या दृष्टीने अभ्यास

### अ) तिरुपती तिरुमला - बालाजी मंदिर

**प्रस्तावना:**

भारतातील अनेक घराण्यांचे कुलदैवत म्हणून आंध्रमधील शेषाचल पर्वतावर स्थित तिरुपतीचे पवित्र मंदिर आहे. या पर्वताला सात शिखरे असल्याने पुरातन काळापासून हा पर्वत म्हणजे सप्तफण्यांचा आदिशेष असे भाविक मानतात. आंध्र प्रदेशातील चित्तूर रेणीगुंठा रेल्वेस्टेशनपासून जवळच तिरुमला पर्वतावर बालाजीचे मंदिर आहे. तिरुपती बालाजी मंदिरालाच व्यंकटेश्वर मंदिर असेही संबोधले जाते. तिरुमला पर्वताला कृतयुगात वृषभाचल, त्रेतायुगात अंजनाचल, द्वापारयुगात शेषाचल आणि आता कलियुगात व्यंकटाचल नाव आहे असे सांगतात. भारतातील 108 वैष्णव तीर्थ क्षेत्रांतील हे एक प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. हे देऊळ भारतातील सर्वात प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांपैकी एक व आर्थिकदृष्ट्या संपन्न असे आहे.

व्यंकटेशाच्या मंदिरामुळे या पर्वताला 'वेंकटाचल' असेही म्हणतात. दक्षिण भारतात हा पर्वत प्रामुख्याने तिरुमलै (श्रीपर्वत) म्हणून ओळखला जातो. तिरू म्हणजे श्री म्हणजेच लक्ष्मी तिचा पती म्हणजे श्रीपती म्हणजेच श्रीविष्णू व्यंकटेश हे भगवान विष्णूचेच एक स्वरूप आहे. महाराष्ट्रात विठोबा दैवत बाळकृष्ण म्हणून समजण्यात येते, तसेच तिरुपतीचा व्यंकटेश हा बालाजी म्हणून ओळखला जातो. काहीजण याला गिरीचा बालाजी असेही म्हणतात.




**तिरुपती बालाजी नकाशा**

**मंदिराचा पूर्व इतिहास :**

इतिहास संशोधकांनी प्रत्यक्षात तेथील मंदिरांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. यामधून या देवस्थानाबद्दलची विविध आख्यायिकांचे व माहितीचे प्रकटीकरण झाले आहे. जैन धर्मग्रंथातील माहितीनुसार तिरुमला डोंगरावरील मूर्ती जैन तीर्थंकर नेमीनाथ यांची आहे. त्यांची सेवा करण्यासाठीच प्राचीन काळात काही जैन लोक मंदिराच्या परिसरात वास्तव्यास आलेले होते, यावरून आजही डोंगराच्या पायथ्याला जैन वस्ती असल्याचा उल्लेख मिळतो. त्यामुळे हे मंदिर नेमीनाथांचे मंदिर आहे असेही म्हंटले जाते.

स्थानिक साहित्यिकांनी येथील मूर्ती व्यंकटेश्वराचीच असल्याचा दावा केला आहे. त्या प्रदेशात तोडमल राजाची सत्ता अस्तीत्वात होती. जेंव्हा तोडमल राजा राज्याचा दौरा करित असताना त्याला डोंगरावर एका वारूळामध्ये, अर्धवट स्थितीमध्ये व्यंकटेश्वराची मूर्ती दिसली. राजाने या ठिकाणी व्यंकटेश्वर मूर्तीची प्रतिष्ठापना करून मंदिराचा जीर्णोद्धार केला म्हणून ती मूर्ती व्यंकटेश्वराचीच आहे असा उल्लेख मिळतो.

काहींच्या संशोधकांच्या मते, प्राचीन काळात महाराष्ट्रात उदयास आलेल्या सातवाहन घराण्याची सत्ता तिरुमला डोंगरापर्यंत विस्तारलेली होती. सातवाहन सत्ताधिशांनी स्विकारलेल्या उदात्त धार्मिक दृष्टिकोनामुळे त्यांनी आपल्या काळात बौध्द धर्माला उत्तेजन दिलेले होते. त्यामुळे सातवाहनांच्या काळात तिरुमला डोंगरावर बौध्द मुर्तीची स्थापना झालेली आहे.

तर हिंदू धर्मग्रंथानुसार ती मूर्ती भगवान विष्णूची आहे. याबाबतची आख्यायिका अशी आहे की मनूने निर्माण केलेल्या यज्ञप्रसंगी ब्रह्मा-विष्णु-महेश यांच्यात सर्वाधिक श्रेष्ठ कोण असा वाद काही जणांच्यात निर्माण झाला. त्यांच्यामध्ये एकमत होईना. तेव्हा याबाबतचा निर्णय देण्याची कामगिरी भृगू ऋषींवर सोपविण्यात आली. त्यासाठी भृगू ऋषी शिवशंकर आणि ब्रह्मदेव यांच्या भेटीस गेले असताना या दोन्ही देवांनी त्यांची उपेक्षा केली. तेव्हा भृगू ऋषी विष्णूंकडे आले. विष्णूंना या वेळी गाढ झोप लागली होती. त्यामुळे भृगू ऋषी आले आहेत, हे त्यांना समजले नाही. तेव्हा चिडून भृगू ऋषिंनी त्यांना लाथ मारली. तेव्हा भगवान विष्णू त्यांना म्हणाले, "तुमच्या पायाला लागले तर नाही ना?" भगवान विष्णूंची ही सौजन्यता पाहून भृगू ऋषिंनी यानंतर तिन्ही देवांत श्रीविष्णूच श्रेष्ठ असा निर्णय दिला. 'श्रीवत्सलांच्छन म्हणून भृगू ऋषिंनी मारलेल्या लाथेची खूण भगवानांनी आपल्या वक्षःस्थळावर कायम ठेवली आहे.परंतु भृगूने विष्णूंना लाथ मारली तरीही भगवान त्यांच्याशी शांतपणानेच वागले ही गोष्ट लक्ष्मीला आवडली नाही व ती श्रीविष्णूंवरही चिडली आणि वैकुंठाहून निघून शेषांचलावर येऊन राहिली. पण वैकुंठात एकट्या श्रीविष्णूंना करमेना व तिचा शोध घेण्यासाठी विष्णूही पृथ्वीवर आले व शेषाचल पर्वतावर एका बिळात ते जाऊन तप करीत बसले. त्यावेळी ब्रह्मदेवाने गायीचे रूप घेतले व ती गाय रोज त्या बिळात जाऊन श्रीविष्णूंना दूध देऊ लागली. गाय दूध कमी का देते हे पहाण्यासाठी तिचा मालक तिच्यामागोमाग त्या भुयारात शिरला तेंव्हा त्याला रहस्य कळले. ती चोरून दूध दुसऱ्याला देते म्हणून मालकाने तिच्यावर कुऱ्हाड उचलली तेव्हा श्री विष्णू पुढे झाले व त्यांनी तो घाव सोसला. त्या घावाने झालेली जखम सांधण्यासाठी त्या वेळेस जी पट्टी चेहऱ्यावर लावली ती आजतागायत तशीच राहिली आहे. येथे लक्ष्मी व्यंकटेशाजवळ नाही. तिचे मंदिर या पर्वताखालील तिरुचानूर या गावात आहे. इथे तिला पद्मावती किंवा अलमेलुमंग असे म्हणतात. वैकुंठातून निघालेली लक्ष्मी येथे पयसरोवरातील एका कमळातून प्रगट झाली. व ती येथे आकाशराजाची कन्या म्हणून राहू लागली.

पुराणानुसार व्यंकटेश्वराच्या डोळयांचे तेज खूप उग्र असल्याने ते मानवी डोळयांना पाहता येणार नाही म्हणून त्याच्या डोळयावर पट्टी घातली आहे. मुळची व्यंकटेशबालाजीची मूर्ती शालीग्रामाची तीन मीटर उंचीची असून कमळावर उभी आहे. कानांत कर्णफुले, खांद्यावर नाग, आणि केशसंभार रुळलेला आहे. मूर्ती प्रसन्नवदन असून गाभाऱ्यात तेलाचे दिवे तेवत असतात; त्यामुळे विशेष प्रत्ययकारी वाटते. मूर्ती चार हातांची असून एका हातात चक्र व दुसऱ्या हातात शंख आहे. एक हात भक्तांना अभय देणारा उभवलेला असा आहे. मूर्तीच्या पायांत नक्षीदार साखळया आहेत. वैशिष्ट्य म्हणजे मूर्तीच्या अंगावर इतके दागिने व फुलांच्या माळा असतात की, मूळ मूर्ती व्यवस्थित दिसत नाही. पण सजवलेल्या मूर्तीकडे पहात भक्तांचे देहभान हरपते.

श्रीराम, शिव, हनुमान, गणेश वगैरेंची देवळे तिरुपतीवर आहेत. आकाशगंगा, पापविनाशम्, वैकुंठ, पांडव, जाबाली, गोगर्भ वगैरे तीर्थे येथे आहेत. स्वामी पुष्करणी या तीर्थनजीक वराह स्वामीचे प्राचीन मंदिर आहे. भगवान श्रीविष्णू आदिवराहरूपाने येथे प्रकटले, अशी पुराणात कथा आहे. त्यामुळे व्यंकटेशाच्या दर्शनाइतकेच येथे आदिवराहाच्या दर्शनालाही महत्त्व दिले जाते.



**तिरुपती बालाजी मंदिर**

**मंदिराची रचना:**

तिरुमला डोंगरावर व्यंकटेश्वराचे मंदिर निश्चितपणे केव्हा बांधले गेले व येथील प्रमुख मूर्तीची स्थापना कोणी व कधी केली हे स्पष्ट सांगणे कठीण आहे. मात्र हे मंदिर प्राचीन आहे. यावर इतिहास संधोधाकांचे एकमत झाले आहे.

सुरुवातीच्या काळामध्ये पर्वतांवर राहणाऱ्या आदिवासी लोकांचा हा लोकप्रिय देव होता असे म्हटले जाते. साधारणपणे इ.स.च्या पहिल्या शतकामध्ये या मंदिराची उभारणी करण्याला सुरुवात झालेली असावी. मात्र नंतर दक्षिणेकडे राज्य करणाऱ्या पल्ल्व सत्ताधिशांनी हे मंदिर बांधल्याचा उल्लेख पुराव्यांमध्ये मिळतात. या मंदिरावरील शिल्पकाम फारच सुंदर असून तेथील कोरिव काम हे कलाकौशल्याच आदर्श उदाहरण म्हणून सांगता येईल. दक्षिणेकडे प्रसिद्ध असलेल्या नालायर या शिल्पी ग्रंथरचनेमधून इ.स. 6 व्या शतकापर्यंत मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले नव्हते, असा उल्लेख मिळतो. पल्लव राणी समवाईने इ. स. 614 मध्ये येथील पहिली वेदी बांधली. तमिळ/ संगम साहित्यात या स्थानाचा उल्लेख आहे. चोळ व पल्लव साम्राज्यांनी मंदिराला दिलेल्या योगदानाचे कित्येक पट सापडले आहेत. मुख्यमंडप मंदिराचे बांधकाम 10 व्या शतकापर्यंत झालेले आहे. बालाजीच्या प्रमुख मंदिरांव्यतिरिक्त येथील इतरही काही मंदिरे प्रसिद्ध आहेत.

मुख्य मंदिराच्या समोर असलेला सुंदर मंडप हा 1417 मध्ये 'माधव दासार' या भक्ताने बांधून दिलेला आहे, तर मंदिरासमोरील विमान पांड्य राज्याचे मांडलिकत्व नाकारून स्वताचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केलेल्या नरसिंह राजाने बांधकाम केलेले आहे. मंदिराच्या दक्षिणेकडील बाजूस असलेल्या मंडपाला 'हजार खांबी मंडप' म्हणून ओळखले जाते. इ.स. 1586 मध्ये चन्नप्पा नावाच्या भक्ताने हा मंडप बांधलेला आहे. मंडपाची रचना व त्यावरील शिल्पकाम फारच सुंदर असे आहे. बालाजीचे लग्न पद्मावतीशी याच मंडपात लावले जाते. पल्लव राजांच्या काळात या मंदिराला मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहकार्य मिळाल्याने येथील मंदिर परिसराचा विकास झाला. तसेच चालूक्य सत्ताधिशांनी मंदिराला सोने व पैसा दिल्याचा उल्लेख एका शिलालेखात मिळतो.

मंदिरातील व्यंकटेश्वराची मूर्ती ही 7 फुट उंच असून काळ्या पाषाणांची आहे . तसेच हे मंदिर 7 डोंगरांच्या रांगेमध्ये वसलेले आहे. मंदिराच्या आवारात अनेक मंडप दिसतात. तेथील 'कल्याण मंडपात' विवाह साजरे करण्याची प्रथा आहे. ही परंपरा साडेतीनशे वर्षांपूर्वीची आहे. या मंडपात भगवंतांचा विवाह साजरा झाला अशी भावना आहे. त्यामुळे येथे विवाह करायला मुहूर्ताची आवश्यकता नसते अशी समजूत आहे. त्यामुळे येथे कायम विवाहाची धामधूम दिसत असते. अंगाला हळद फासलेले कितीतरी युवक युवती येथे दिसत असतात. येथील स्तंभांवर अनेक सुंदर शिल्पे कोरलेली आहेत. भाविकांचे जयेच्या जये 'गोविंदा' 'गोविंदा' असा गजर करीत पुढे सरसावताना दिसतात.

**मंदिर प्रांगणातील इतर मंदिरे:**

येथे सात मजली उत्तुंग गोपुर असून गोपुराच्या प्रत्येक मजल्यावर उत्कृष्ट शिल्पकृती कोरल्या आहेत. मंदिराच्या चारही दिशांना असे उत्तुंग गोपुर आहेत. हे गोपुर तेराव्या शतकातील आहेत. बालाजीच्या मुख्य मंदिरावरील कळस व शेरास सोन्याचा मुलामा दिलेला असल्याने ते झगमगते शिखर पाहून डोळे स्तिमित होतात. बारा हजार तोळे सुवर्णचा वापर त्यासाठी करण्यात आलेला आहे असे सांगतात. गोपुरावर विष्णू, कालियामर्दन करणारा श्रीकृष्ण, गरूड, हनुमान इ. मूर्ती असून सर्वांत वर सिंहाच्या रुबाबदार मूर्ती आहेत.

मंदिराच्या प्रांगणात लाकडाचा गोलाकार ध्वजस्तंभ असून वर तांब्याच्या पत्र्याने तो मढवलेला आहे. त्यावर गरूड, अंजनेय, गोवर्धनधारी श्रीकृष्ण, कालियामर्दन अशी दृश्ये कोरलेली आहेत. ध्वजस्तंभ हा दक्षिणेतील प्रत्येक मंदिरात असलाच पाहिजे असा दंडक दिसतो. ध्वजस्तंभाच्या एका बाजूला आयनेमहाल दिसतो. तेथील विहिरीत देवावरचे निर्माल्य टाकतात. ध्वजस्तंभ मंडपात हंसावर अधिष्ठित चार भुजांची त्रिमूर्ती एका स्तंभावर कोरलेली आहे. दुसऱ्या एका स्तंभावर एका रमणीचे वस्त्र दासी फेडीत आहे असे दृश्य आहे. एका स्तंभावर गोपीवस्त्रहरणाचा प्रसंगही कोरलेला आहे.

**व्यंकटेश्वराची मुकुटे व देवस्थान समितीची स्थापना:**

व्यंकटेश्वराचे अनेक मुकूट आहेत. त्यात हिरे, माणिक, पाचू वगैरे बहुमोल रत्ने आहेत. इ.स. 1513 मध्ये विजयनगरचा सम्राट श्रीकृष्णदेवराव याने रत्नजडित सुवर्णमुकूट देवाला अर्पण केलेला आहे. मराठा सेनापती रघुजी भोसले यांनी मंदिराच्या कायमस्वरुपी देखभालीची व्यवस्था केली.

1933 साली मद्रास विधानसभेच्या विशेष कायद्या अन्वये तिरुमला तिरुपती देवस्थानम समितीची स्थापना करण्यात आली. या समितीवर मद्रास सरकारतर्फे एक आयुक्त नेमलेला असे. सध्या देखील मंदिराची व्यवस्था तिरुमला तिरुपती देवस्थानमचे विश्वस्त पाहतात. 1977 साली एक मौल्यवान मुकूट बालाजीस अर्पण करण्याचा प्रस्ताव देवस्थान समितीने मांडला व त्यासाठी भारत सरकारकडे चार कोटी रुपयांचे हिरे बेल्जियमहून मागवण्यास परवानगी मागितली परंतु तत्कालीन पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांनी परवानगी नाकारली. पण नंतर श्री. नरसिंहराव व राष्ट्रपती श्री. वेंकटरमण यांच्या संमतीने हा नवा मुकूट बनविण्यात आला. प्रख्यात तेलगु अभिनेते व आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांनीही 1 कोटी रु चा मुकुट देवाला अर्पण केलेला आहे.

**मूल्यमापन:**

व्यंकटेश बालाजी हे श्रीविष्णूंचे स्वयंभू स्थान आहे. बालाजीची यात्रा केल्यास जीवनातील दुःख नाहिसे होते व चैतन्य प्राप्त होते. अशा धार्मिक भावनेतून लाखो लोक पर्यटनाला येतात. तिरुपती देवस्थान हे अत्यंत श्रीमंत आहे. त्यांच्या भांडारात कितीतरी मण सोने असून रोज देवाच्या अंगावर घालण्यात येणाऱ्या सोने, हिरे, माणिक यांचे वजन काही मण होत असते. विद्यापीठ, गोशाळा, बस वाहतूक, धर्मशाळा, संस्कृत विद्यामंदिर वगैरे कार्य संस्थानतर्फे करण्यात येत असते.

नवव्या शतकात कांचीपूरमच्या पल्लवांनी, दहाव्या शतकात तंजावरच्या चोळ राजांनी, चौदाव्या शतकात मदुराईच्या पांड्यराजांनी व पंधराव्या शतकात विजयनगरच्या राजांनी पंधराव्या शतकात या देवस्थानास अमाप पैसा, जडजवाहीर, दागदागिने दिलेले आहेत. आधुनिक काळात व सध्याही भक्तमंडळी नाणी, नोटा, सुवर्णालंकार वा वस्तू गुप्तधन दानाच्या स्वरूपात बालाजीला मनोभावे अर्पण करतात. त्यामुळे येथे करोडो रुपये रोजचे जमा होतात. या ठिकाणी कोट्यावधी रुपयांचा आर्थिक व्यवहार होत असल्यामुळे येथील आर्थिक विकास आपल्याला पाहायला मिळते. त्यामुळे जगातील सर्वांत श्रीमंत देवस्थानांमध्ये या मंदिराची गणना केली जाते.

**ब. पंढरपूरचे विठ्ठल मंदिर:**

पंढरपूर विठ्ठल मंदिर, जे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यात स्थित असून, हे महाराष्ट्रातील एक प्रमुख हिंदू धार्मिक स्थळ आहे. भगवान विष्णूच्या अवतार रुपात विठ्ठलाची पूजा केली जाते. विठ्ठल मंदिर हे पंढरपूरच्या गणेशपुरीचा हा भाग आहे. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराचा इतिहास खूप प्राचीन असून हे एक महत्त्वाचे हिंदू तीर्थक्षेत्र मानले जाते. या मंदिराची बांधकाम प्रक्रिया अनेक शतके चालली आणि येथील पूजा अर्चेचे विशेष महत्त्व आहे.

श्रीविठ्ठलालाच पांडुरंग, माऊली, हरी व पंढरीनाथ असे भाविकांकडून संबोधले जाते. विठ्ठल शब्दाच्या उत्पत्ती बाबत संशोधकात व इतिहासकारात विविध मतमतांतरे आहेत. अनेकांच्या मते, विठ्ठल हा शब्द विष्णु या शब्दाचा अपभ्रंश असल्याचे मानले जाते. कानडी शिलालेखातही जे विठ्ठरस, विट्ट असे शब्द आले आहेत ते विष्णु शब्दाची व्याप्ती सांगणारेच आहेत असे म्हणतात. संत तुकाराम महाराजांच्या मते, 'वि' म्हणजे 'ज्ञान' तसेच 'ठोबा' म्हणजे 'आकार-ज्ञानाचा आकार' किंवा 'ज्ञांनाची मूर्ती' म्हणजे विठोबा होय. तुकोबाराय म्हणतात की, 'वि' म्हणजे 'गरूड' अणि 'ठोबा' म्हणजे 'आसन' थोडक्यात 'गरूड ज्याचे आसन आहे तो विष्णू तोच कटीवर कर ठेवूनि विटेवरी उभा आहे.' अर्थातच श्रीकृष्ण, श्रीविष्णु आणि श्रीविठोबा हे एकच आहेत. श्रीकृष्णाचा अवतार द्वापार युगाच्या शेवटी बुधवारी श्रावण वद्य अष्टमीला झाला. विठोबा म्हणजे श्रीकृष्ण म्हणून बुधवार हा विठ्ठलाचा वार मानला जातो.

विठ्ठल मंदिराचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे येथील विग्रहाला विठ्ठल आणि रुक्मिणी देवीची मूर्ती लाभली असून ती 'रुख्मिणी-विठ्ठल' या नावाने ओळखली जाते. मंदिराची रचना आणि संघटन महत्त्वाचे असून तो महाराष्ट्राच्या एक प्रकारचा धार्मिक, पारंपरिक आदर्श मानला जातो. पंढरपूर विठ्ठल मंदिरात हरिपाठ, भजन कीर्तन ह्या द्वारे प्रमुख हिंदू धार्मिक ग्रंथ गाण्याची परंपरा अत्यंत महत्त्वाची असून अक्षय्य तृतीयेसारखे धार्मिक सणही येथे मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात. पंढरपूर विठ्ठल मंदिर हे हिंदू धर्मातील आदर्श स्थळांपैकी एक असून भाविकांसाठी महत्त्वाचे धार्मिक तीर्थक्षेत्र आहे.

**पंढरपूरचे विठ्ठल मंदिर**

महाराष्ट्रातील जनतेचे गेली अनेक शतके एक प्रमुख दैवत म्हणून पंढरपूर येथील विठ्ठल मंदीराचा उल्लेख केला जातो. विठ्ठलाच्या अस्तित्वामुळे गेल्या कित्येक वर्षापासून धार्मिक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून पंढरपूर या ठिकाणाला प्रसिद्धी मिळाली आहे. पंढरपूर येथील आषाढी यात्रा सुरू झालाचा उल्लेख 11 व्या शतकापासून मिळतो. आधुनिक काळामध्ये व्यक्ती आणि समाजाच्या जडणघडण व वाटचालीमध्ये महत्त्वपूर्ण बदल झालेला असला तरी पंढरपूर येथे होणाऱ्या यात्रेतील लोकसंख्येच्या प्रमाणात वाढच होत गेलेली दिसून येते.

महाराष्ट्र व बाहेरच्या राज्यातूनही हजारो लोक पंढरपूरच्या यात्रेसाठी येतात. पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांचा विचार केल्यास पंढरपूर हे ठिकाण महाराष्ट्रातील लाखो लोकांचे एक धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून ओळखले जात आहे.

भाविकांच्या वाढत्या संख्येमुळेच विठ्ठलाचे महात्म्य आणखी वाढत चाललेले आहे. त्यामुळे पंढरपूरला दक्षिण काशी म्हणूनही ओळखले जाते. आधुनिक काळातील दळणवळणाच्या सोयींमुळे पर्यटक व भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत चालली आहे. लाखो लोक यात्रेच्या निमित्ताने पंढरपूरला पर्यटन करतात. सामाजिक व धार्मिक ऐक्यासाठी याचे महत्त्व वेगळेच आहे. एक पर्यटन केंद्र म्हणून, पंढरपूर येथील स्थळांचा अभ्यास करीत असताना येथील विठ्ठल मंदिराची रचना व इतर बाबींची माहिती अभ्यासणे आवश्यक ठरते.




**पंढरपूर नकाशा (सौजन्य- Semantic Scholar)**

**मंदिराचा पूर्वइतिहास:**

मंदिरातील शिलालेख, पंढरपूरमध्ये सापडलेले शिलालेख, विजयनगर व म्हैसूर राज्यात सापडलेली कागदपत्रे व तसेच होयसळ  राज्यामध्ये सापडलेले शिलालेख यावरून पंढरपूर येथील विठ्ठलमूर्तीचा व ऐतिहासिक स्थळाचा अभ्यास करण शक्य झालेले आहे. डॉ. ग.ह. खरे, डॉ. मार्टिन तसेच इतिहासकार कझीन्स, डॉ. भांडारकर या इतिहास संशोधकांनी दिलेल्या माहितीनुसार व काही धार्मिक ग्रंथाच्या नोंदीनुसार पंढरपूर येथील स्थळांचा अभ्यास करणे शक्य झाले आहे.

**विठ्ठल मूर्तीबाबत तज्ज्ञांची मते:**

वैदिक धर्मग्रंथातील माहितीनुसार पंढरपूर येथील अस्तित्त्वात असलेली मूर्ती विठ्ठलाची नसून विष्णूची मूर्ती आहे. सुरुवातीला त्याठिकाणी विष्णुच्याच मूर्तीची पूजा केली जात होती. परंतु वैदिक धर्मातील हे मत इतिहास संशोधकांना मान्य झालेले नाही. कारण 12 व्या शतकापासून पंढरपूर येथे विठ्ठलमूर्तीचे अस्तित्व असल्याचे स्पष्ट झाले आहे. संत ज्ञानेश्वरांच्या कित्येक वर्षे अगोदरच्या काळापासून येथील उल्लेख प्राप्त होतात. बंगालमधील वैष्णव साधू चैतन्य महाराज हे दक्षिण भारतात तीर्थयात्रेला आलेले असताना त्यांनी कोल्हापूर व पंढरपूर या धार्मिक स्थान भेटी दिल्याचे उल्लेख आढळतात. पंढरपूरला आल्यानंतर चैतन्य महाराजांनी विठ्ठलाचे दर्शन घेतल्याने त्यांना फार आनंद झाला. त्यांनी काही काळ पंढरपूर येथे वास्तव्य करून कीर्तन केल्याचा उल्लेख आढळतो. चैतन्य महाराजांचा काळ ई.स.1486 ते 1534 असा आहे याचा अर्थ विठ्ठलाच्या मूर्तीचे अस्तित्व हे यापूर्वीचे असल्याचे सिद्ध होते.

विठ्ठल मूर्तीच्या अस्तित्वाबाबत इतिहासकारांमध्ये व मूर्तीसंशोधाकांमध्ये अनेक शतकांपासून वाद आहेत. डॉ. भगवानलाल इंद्रजी याच्या मते इ. स. 400 पासून ही मूर्ती अस्तित्त्वात आहे. रा. चिं. ढेरे यांच्या मते, गाभाऱ्यातील आजची मूर्ती तिथली नसून माढ्यातील विठ्ठल मंदिरात मूळ मूर्ती आहे. डॉ. गो. बं. देगलूरकर यांच्या मते कोणत्याही मूर्तीची ओळख ठरवण्यासाठी मूर्तिलक्षणे महत्त्वाची असतात. विष्णू म्हणजे विठ्ठल 'विटेवरी उभा' कटेवरी हात' अशा स्वरूपाचा आहे. स्थानक स्वरूपात असला तरी ही विठ्ठलाची योगमूर्ती आहे. त्याच्या हातातील शंख हे ज्ञानाचे प्रतीक आहे. योगमूर्ती असल्यानेच रखुमाई त्यांच्याजवळ नाही.

पंढरपूरमध्ये विठ्ठल मंदिराच्या परिसरात पाच शिलालेख सापडले आहेत. होयसळ व यादवांच्या काळातले आहेत. यात होयसळ काळातील तिसऱ्या सोमेश्वरच्या (इ.स.1237) च्या शिलालेखात पंढरपूरच्या वारीचा उल्लेख आहे. म्हणजेच संत ज्ञानेश्वरांपूर्वी किमान 100 वर्षे आधीपासून पंढरपूरची वारी चालू असल्याचे दिसून येते.




**पंढरपूर येथील – श्री विठ्ठल मूर्ती**

**विठ्ठल मंदिराविषयी धर्मशास्त्रामध्ये व विद्वानांची मते:**

विठ्ठल मंदिराविषयी धर्मशास्त्रामध्ये व विद्वानांची मते वेगवेगळी आहेत. इ. स. 516 मध्ये सापडलेल्या ताम्रपटापासून पंढरपूरचा आणि त्याच्या आसपास असणाऱ्या काही गावांचा उल्लेख आढळतो. याबरोबरच देवळाचा' लहान माडू ( देऊळ) उल्लेखही नंतरच्या काही शिलालेखांमध्ये पाहायला मिळतो. मंदिर स्थापत्यशैलीचा विचार करता गाभारा, अंतराळ आणि सभामंडप हे आताच्या देवळाचे मुख्य घटक असून सभामंडपाच्या 16 खांबांपैकी एकावर चांदीचं आवरण बसवलं असून तोच गरूडस्तंभ म्हणून ओळखला जातो. 16 व्या शतकात विजयनगरच्या कृष्णदेवरायाने भक्तीसाठी विठोबाची मूर्ती आपल्या राज्यात नेली, तुंगभद्रा नदी काठावर विठ्ठलमंदिर बांधून तेथे विठ्ठलाच्या मूर्तीची प्रतीष्ठापना केली होती. संत एकनाथ महाराजांचे पणजोबा संत भानुदास हे विठ्ठलाचे भक्त होते. संत भानुदास यांनी ती मूर्ती परत आणली असेही एक मतप्रवाह आहे. सोळखांबी मंडपात त्यांची समाधी असून आत जाताना उजव्या हाताच्या पहिल्या पादुका हीच त्यांची समाधी होय.

पण काही इतिहासकारांच्या मते सध्या पैठण येथे असलेली विठ्ठल मूर्ती ही दक्षिणेकडे तयार केलेल्या दक्षिणी पद्धतीची आहे. त्यामुळे भानुदासांनी विठ्ठलाची मूर्ती ही पंढरपूर ऐवजी पैठणला नेली असावी असेही एक मतप्रवाह आहे.

पंढरपुरातील विठ्ठलाची मूर्ती ही निश्चितपणे कोणाची आहे, या बाबतही वेगवेगळे अंदाज व्यक्त केले जातात. 'वैदिक धर्मग्रंथानुसार ती मूर्ती विष्णूची आहे असे मानले जाते तर जैन धर्मशास्त्रकारकांच्या मते ती मूर्ती विठ्ठलाची नसून जैन तीर्थंकर नेमीनाथ यांची आहे. तर बौद्ध धर्माच्या अभ्यासकांच्या मते ती मूर्ती बुद्धाची आहे. कारण या मूर्तीची ध्यानस्थ अवस्था पाहिल्यास ती मूर्ती बुद्धाचीच असल्याचे वाटते. परंतु काही वर्षांपूर्वी सापडलेल्या एका शिलालेखातील माहितीवरून आणि कागदपत्रातील पुराव्यावरून पंढरपूर येथील विठ्ठलाची मूर्ती ही दुसरी कोणाची नसून ती विठ्ठलाचीच आहे, हे आता स्पष्ट झालेले आहे.

**<u>मंदिर रचनेचा इतिहास:</u>**

कर्नाटकात तुंगभद्रा नदीच्या उत्तरेकडील भूप्रदेशात मुख्यत्वे भूतपूर्व म्हैसूर संस्थानात इ. स. अकरावे ते चौदावे शतक यांदरम्यान होयसळ वंशाची सत्ता होती. सोलापूर जिल्हातील भीमा नदीच्या काठापर्यंत होयसळ घराण्याचे राज्य अस्तित्त्वात होते. सुरुवातीस बेलूर ही या राज्याची राजधानी होती. होयसळ घराण्याचा सत्तेवर असलेला राजा विष्णुवर्धन याने आपल्या राज्याचा दौरा करताना पंढरपूर येथे तो आला होता. या निष्ठावान राजाच्या पंढरपुर भेटी प्रसंगी भक्त पुंडलीकाने राजाला पंढरपूर या ठिकाणी विठ्ठल मंदिर बांधावे अशी विनंती केली व विष्णुवर्धन राजाने ती विनंती मान्य करून इ.स.1117 ते 1137 या दरम्यानच्या काळात विठ्ठल मंदिर बांधल्याचा उल्लेख ऐतिहासिक पुराव्यांमध्ये प्राप्त होतात. संधोधाकांची या बाबतची मते भिन्न असली तरी पंढरपूर येथील मूर्ती ही विठ्ठलाचीच आहे यावर मात्र सर्वांचेच एकमत झालेले आहे.

**<u>मंदिराची रचना:</u>**

होयसळ राजा विष्णुवर्धन आपल्या कारकीदीमध्ये विठ्ठल मंदिर बांधले असा उल्लेख सापडत असला तरी मंदिराचे सर्व बांधकाम त्यांच्याच काळात पूर्ण झाले असे मात्र वाटत नाही. यानंतरच्या काळात 16, 17 आणि 18 व्या शतकातील महाराष्ट्रातील वेगवेगळ्या सत्ताधीशांनी मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे दिसून येते. 11 व्या शतकात बांधलेले हे विठ्ठल मंदिर पंढरपूर शहराच्या मध्यवस्तीमध्ये आहे. मंदिराची पूर्व-पश्चिम लांबी 350 फुट आहे व दक्षिण-उत्तर लांबी 170 फूट आहे. मंदिराच्या पूर्व बाजूला तीन दक्षिणेला एक व उत्तरेला एक असे पाच दरवाजे आहेत. मंदिराचा मुख्य दरवाजा हा पूर्वेकडील बाजूस असून त्या मुख्य दरवाजास महाद्वार असे म्हणतात. या मुख्य दरवाजाच्या पायरीजवळच संत चोखोबांची समाधी व तेथेच नामदेवांची पायरी आहे.

मुख्य दरवाजातून आत गेल्यास मुख्य मंडप लागतो. त्याच मंडपात 30 फूट उंचीचे दोन दीपमाला आहेत. मंदिरातच एका बाजूला गरुडाचे व मारुतीचे मंदिर आहे. मंदिराच्या दरवाजातून आत गेल्यावर 16 खांबी मंडप लागतो. हा प्रमुख मंडप असून दोडकर नावाच्या व्यक्तीने बांधल्याचे उल्लेख येथे मिळतो. मंदिरातील विठ्ठलाची मूर्ती साडेतीन फूट उंचीची असून मूर्तीच्या डोक्यावर महदिवाचे लिंग, गळयात कौस्तुभमणी व कमरेस कमरबंध आहे. दंडामध्ये बाहुभूषणे आहेत. महाद्वार येथे उपलब्ध असलेल्या लेखावरून तो दरवाजा रखमाजी अनंत पिंगळे यांनी इ.स. 1618 मध्ये बांधल्याचा उल्लेख आहे. तर मंडपाच्या पूर्वेकडील भागाचे बांधकाम हे नंतरच्या काळात दुसऱ्या बाजीराव पेशव्याने केलेले आहे. विठ्ठल मंदीराचे मुख्य शिखराचे शेवटचे बांधकाम पुणे जिल्हातील भोरच्या संस्थानिकांनी 1752 मध्ये बांधल्याचा उल्लेख मिळतो. अशा वेगवेगळ्या काळात टप्प्याटप्प्याने मंदिराचा विकास झालेला आहे.

औरंगजेबाच्या दक्षिण स्वारीच्या वेळी सोलापूर जिल्ह्याच्या ब्रम्हपुरी व अकलूज या ठिकाणी त्याचा लष्करी तळ होता. या काळात औरंगजेबाने काही मंदिरे पाडल्याने व मुर्त्यांची तोडफोड केले होते. यावेळी संताजी घोरपडे यांच्या आदेशानुसार पंढरपूर मधील देगाव या गावामध्ये विठ्ठल मूर्तीचे स्थलांतर केले तर काहींच्या मते, माढा याठिकाणी विठ्ठल मूर्तीचे स्थलांतर केले होते. असे असले तरी आक्रमणाची भीती नाहिशी झाल्यानंतर ही मूर्ती पुन्हा पंढरपूरला स्थानापन्न करण्यात आली.

वरील माहितीवरून विठ्ठलमंदीर हे फारच वर्षापूर्वीचे असून या मंदिराचे बांधकाम दगडी असून अतिशय कलात्मक पध्दतीने केलेली आहे. आज पंढरपूर येथे होणारी आषाढी यात्रा महत्वाची मोठी ओळखली जाते. त्याची सुरुवात 13 व्या शतकापासून झालेली आहे. असा उल्लेख मिळतो.

**आषाढी-कार्तिकी:**

चैत्र, आषाढ, कार्तिक आणि माघ यात शुद्ध एकादशींना पंढरपूर येथे मोठी यात्रा भरत असते यातील आषाढी यात्रा सर्वात मोठी असते. आळंदी-देहू येथून ज्ञानदेव-तुकाराम तसेच वेगवेगळ्या संतांच्या पालख्या आषाढी एकादशीला पंढरपूरला येत असतात.

आषाढी आणि कार्तिक वद्य एकादशीला आळंदी येथे मोठी यात्रा भरते. कार्तिक शुद्ध एकादशीला पंढरपूरचा पांडुरंग ज्ञानदेवांना भेटण्यास आळंदी येथे येत असतो. शके 1215 कार्तिक वद्य त्रयोदशीला वयाच्या 22 व्या वर्षी ज्ञानदेवांनी आळंदीला जिवंत समाधी घेतली, त्यावेळी प्रत्यक्ष पाडुरंग पंढरपुराहून येथे आले होते. त्यांनी ज्ञानदेवांना 'मी तुला काय वर देऊ' असे विचारले. तेव्हा ज्ञानदेवांनी त्यांना सांगितले की, कार्तिक शुद्ध एकादशीला मी पंढरपूरला देवा तुमच्या दर्शनासाठी येत जाईन आणि कार्तिक कृष्ण एकादशीला तुम्ही माझ्याकडे येत जावे. पांडुरंगाने त्यांना तथास्तु म्हंटले.

पण एकादशी कोणतीही घ्या, महाराष्ट्रातच नव्हे, तर भारतातील सर्व तीर्थक्षेत्री या हरिदिनी भाविकाचौ गर्दी होत असते. या दिवसाला हे महत्त्व प्राप्त होण्यामागे एक कथा आहे.

एकादशीविषयी एक कथा आहे की 'मूर' नावाचा राक्षस श्रीविष्णूना त्रास देऊ लागला. ते विष्णूची भक्त असलेल्या एका स्त्रीला सहन झाले नाही. तेव्हा तिने त्या राक्षसाला ठार मारले, यावर श्रीविष्णू प्रसन्न झाले. त्या दिवशी एकादशी होती. तेव्हा एकादशीला उपवास करणाऱ्यांवर भगवंताने सतत कृपा करावी असा वर तिने मागून घेतला.



## पंढरपूर येथील आषाढी-कार्तिकी वारी

**पर्यटनाच्या दृष्टिकोनातून पंढरपुरचे महत्त्व:**

संत ज्ञानेश्वराच्या काळापासून सुरु झालेल्या आषाढी यात्रेची परंपरा अदयापही टिकून राहिली आहे. दरवर्षी यात्रेला येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे. तर वर्षभरामध्ये लाखो लोक पर्यटक म्हणून पंढरपूरला येतात. म्हणूनच पंढरपूराचा उल्लेख दक्षिणेकडील काशी असा केला जातो.

गेल्या काही वर्षांपासून वाहतूक व दळणवळणाच्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रगती होत गेल्याचे स्पष्ट होते. पंढरपूर हे तीर्थक्षेत्र असल्याने पर्यटकांना जाणे-येणे सुलभ व्हावे, यासाठी रस्ते व रेल्वेमार्गाची सोय करण्यात आलेली आहे. त्यामुळेच महाराष्ट्रामधील कोणत्याही शहरातून पंढरपूरसाठीचा प्रवास करणे आज सहज शक्य झाले आहे. इतकेच नव्हे तर महाराष्ट्राच्या जवळ असलेल्या आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटक या प्रदेशातूनही पंढरपूरला येण्यासाठी वाहतुकीची साधने उपलब्ध झालेली आहेत.

शहरामध्ये अनेक ठिकाणी विविध सामाजिक व धार्मिक संस्थामार्फत मठ व धर्मशाळा बांधलेल्या आहेत. त्यामुळे लोकांच्या निवासस्थानाची सोय झालेली आहे. इ. स. ८३ मध्ये शालीवाहन काळात या गावास पंढरपूर असे नाव मिळाले. या मंदिराची रचना 'हेमाडपंथीय' असून याचे बरेचसे बांधकाम यादवकालात झालेले होते. मंदिरावरील शिखर साधे असून त्यावर गोपुरे आहेत. मंदिरावर साधूसंतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. विठ्ठलाची मूर्ती ही वालुकाश्म खडकापासून तयार केलेली आहे. विठ्ठल मंदिराच्या पाठीमागील बाजूस रुक्मिणीचे मंदिर आहे, तर समोरील बाजूस चंद्रभागेच्या पात्रामध्ये असलेले भक्त पुंडलिकाचे मंदिर सर्वात उंच असून ते मंदिर चांगदेवाने बांधल्याचे उल्लेख प्राप्त होतात.

### क. दख्खनचा राजा ज्योतिबा

**प्रस्तावना:**

कोल्हापूरच्या वायव्येस 14.48 किलोमीटर अंतरावर ज्योतिबाचे डोंगर असून या डोंगरावर ज्योतिबाचे मंदिर आहे. ज्योतिबामध्ये ज्योति भास्कर, ब्रह्मा विष्णू महेश आणि जमदग्नी ऋषी यांनी सूर्याच्या तेजस्वी रुपात जनकल्याण आणि धर्मरक्षण करण्यासाठी घेतलेला अवतार असून रवळनाथ, केदारनाथ अशी त्याची इतरही नावे आहेत. येथे सुरुवातीचा ज्योती हा ज्योतिर्लिंगाला सूचित करतो.

ज्योतिबाला पौगंडद ऋषीचा मुलगा म्हटले जाते. परंपरेनुसार रत्नासुर नावाच्या दैत्याचा त्याने या ठिकाणी वध केल्यामुळे हे स्थान रत्नागिरी म्हणून ओळखले जाते. सपाट प्रदेशात एक हजार फूट उंचीवर, शंखाकृती, हत्तीच्या 'सोंडे'सारख्या पसरलेल्या ज्योतिबाच्या डोंगराला वाडी रत्नागिरी म्हणतात. हा डोंगर पन्हाळ्यापासून कृष्णेकडे गेलेल्या सह्याद्रीच्या फाट्याचाच भाग आहे. या डोंगरावरील पठारी भागात ज्योतिबा मंदिर व गाव आहे.

ज्योतिबा हे दैवत शिव व सूर्याचे रूप मानण्यात येते. एका आख्यायिकेनुसार जोतिबा हा केदारनाथ या ज्योतिर्लिंगाचा अवतार मानला जातो. जो कोल्हापूरची अंबाबाई यांच्या हाकेला धावून प्रत्यक्ष केदारनाथ कोल्हापूर येथे प्रकट झाले. त्यांनी रत्नासुर नामक राक्षसाचा वध केला. पुढे देवीच्या रक्षणासाठी सदैव त्यांनी कोल्हापूर नगरी जवळील दख्खनच्या पठारावर वास्तव्य केले. त्यामुळे या डोंगराला ज्योतिबाचा डोंगर किंवा वाडी रत्नागिरी असे संबोधले जाते. ज्याची सीमा पूर्व घाटापासून पश्चिम घाटापर्यंत होती. ज्याला पूर्वी दक्षिण भूभाग आणि कालांतराने दख्खन असे नाव पडले. या भूभागाचा अधिपती म्हणून देव जोतिबा यांना दख्खनचा राजा असे संबोधले जाते.

**ज्योतिबाच्या मंदिराची निर्मिती:**

श्री जोतिबाचे आज जे मोठे मंदिर दिसते आहे त्या ठिकाणी पूर्वी छोटेसे देवालय होते. अनेक शतकांपूर्वी, ज्योतिबा मंदिराचे बांधकाम सुरू झाले, कालांतराने असंख्य नूतनीकरण आणि विस्तारांद्वारे मंदिर विकसित होत गेले. मंदिराची स्थापत्य शैली हेमाडपंथी असून विविध कालखंडातील कलात्मक कुशलतेचे प्रदर्शन करते. हे मंदिर स्थानिक काळ्या बेसॉल्ट दगडांनी रचलेले असून सूक्ष्म व कोरीव कामांनी सुशोभित केलेले आहे.

वाडीरत्नागिरीच्या ज्योतिबा मंदिरात जाताना प्रथम मराठाशैलीतील भव्य दगडी प्रवेशद्वार लागते. या प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यानंतर पायऱ्या उतरताच तीन देवळांचा समूह पाहायला मिळतो. या तीन देवळांच्या मध्यभागी केदारलिंगाचे मुख्य देवालय आहे. केदारलिंगाचे मूळ मंदिर प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. ह्या मंदिराचा जीर्णोद्धार प्रथम कराडजवळील किवळ या गावचा पाटील नावजी ससे यांनी केले.

१७३० मध्ये राणोजीराव शिंदे यांनी या जागी हल्लीचे देवालय बांधले. हे देऊळ ५७ फूट लांब, ३७ फूट रुंद असून त्याच्या शिखराची उंची ७७ फूट आहे. या देवळाशेजारी केदारेश्वराचे देवालय आहे. या देवालयाचे बांधकाम १८०८ मध्ये दौलतराव शिंदे यांनी केलेले आहे. या देवळाची लांबी ४८ फूट असून रुंदी २२ फूट आहे. शिखर ८९ फूट उंच आहे.

सध्याची केदारेश्वर व रामलिंग ही मंदिरे अनुक्रमे दौलतराव शिंदे आणि मालजी निकम पन्हाळकर यांनी अनुक्रमे १८०८ व १७८० मध्ये बांधले. चोपडाईचे मंदिर प्रीतिराव चव्हाण हिंमतबहाद्दर यांनी १७५० मध्ये बांधले. केदारेश्वर मंदिरापुढे काळ्या पाषणाचे दोन नंदी आहेत. वाडीच्या बाहेर उत्तरेकडे थोड्या अंतरावर यमाईचे मंदिर असून तेही राणोजीराव शिंदे यांनी बांधले.

या मंदिरासमोर पाण्याची दोन तीर्थ असून जवळच सहा कुंड व दोन विहिरी आहेत.एका झरा कुशावर्त कुडांतून निघतो, तो 'गोडा' म्हणून आणि दुसरा उत्तरेकडून येणारा व वारणेला मिळणारा झरा 'हैमवती' नावाने ओळखला जातो.



**ज्योतिबाची मूर्ती:**

जोतिबामंदिरातील गाभारा पितळी पत्र्याने मढविलेला असून जोतिबाच्या मागील कमान व त्याचे आसन चांदीचे आहे. जोतिबाची मूर्ती चतुर्भुज व काळ्या पाषाणाची असून ती १·०६ मी. उंच आहे. या चतुर्भुज मूर्तीच्या हातात खड्ग, पानपात्र, डमरू

व त्रिशूळ आहे. मस्तकावर गंगा असून वाहन अश्व आणि उपवाहन सर्प आहे. भैरव, खंडोबा व कोकणातील रवळनाथ यांच्याशी जोतिबाचे बरेच साम्य आहे. शेजारीच ज्योतिबाचे उपवाहन शेष आहे. ज्योतिबाचा शरीररक्षक काळभैरव बाहेरच्या बाजूस असून तेथे मूळ ज्योत तेवत असते. ज्योतिबाचे दर्शन घेण्याअगोदर काळभैरव व ज्योतीचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. मंदिराच्या परिसरात अनेक दीपमाळा आहेत. जोतिबाची भार्या यमाई. तिची मूर्ती ओबडधोबड, दगडी व शेंदूर फासलेली आहे.



**श्री. केदारेश्वर / श्री ज्योतिबा मूर्ती**

**ज्योतिबा डोंगरावरील उत्सव व समारंभ:**

येथे बारा ज्योतिर्लिंग आहेत. जवळच यमाई मंदिर आहे. वैशाख आणि चैत्र महिन्यात पौर्णिमेच्या दिवसात दरवर्षी होणाऱ्या मोठ्या मेळ्यासाठी भक्त आणि पर्यटक गर्दी करत असतात. ज्योतिबा मंदिर परिसरात नवरात्री आणि महाशिवरात्री यासारखे सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. उत्सवादरम्यान, मंदिराला फुले, दिवे आणि इतर सजावटींनी सुशोभित केले जाते.

ज्योतिबाच्या जन्मदिवशी रविवारी व श्रावणशुद्ध षष्ठीला येथे भाविकांची मोठी गर्दी होते. रत्नासुरावर मिळविलेल्या विजयाप्रीत्यर्थ चैत्री पौर्णिमेस येथे भव्य जत्रा भरते. कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र व देशाच्या इतर भागांतूनही लाखो भाविक येथे गोळा होतात. चैत्र पौर्णिमेच्या दिवशी ज्योतिबाच्या मूर्तीची प्रदक्षिणा देवळाभोवती घातली जाते. नंतर ज्योतिबाच्या चांदीच्या मूर्तीची मिरवणूक पालखीतून वाजत गाजत यमाईदेवीच्या मंदिराकडे निघते.

या मिरवणुकीत अनेक सासणकाठ्या नाचवत नेल्या जातात. ज्योतिबाच्या यात्रेत पन्नासहून अधिक छोटया मोठ्या सासन काठ्या असतात. या मध्ये पहिला सासनकाठीचा मान निनाम गावाचा असतो. या पाडळी (निनाम) गावाचे भक्त १०० कि

मी हून जास्त अंतर म्हणजे रत्नागिरीवाडी ते पाडळी (निनाम) या गावी ५ दिवसांमध्ये सासनकाठी पायी उचलुन त्यांच्या गावी यात्रेदिवशी भक्तांच्या दर्शनासाठी उपलब्ध करून देतात. सासनंकाठीचा रत्नागिरीवाडी ते पाडळी (निनाम) हा प्रवास सुरु असतांना सासनकाठीचे वजन ३०० किलो हुन जास्त असते.

**सासनकाठी:**

सासणकाठी म्हणजे ३० ते ३५ फूट उंचीच्या वेळूला पांढरी व तांबडी पागोटी एकाआड एक तिरपी गुंडाळलेली असतात. काठीच्या टोकाला गंगावनाचे काळे किंवा पांढरे झुपके बांधतात. या बांबूच्या तळापासून चार ते पाच फूट उंचीवर आडवी फळी घट्ट बांधलेली असते. ही फळी खांद्यावर घेऊन भक्तगण काठी नाचवतात. या काठीचा तोल जाऊ नये म्हणून काठीला बांधलेले दोर ताणून लोक उभे असतात.

या फळीवर घोडय़ाची व देवाची प्रतिमा ठेवलेली असते. यातील काही काठय़ा पूर्वापार मानाच्या असतात. ढोल-ताशाच्या तालावर भक्तगण देहभान विसरून काठय़ा नाचवत असतात. निळसर गुलाबी गुलालाच्या धुराळय़ात या रंगबिरंगी काठय़ांची शोभा अवर्णनीय असते. या वेळी भाविक चांगभलेचा गजर करीत असतात. पूर्वी ज्योतिबा देवस्थानास शिंदे सरकारांकडून अनुदान मिळत असे. सध्या इनामी गावांच्या उत्पन्नातून देवस्थानचा खर्च भागविण्यात येतो.

**जोतिबाची खेटे:**

माघ महिन्यात जोतिबा देवाचे पाच खेटे घातले जातात. या खेट्यांच्या निमिताने मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. जोतिबाच्या यात्रेत पन्नासहून अधिक छोट्या-मोठ्या सासनकाठ्या येतात.  ज्योतिबाच्या खेट्यांना पहाटे चार वाजल्या पासून प्रारंभ होतो. कोल्हापूरातील पंचगंगा नदी काठी आंघोळ करून कोल्हापूरहून भक्तगण जोतिबाच्या नावानं चांगभलचा जयघोष करत ज्योतिबा डोंगराच्या दिशेने चालू लागतात.

ज्योतिबांच्या या बाबतची आख्यायिका अशी आहे की, करवीर निवासिनीने कोल्हासूर राक्षसांच्या वधाच्या वेळी केदारनाथांना आमंत्रित केले होते. त्यामूळे आई अंबाबाईच्या मदतीला केदारनाथ धावून आले. जेव्हा मोहिम फत्ते झाली तेव्हा ते माघारी परतू लागले. हे अंबाबाई मातेला समजताच त्या आहे तशाच अनवाणी पळत देवांकडे आल्या. तेव्हा देव वाडी रत्नागिरी डोंगरावर पोहोचले होते. अंबा मातेने ज्योतिबा देवांना करवीर नगरीच्या रक्षणासाठी त्याच डोंगरावर थांबण्याची विनंती केली. देवांनीही ती मान्य केली. साक्षात केदारनाथांचा अवतार ज्योतिबा देव त्या डोंगरावर स्थायिक झाले. आणि करवीर नगरीचं भाग्य उजळलं. तेंव्हापासून कोल्हापूर ते जोतिबा डोंगराकडे पायी चालत खेटे घालण्याची प्रथा आजतागायत सुरु आहे. सध्या भाविक चालत तर कधी गाडीने खेटे घालतात.

**पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व:**

ज्योतिबाचा डोंगर हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यात असलेले हिंदू तीर्थक्षेत्र आहे.श्री ज्योतिबा तथा केदारेश्वर हे बद्रिकेदारचेचे रूप आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश आणि जमदग्नी या सर्वाचा मिळून एक तेज:पुंज अवतार म्हणजेच ज्योतिबा किंवा केदारनाथ. ज्योतिबा मंदिर हे हिंदूसाठी एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे, असे मानले जाते की मंदिरात पूजा केल्याने आध्यात्मिक ज्ञान आणि आशीर्वाद प्राप्त होण्यास मदत होते. जोतिबा हे जागृत आणि शक्तिशाली दैवत मानले जाते. जोतिबा हा नवसाला पावतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. पुत्रप्राप्ती, रोगनिवारण, धनप्राप्ती संकटनिवारण इ. हेतूंनी जोतिबाला भक्त नवस बोलतात व फलप्राप्तीनंतर मोठ्या श्रद्धेने ते फेडतात.

पालखी निघाली म्हणजे भाविक लोक नारळ वाहतात व गुलाल-खोबरे उधळतात. महाराष्ट्रातील सर्व जातिजमातींचे लोक जोतिबाचे उपासक असून अनेक कुटुंबांचे जोतिबा हे कुलदैवत आहे. ग्वाल्हेरच्या शिंद्यांचेही ते कुलदैवत आहे. कर्नाटक, मध्य प्रदेश, सबंध महाराष्ट्रातून दीड-पावणेदोन लाखांवर लोक चैत्र पौर्णिमेच्या यात्रेस उपस्थित राहतात. यात्रेच्या निमित्ताने गुलाल, खोबेरे, खाद्यवस्तू, व इतर आवश्यक वस्तूंची येथे बाजारपेठ तयार झाल्या आहेत. ज्योतिबावर या पूजा व साहित्य व इतर

वस्तूंच्या खरेदी विक्रीतून प्रतिवर्षी लाखो रुपयांची उलाढाल होते. त्यामुळे यात्रेच्या माध्यमातून अर्थिक विकासाचे एक नवे क्षेत्र स्थानिक लोकांना निर्माण झालेले आहे. त्याचबरोबर ज्योतिबाला 'दवणा' ही वनस्पती अत्यंत प्रिय आहे असे म्हंटले जाते. त्यामुळे भाविक मोठ्या प्रमाणात जोतिबाला अर्पण करण्यासाठी खरेदी करतात. यामुळे वाडी रत्नागिरी येथील शेतकरी वर्ग 'दवणा' वनस्पती पिकवतो. या वनस्पतीच्या विक्रीतून स्थानिक शेतकऱ्यांना अर्थिक लाभ मिळत आहे. थोडक्यात, ज्योतिबा देवस्थान हे केवळ धार्मिक केंद्र न राहता अर्थिक व पर्यटन स्थानिक म्हणून ओळखले जाते.

**स्वयं अध्ययनासाठी स्वाध्याय:**

**प्रश्न 1. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा**

1. ______________ येथील तिरुमला पर्वतावर बालाजीचे मंदिर आहे.

अ. कर्नाटक    ब. आंध्र प्रदेश    क. गोवा    ड. तामिळनाडू

2. ______________राणी समवाईने इ. स. 614 मध्ये येथील पहिली वेदी बांधली. तमिळ/ संगम साहित्यात या स्थानाचा उल्लेख आहे.

अ. पल्लव    ब. राष्ट्रकुट    क. सातवाहन    ड. वाकाटक

3. ______________मंदिराच्या आवारात अनेक विवाह मंडप असून 'कल्याण मंडपात' विवाह साजरे करण्याची प्रथा आहे.

अ. मीनाक्षी    ब. तिरुपती    क. तुळजाभवानी    ड. विठ्ठल

4. प्रख्यात तेलगु अभिनेते व आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री ______________ यांनी तिरुपती बालाजीस एक कोटी रु चा मुकुट देवाला अर्पण केलेला आहे.

अ. नरसिंह राव    ब. जनार्धन रेड्डी    क. चिरंजीवी    ड. एन. टी. रामाराव

5. पंढरपूर येथे सापडलेल्या ______________ काळातील तिसऱ्या सोमेश्वरच्या (इ.स.1237) च्या शिलालेखात पंढरपूरच्या वारीचा उल्लेख आहे.

अ. होयसळ    ब. पांड्य    क. चालुक्य    ड. सातवाहन

6. विजयनगरच्या ______________ राजाने भक्तीसाठी विठोबाची मूर्ती आपल्या राज्यात नेली, तुंगभद्रा नदी काठावर विठ्ठलमंदिर बांधून तेथे विठ्ठलाच्या मूर्तीची प्रतीष्ठापना केली होती.

अ. हरिहर    ब. सुलुव    क. रामराय    ड. कृष्णदेवराय

7. रत्नासुर राक्षसाचा वध करून महालक्ष्मी देवीच्या रक्षणाचे काम______________ यांनी केले.

अ. ज्योतिबा    ब. कार्तिकेय    क. विष्णू    ड. महादेव

8. ज्योतिबाला______________ ही वनस्पती अत्यंत प्रिय असल्याने भाविक जोतिबाला अर्पण करतात.

अ. अमृतवेल    ब. दवणा    क. शतावरी    ड. बेलपत्री

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

1. भारतातील मंदिर स्थापत्याच्या अनुषंगाने पंढरपूर येथील विठ्ठलमंदिराचे महत्त्व विषद करा.
2. आधुनिक परीक्षेपात तिरुपती बालाजी येथील मंदिराचा इतिहास सांगून पर्यटनदृष्ट्या महत्त्व स्पष्ट करा.
3. ज्योतिबा मंदिराचा इतिहास व पर्यटनदृष्ट्या महत्त्व थोडक्यात विषद करा.

**प्रश्न 3. टिपा लिहा.**

अ. पंढरपूर येथील विठ्ठल मूर्ती

ब. ज्योतिबा मंदिरातील सण व उत्सव

क. तिरुपती तिरुमला येथील बालाजी मंदिराची रचना

# प्रकरण- 5:
# महाराष्ट्रातील काही किल्ल्यांचा पर्यटनाच्या दृष्टीने अभ्यास

## अ. किल्ले जंजिरा


**प्रस्तावना :**

जंजिरा किल्ला, ज्याला 'मुरुड-जंजिरा किल्ला' म्हणून देखील ओळखले जाते, हा महाराष्ट्रातील एक महत्त्वपूर्ण प्रमुख सागरी किल्ला आहे. हा अरबी समुद्राच्या काठावर वसलेला असून मुंबईपासून उगमस्थानापर्यंत सुमारे 165 किमी अंतरावर आहे.

जंजिऱ्याचे खरे नाव जजीरे मेहरुब असे असून तो अरबी भाषेतील शब्द आहे. जझीरा म्हणजे पाण्यानी वेढलेले बेट व मेहरुब म्हणजे चंद्रकोर. चारी बाजूंनी अरबी समुद्राने घेरलेला असा याचा अर्थ आहे. थोडक्यात, जझीराचा अर्थ बेट असा होतो. पंधराव्या शतकाच्या अखेरीस मलिका अहमदने निजामशाहीची स्थापना केली. उत्तर कोकणचा ताबा घेत त्याने रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुका राजपूर येथे आपले मुख्य ठाणे बनवले पण तेथे मूळ वस्ती कोळ्याची होती. समुद्री चाचेगिरी आणि लुटारूचा कोळीना सतत त्रास होत असे. त्यांना प्रतिबंध करण्यासाठी लाकडाचे ओंडके जमिनीत रोवून तटबंदी (मेढेकोट) तयार करण्यात आली होती. रामराव पाटील-कोळी यांनी या बेटाची स्थापना केली. रामराव पाटील-कोळी यांनी मुरुड येथे राजपुरी गावात एका अथांग समुद्रात एका बेटावर मेढेकोट म्हणजेच लाकडी ओंडक्यांची तटबंदी असलेला एक किल्ला बांधला.

राम पाटलाचा बंदोबस्त करण्यासाठी त्यावेळच्या निजामशीहीतील ठाणेदाराने पिरामखानाची नेमणुक केली होती. परंतु पिरमखान या निजामी सरदाराने दारूच्या व्यापाऱ्याचे सोंग करून तटबंदीच्या आत राम पाटील आणि त्याच्या लोकांना दारूच्या पिंपांची भेट देऊन त्यांचा घात केला आणि आणि आपल्या सैन्याच्या मदतीने सर्वांची कत्तल करून मेढेकोट ताब्यात घेतला.

नंतरच्या काळात पिरामखानाच्या जागेवर 'बुऱ्हाणखानाची' नेमणुक झाली. त्याने निजामाकडुन याठिकाणी भक्कम किल्ला बांधण्याची परवानगी मिळवली. याचे बांधकाम इ. स. 1567 ते 1571 या काळात बुऱ्हाणखानाने केले. आजही या किल्ल्यावर बांधकामाचे जे अवशेष आपल्याला पहायला मिळतात ते याच बुऱ्हाणखानाने बांधलेले आहेत. पुढे इ.स.1617 मध्ये सिद्दी मलिक अंबर याने बादशहाकडून स्वत्रंत सनद मिळवून जहागिरी प्राप्त केली. जंजिरा संस्थानचा हा मूळ पुरूष समजला जातो. पुढे सुमारे 330 वर्षे या किल्ल्यावरील आपली सत्ता अबाधित ठेवण्यात जन्मतःच कणखर आणि काटक असणाऱ्या सिद्दी वंशाच्या मलिक अंबर आणि त्याच्या वंशजांचा मोठा सहभाग होता असे म्हणता येईल. भक्कम बांधकाम, समुद्राने वेढलेला, किल्ल्याच्या तटावरील उत्तम प्रतीच्या तोफा यामुळे हा किल्ला सदैव अजिंक्य राहीला.




**'मुरुड जंजिरा'-नकाशा (सौजन्य-Cities2 Explore.com)**

**सिद्दी मलिक अंबर:**

13 व्या शतकात भारतीय किनारपट्टीवरुन गुलामांच्या व्यापाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले होते. या अफ्रिकन गुलामांना हबशी किंवा सिद्दी म्हटले जात असे. शारिरीकदृष्ट्या कणखर, सहनशील असणाऱ्या सिद्दींमध्ये शारिरीक कष्टाची कामे करण्याची क्षमता जास्त असल्याने त्यांची खाजगी अंगरक्षक किंवा सैन्यातील मागणी याकाळात वाढली. व्यापारासाठी भारतात आलेल्या पोर्तूगिज, ब्रिटीश, डच व फ्रेंचांनीसुद्धा आफ्रिकन गुलामांनी भरलेली जहाजं भारतीय किनाऱ्यांवर आणली. यातील अनेक गुलामांना भारतातील संस्थानिक व राजे स्वतःचे अंगरक्षक म्हणून ठेऊन घ्यायचे.

मलिक अंबर हा असाच एक गुलाम म्हणुन आणला गेलेला सिद्दी होय. इथिओपिया येथील मुळ असलेल्या मलिक अंबरचा जन्म इ.स. 1549 ला झाला होता. गुलाम म्हणुन सुरू झालेला त्याचा प्रवास पुढे जाऊन 'मूर्तझा निजामशहा दुसरा' या अहमदनगरच्या निजामशहाचा प्रधान होण्यापर्यंतच्या उच्च पदापर्यंत पोहोचला. युद्धशास्त्र आणि प्रशासनात तो पारंगत होता. दख्खन प्रांतातील महसुल व्यवस्थेची घडी त्याने बसवली. औरंगाबाद या शहराची स्थापना मलिक अंबरनेच केलेली आहे.

जंजिऱ्याच्या सिद्धींचे मूळ निवासस्थान हे अँबिसीनियामध्ये असून, सिद्धी हे अतिशय शूर व साहसी होते. त्यांनी अखेरपर्यंत जंजिरा कोणाच्या हाती जाऊ दिला नाही. अनेक राजांनी जंजिरा जिंकण्याचे अविरत प्रयत्न केले, परंतु कोणालाही त्यात यश मिळाले नाही. असा हा अजिंक्य किल्ला 3 एप्रिल, 1948 रोजी भारतीय संघराज्यात विलीन झाला.



**किल्ले जंजिरा (सौजन्य ई-नवभारत )**

**मुरुड जंजिरा किल्ल्याची रचना:**

समुद्रकिनाऱ्यापासून जंजिरा किल्ल्याची उंची सुमारे 90 फूट आहे, तर पायाची खोली अंदाजे 20 फूट आहे. मुरुड जंजिरा किल्ला 22 एकरांवर वसलेला आहे आणि येथे 22 सुरक्षा चौक्या आहेत. जंजिरा किल्ल्याच्या भिंतीची उंची 40 फुट असून याला 26 बुरुज व 19 कमानी आहेत. बुरुजांवर देशी आणि युरोपियन बनावटीच्या अनेक तोफा आहेत. तसेच येथे दोन लहान 18 मी खोलीचे नैसर्गिक गोड्या पाण्याचे तलाव आहेत.

जंजिरा किल्ला आपल्या प्रभावी सागरी स्थापत्यकलेसाठी प्रसिद्ध आहे. उंच भिंती आणि बुरुजांनी वेढलेला हा किल्ला असून त्याचे वैशिष्ट्य म्हणजे स्थानिक गडद बेसाल्ट खडकाचा वापर करून खोदल्यामुळे किल्ल्याला वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप प्राप्त झाले आहे. किल्ल्याच्या भिंती समुद्रातून होणाऱ्या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी तयार करण्यात आल्या असून त्यात किल्ल्यात तोफा आणि बुरुज आहेत. जंजिरा किल्ल्याची सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे तो जमिनीने अक्षरशः दुर्गम आहे. त्याला मुख्य भूमीशी जोडणारे रस्ते किंवा पूल नाहीत. या भौगोलिक एकाकीपणामुळे हा किल्ला शत्रूच्या हल्ल्यांविरुद्ध भक्कम बालेकिल्ला मानला जातो.

17 व्या शतकाच्या उत्तरार्धात जंजिरा किल्ल्याची इमारत पूर्ण झाली. आतून गडाचा बराचसा भाग अजूनही भग्नावस्थेत आहे. कलाल बांगडी, चावरी आणि लांडा कसम या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जंजिरा किल्ल्यातील तीन भव्य तोफा किल्ल्यातील सर्वात उल्लेखनीय आकर्षण आहेत.

त्याशिवाय मुरुड जंजिरा किल्ल्याला दोन महत्त्वाचे दरवाजे आहेत. जेट्टीला तोंड देणारा मुख्य दरवाजा त्याच्या प्रवेशद्वारातून दरबार किंवा दरबार हॉलकडे जातो. पूर्वी ही तीन मजली इमारत होती, परंतु ती आता मोडकळीस आली आहे. समुद्रात उघडणारा 'दर्या द्वार' हा गडाचा पश्चिमेकडील दुसरा दरवाजा आहे.

मुरुड-जंजिरा किल्ला संकुलात अनेक दरवाजे, बुरुज, पाण्याच्या टाक्या, निवासी घरे, मशिदी आणि राज्यकर्त्यासाठी एक राजवाडा यांचा समावेश आहे.

**मुख्य प्रवेशद्वार:**

'महादरवाजा' किंवा 'राजभवन गेट' म्हणून ओळखले जाणारे किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार, किल्ल्याच्या आग्नेय बाजूस असलेली एक भव्य वास्तू आहे. हा दरवाजा किल्ल्यासाठी पूर्वी प्रवेशाचे ठिकाण व नंतर आणि नंतर सैनिकांचे रक्षण याद्वारे केले जात होते. गेटमध्ये कारागिरांच्या कलात्मक कौशल्यांचे प्रदर्शन करणारे गुंतागुंतीच्या कोरीव कामाच्या आकृती आहेत.

**पश्चिम दरवाजा:**

गडाच्या पश्चिमेला किंचित तटाखाली, तटातून बाहेर पडण्यासाठी छोटा दरवाजा आहे यालाच मालाब दर्या दरवाजा असे म्हणतात. संकटकाळी बाहेर पडण्यास याचा उपयोग होत होता. दरवाजाच्या वरच्या भागातच तटबंदीच्या जवळ कैदखाना होता. किल्ल्याला स्वतंत्र असे 22 बुरुज आहेत. आजही ते सुस्थित आहेत.

**सिद्दी पॅलेस:**

मुख्य प्रवेशद्वाराला लागून, सिद्दी राजवाडा हे सत्ताधारी सिद्दी घराण्याचे निवासस्थान होते. या दुमजली वास्तूमध्ये सिद्दी शासक आणि त्यांचे दरबार असल्याचे दिसून येते. येथील राजवाड्यामध्ये बाल्कनी, सुशोभित खिडक्या आणि प्रशस्त खोल्या यांसारखे वास्तुशास्त्रीय घटकांचे अवशेष आजही आपणास सिद्दींच्या जीवनशैलीची आणि भव्यतेची साक्ष देतात.

**किल्ल्यावरील बुरुज:**

मुरुड-जंजिरा किल्ल्याच्या अजेय असण्यामध्ये तेथील बुरुजांचे मोठे योगदान आहे. लष्करीदृष्ट्या जंजिरा किल्ल्याच्या बुरुजांना महत्त्व आहे कारण यावरील तोफांद्वारे शत्रूच्या जहाजांवर प्रतिबंध करता येत असे. या बुरुजांच्या द्वारे शत्रूंच्या हालचालीवर निरीक्षण ठेवता येत असे. बुरुजांवर धनुर्धारी पहारेकऱ्यांचा पहारा दिला जात असे, ज्यामुळे शत्रूवर बाणाद्वारे वचक ठेवता येत असे.

**कलाल बांगडी तोफ :**

किल्ल्यावर उंच अशी तटबंदी असून त्यावर कमानी आणि कमानींवर तोफा ठेवल्या आहेत. या किल्ल्यावर एकूण 572 तोफा आहेत असे म्हटले जाते. त्यामधील एक 'कलाल बांगडी तोफ' म्हणजे 'आगीचा कल्लोळ' आणि धातूच्या बांगड्यानि ही तोफ बनली असून या तोफेची विशेषता म्हणजे हि तोफ उन्हामध्ये देखील गरम होत नाही. ह्या तोफेचे वजन साधारणपणे 21 ते 22 टन असावे.



**कलाल बांगडी तोफ (सौजन्य-महाराष्ट्र भ्रमण)**

**गायमुख तोफ**

कलाल बांगडी तोफेच्या लगेच बाजूला असणारी तोफ म्हणजे गायमुख तोफ. या तोफेची पुढची बाजू गायीच्या तोंडासारखी बनवली आहे म्हणून या तोफेला 'गायमुख तोफ' म्हणतात. या तोफेला 'लांडा कासम' या नावाने देखील ओळखले जाते आणि या तोफेचे वजन 8 टन इतके आहे.

**दर्या दरवाजा:**

या दरवाजाला चोर दरवाजा देखील म्हणतात. गडावर पश्चिमेला तटाखाली एक दरवाजा आहे, जो समुद्रामध्ये निघतो त्याला दर्या दरवाजा म्हंटले जाते. याचा वापर संकट काळी बाहेर पाडण्यासाठी केला जात होता.

**भुयारी मार्ग (सुरुंग):**

या किल्ल्यावर एक भुयारी मार्ग आहे. हा मार्ग 50 ते 60 फुट खोल असलेल्या समुद्राखालून तो राजपुरी गावापर्यंत आहे. पूर्वी या मार्गाचा वापर गुप्त मार्ग म्हणून केला जात होता.

**सुरुलखानाचा वाडा:**

किल्ल्याच्या मध्यभागी 3 मजली पडकी भक्कम बांधणीची इमारत दिसते यालाच 'सुरुलखानाचा वाडा' असे म्हणतात. अनेक वर्षात या वाड्याची मोठ्या प्रमाणावर पडझड झालेली आहे. पूर्वी तो 7 व्या मजल्याचा महाल म्हणून ओळखला जात असे.

**शाही तलाव / गोड्या पाण्यातील तलाव**

जंजिरा किल्ल्यावरती असलेला हा गोड्या पाण्यातील तलाव 60 फूट खोल आहे आणि यालाच 'शाही तलाव' म्हणूनही ओळखले जाते. हा किल्ला समुद्रात असल्याने किल्ल्याच्या चारही बाजूंनी खारे पाणी आहे पण या तलावात मात्र गोडे पाणी आहे. सिद्धींच्या राज्यात या पिण्याच्या पाण्यासाठी या तलावातील पाण्याचा वापर केला जात होता.

**राणीचा महाल:**

सिद्धींच्या राणीचा महल देखील शाही तलावाच्या जवळ होता. राणीच्या महालाला एकूण सात खिडक्या व त्या सात खिडक्यांना सात रंगाची काचे बसवलेली होत. या सात रंगानी या शाही तलावात सात रंगाचे इंद्रधनुष्य तयार होत होते.

**गणेश मंदिर:**

जंजिऱ्याच्या आवारात एक गणपतीचे मंदिर असून पारंपारिक कोरीव काम आणि शिल्पांनी सुशोभित केले आहे.

**पाण्याच्या टाक्या:**

किल्ल्यामध्ये राहणाऱ्या लोकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी येथ अनेक पाण्याच्या टाक्या आहेत. या टाक्यांची रचना पावसाचे पाणी गोळा करून ते दीर्घकाळासाठी साठवण्यासाठी करण्यात आले होते. किल्ल्यातील सर्वात मोठे पाण्याचे टाके 'चांद-सागर' किंवा 'चंद्र तलाव' म्हणून ओळखले जाते, ज्याने किल्ल्यावरील रहिवाशांना पाण्याचा एक महत्त्वाचा स्त्रोत प्रदान केला.

**बाले किल्ला:**

तलावाच्या बाजूने पायऱ्या पार केल्यानंतर बालेकिल्ला लागतो. येथे जवळच एक सदर आहे.

**सदरः**

बालेकिल्ल्याच्या मागे चुनेगच्ची इमारत आहे यालाच सदर असे म्हणतात. बालेकिल्ला तलावाच्या बाजूने बांधीव पायऱ्यांनी थोडे वर गेल्यावर किल्ला लागतो. आज तेथे एक झेंडा वंदनासाठी उभारलेला आहे.

**गडावरील कलाकुसर:**

वाघाच्या तोंडामध्ये आणि पायामध्ये हत्ती पकडले आहेत असे शिल्प येथील भिंतीवर कोरले असून हे शिल्प अमर्याद सागरी सत्तेचे प्रतिक दर्शवितात.

**मूल्यमापन :**

जंजिरा हा किल्ला जंजिरा मुरुड व दिघी या दरम्यान असणाऱ्या खाडीमध्ये बसलेला असून इतर कोणत्याही किल्ल्यांप्रमाणे ओहोटीच्या वेळी त्या ठिकाणी चालत जाता येत नाही. केव्हाही या किल्ल्यात जायचे झाल्यास आपणाला होडीने जावे लागते. या किल्ल्याला ऐतिहासिक अशी पार्श्वभूमी आहे. हा किल्ला प्रथम रामा कोळी आणि अन्य स्थानिक लोकांनी

बांधला. त्यानंतर अनेक स्थित्यंतरे होऊन हा किल्ला सिद्दिच्या ताब्यात आला. हा किल्ला अभेद्य असा आहे. हा किल्ला जिंकण्यासाठी छ. शिवाजी महाराजांनी पुष्कळ प्रयत्न केले, परंतु त्यांना त्यात यश आले नाही. मात्र शिवाजी महाराजांनी सिद्दिवर वचक बसवण्यात यश मिळवले. जंजिरा किल्ल्यावर नजर ठेवण्यासाठी त्यांनी त्या खाडीच्या तोंडावर असणाऱ्या एक खडकावर 'कासा' किल्ला बांधला. अशा तऱ्हेने शिवाजी महाराजांनी सिद्दिवर जरी जरब बसवली तरीसुद्धा जंजिरा काही त्यांना सर करता आला नाही. यानंतर छ. संभाजी महाराजांनी देखील राजपुरीकडून खाडी बुजवण्याचा प्रयत्न करून किल्ला सर करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यातही यश आले नाही. यानंतर छ. संभाजी महाराजांनी हा किल्ला हस्तगत करण्यासाठी या किल्ल्यापासून पाच ते सहा किलोमीटर अंतरावर पद्मदुर्ग नावाचा मजबुत किल्ला उभारला होता. पण तरीही हा किल्ला स्वराज्यात सामिल होऊ शकला नाही. त्यानंतर या ना त्या कारणाने त्या किल्ल्यावर सिद्दीची सत्ता अबाधित राहिली.

पोर्तुगीज, मराठे आणि ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीसह विविध प्रादेशिक व वसाहतवादी सत्तांची अनेक आक्रमणे झाली असली तरी जंजिऱ्याने त्यांचा प्रतिकार केल्याचा गौरवशाली व समृद्ध असा किल्ल्याला इतिहास आहे. त्यानंतर अगदी 1947 नंतर जेव्हा अन्य संस्थाने भारतात विलीन झाली त्या वेळी जंजिरा हे संस्थानदेखील भारतात विलीन झाले व तेथील परकीय राजवट खऱ्या अर्थाने संपली.

**पर्यटकांचे आकर्षण:**

आज, जंजिरा किल्ला एक लोकप्रिय पर्यटक आकर्षण आहे, जो इतिहास, वास्तुकला आणि अरबी समुद्राच्या नैसर्गिक सौंदर्यात रस असलेल्या पर्यटकांना आकर्षित करतो. किल्ल्याचे भग्नावशेष आणि आकर्षक भिंती या किल्ल्याची ऐतिहासिक साक्ष देतात. जंजिरा किल्ल्याचे जतन आणि संवर्धन करण्याची जबाबदारी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाची (एएसआय) आहे, जेणेकरून त्याचा ऐतिहासिक आणि स्थापत्य वारसा भावी पिढ्यांसाठी जतन होईल.

## ब. किल्ले रायगड

**प्रस्तावना :**

हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडालाच 'रायरी' असे म्हणूनही ओळखले जाते. रायगडाची ओळख किल्ल्यांचा राजा अशी केली जाते. स्वराज्याची राजधानी म्हणून मराठी माणसाची अस्मिता व अभिमानाचे प्रतिक म्हणूनही रायगडास महत्त्व आहे. रायगड हा भारताच्या महाराष्ट्र राज्याच्या रायगड जिल्ह्यामधील महत्त्वाचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक डोंगरी किल्ला आहे.

रायगड हा डोंगरी किल्ला आहे. हा महाड तालुक्यात व रायगड जिल्ह्यामध्ये आहे. याचे अक्षांश 18-14' उत्तर व 73-30' पूर्व रेखांश आहे. रायगडाची उंची समुद्रसपाटीपासून 820 मीटर (2,700 फुट) आहे. रायगडचा उल्लेख रायरी, रायगिरी, जंबूद्वीप, राजगिरी, तस रासविरी, इस्लामगड, रायगड, नंदादीप, बदेनूर, भिबेगडी शिवलंका राहीर इ. नावांनी केला जातो. ब्रिटिश लोक याचा अभेद्यपणा पाहून याला 'पूर्वेकडील जिब्राल्टर' म्हणतात. इ.स. 1662 मध्ये या किल्ल्याला 'रायगड' असे नाव देण्यात आले.

**रायगडाचा इतिहास :**

इ. स.च्या 12 व्या शतकामध्ये रायगड एका पाळेगाराच्या ताब्यात होता. पुढे 14 व्या शतकात रायगडच्या मालकाने विजयनगरच्या सम्राटाचे मांडलिकत्व स्वीकारले. इ.स. 1436 मध्ये अलाउद्दीन बहामनीने रायगड जिंकून घेतला. अहमदनगरच्या निजामशाहीच्या ताब्यात हा रायरी डोंगर इ. स. 1479 ते 1636 या काळात होता. इ. स. 1636 मध्ये मोगल बादशाहने हा किल्ला जिंकून आदिलशहाच्या ताब्यात दिला. तेथून तो चंद्रराव मोरेंच्या ताब्यात होता. सन 1656 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळीचे आदिलशाही सरदार चंद्रराव मोरे यांच्याकडून हा किल्ला जिंकून घेतला. इ.स. 1662 मध्ये शहाजी महाराज कर्नाटकातून महाराष्ट्रात आले. त्यांनी आपल्या जहागिरीची पाहणी केली. त्या वेळी रायगड किल्ला भावी काळात राजधानीसाठी उत्तम आहे असे पाहून शिवरायांना किल्ल्याबद्दल सुचविले.


महाराजांनी रायगडाचे संरक्षणाच्या दृष्टीने व भौगोलिक महत्त्व ओळखून त्याची स्वराज्याच्या राजधानीसाठी निवड केली. जंजिऱ्याच्या सिद्दिवर वचक ठेवणे, तळकोकण प्रदेशावर नजर ठेवणे, समुद्रावरील आरमाराकडे लक्ष देणे तसेच महाडसारख्या बाजारपेठेचे व बंदराचे निकट सान्निध्य असल्याने महाराजांनी हा किल्ला कल्याणचा सुभेदार आबाजी सोनदेव आणि उमाजी दत्तो प्रभू-चित्रे यांना बांधण्यास सांगितले. त्यानुसार कल्याणचा सुभेदार आबाजी सोनदेव याने महाराजांच्या हुकमावरून गडावर तीनशे

इमारती बांधल्या. 1674 पर्यंत या किल्ल्याचे बांधकाम चालू होते. या किल्ल्याचे वर्णन तत्कालीन बखरीमध्ये केले आहे. या किल्ल्याला भौगोलिक दुर्गमता प्राप्त झाली आहे. गडाच्या चारी बाजूला तासल्याप्रमाणेकडे आहेत. हा गड दीडगाव उंच आहे. पावसाळ्यात गडाच्या कड्यावर गवत उगवत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडावर भक्कम तटबंदी, बुरूज, धान्याची कोठारे, दारुगोळ्याची कोठारे, पाण्याचे तलाव, राण्यांचे महाल, अष्टप्रधानांचे 'वाडे, नगारखाना, सिंहासन, मंदिरे आदी सर्व गोष्टी महाराजांनी निर्माण केल्या होत्या. याचे भग्नावशेष आजही आपणास पाहावयास मिळतात. रायगडावरील बाजारपेठ ही तर आखीव-रेखीव अशी असून घोड्यावर बसून खरेदी करण्यासारखी आहे. किल्ल्यावर येण्यास एकच मुख्य रस्ता ठेवण्यात आला आहे.

इ.स. 1670 मध्ये शिवरायांनी आपली राजधानी राजगडावरून येथे आणली. याच किल्ल्यावर 6 जून 1674 रोजी शिवरायांचा राज्याभिषेक झाला. 3 एप्रिल 1680 रोजी महाराजांचे निधनही याच किल्ल्यावर झाले. पुढे संभाजीराजे छत्रपती झाले. त्यांनी 9 वर्षे महाराष्ट्राचा कारभार वा गडावरूनच केला. इ.स. 1689 मध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा वध झाला. त्या वेळी महाराणी येसूबाई व युवराज शाहू महाराज याच किल्ल्यावर होते. पुढे 3 नोव्हेंबर, 1689 मध्ये मोगलांनी हा किल्ला जिंकला. रायगड मोगलांच्या ताब्यात गेला.

मोगलांच्यावतीने सिद्दी जोहर किल्ल्याचा कारभार पाहात असे. इ.स. 1733 मध्ये थोरल्या शाहू महाराजांनी हा किल्ला जिंकला, त्या किल्ल्यावर यशवंत पोतनीस यांची शाहू महाराजांनी नेमणूक केली. इ.स. 1733 ते इ.स. 1818 या काळात हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात होता. इ.स. 1818 मध्ये हा किल्ला इंग्रजांनी जिंकला.



**रायगड नकाशा (सौजन्य-Wikimedia.com)**

**<u>रायगडावरील विविध इमारती:</u>**

1. खुबलढा बुरुज:

किल्ल्याच्या वायव्येस खुबलढा बुरूज आहे. हा बुरुज म्हणजे महाराजांच्या दूरदृष्टीची साक्ष आहे. या ठिकाणी शत्रू आल्यास त्याला लढाई करूनच मग वर जावे लागे अशी याची रचना महाराजांनी केल्याचे दिसून येते. या बुरुजाची उंची 8.25 मीटर आहे. त्याचा परीघ 15 मीटर आहे. या बुरुजाला लागूनच चित् दरवाजा नावाचे प्रवेशद्वार आहे.

2. नाना दरवाजा:

नाना दरवाजा म्हणजे गडावर जाण्याचा जवळचा मार्ग आहे याला दोन कमानी आहेत. खुबलढा बुरुजापासून एक किलोमीटर अंतरावर नाना दरवाजा आहे. या दरवाजाची उंची 18 फूट आहे. दरवाजाकडे जाण्यासाठी सतरा पायऱ्या आहेत. दरवाजाच्या दोन्ही बाजूला खंदकात पहारेकऱ्यासाठी खोदलेल्या खोल्या आहेत. इ.स. 1796 मध्ये नाना फडणविसांनी रायगडाची दुरुस्ती केली, तेव्हापासून हा दरवाजा 'नाना दरवाजा' म्हणून ओळखला जातो.

3. धान्य कोठार:

नाना दरवाजातून पुढे गेल्यावर एक किलोमीटर अंतरावर 36 x 24 फूट आकाराची मोठी खोली आहे. बहुधा ही पहारेकऱ्यांची खोली असावी. त्याच्याजवळ 70 फूट लांब x 20 फूट रुंद असे धान्याचे कोठार आहे. या कोठारावर तोफांचा मोर्चा असे. या वास्तूजवळच एक मशीद दिसते. येथेच मदारशहाची कबर आहे. येथून 400 मीटर अंतरावर खडकात 3 गुहा खोदलेल्या आहेत. त्यांचा उपयोग धान्य ठेवण्यासाठी केला जात असावा.

4. महादरवाजा:

धान्य कोठारापासून जवळजवळ 1 किलोमीटर अंतरावर महादरवाजा आहे. दरवाजास 60 व 70 फूट उंचीचे दोन बुरूज आहेत. यांची नावे अनुक्रमे बाजूला जय व विजय अशी आहेत. या दोन्ही बुरुजांवर तोफा व जंग्या आहेत. दरवाजाच्या कमानीवर इस्लामी स्थापत्याचा स्पष्ट प्रभाव दिसतो. कमानीवर दोन्ही बाजूला उत्तम शिल्पे आहेत. महादरवाजाच्या शिल्पावर यादव व विजयनगर वास्तुशिल्पाचा स्पष्ट प्रभाव दिसतो.

5. हत्ती तलाव :

मदारशहाच्या कबरीच्या उजव्या हाताला प्रचंड तलाव आहे. हा तलाव 120 फूट लांब x 30 फूट रुंद आहे. सध्या या तलावात पाणी नाही. या तलावाला 'हत्ती तलाव' म्हणतात.

6. गंगासागर तलाव:

हत्ती तलाव ओलांडून पुढे साधारण 300 फूटांवर गंगासागर आहे. गंगासागर तलाव हा तलाव म्हणजे महाराजांच्या काळातील पाणी योजनाच होय. या तलावातून साऱ्या गडावर पाणीपुरवठा केला जायचा. हा तलाव 350 फूट लांब व 270 फूट रुंद आहे. तो खडकात खोदलेला आहे. हत्ती तलाव, गंगासागर हे दोन तलाव शिवरायांनी खोदले.

7. मनोरे:

गंगासागरपासून 300 फूटांवर दोन मनोरे आहेत. पूर्वी हेच मनोरे पाच मजली होते असे सांगितले जाते. हे मनोरे बारा कोनी (द्वादश कोनी) पायावर उभे आहेत. मनोऱ्याची उंची 40 फूट असून आत पणत्या ठेवण्यासाठी योजना आहे. येथून बालेकिल्ल्यामध्ये जाण्यासाठी दगडी जिना आहे.



**रायगड मनोरे**

8. पालखी दरवाजा:

मनोऱ्याच्या पश्चिमेला बालेकिल्ल्याकडे जाताना एक चिरेबंदी दरवाजा आहे. या दरवाजाला 'पालखी दरवाजा' म्हणतात. सर्व राजकीय महत्त्वाच्या व्यक्तींना वापरण्यासाठी हा पालखी दरवाजा महाराजांनी बांधला होता. त्या दरवाजाची उंची 10 फूट आहे. दरवाजाबाहेर पहारेकऱ्यांना बसण्यासाठी खोल्या आहेत. त्याला 32 पायऱ्या आहेत.

9. मेणा दरवाजा:

पालखी दरवाजामधून चारशे फूट चालून गेल्यावर दक्षिण बाजूस दरवाजा आहे. त्याला 'मेणा दरवाजा' म्हणतात. राजघराण्यातील स्त्रिया किल्ल्याबाहेर जाण्यासाठी या दरवाजाचा उपयोग करीत असाव्यात. मेणा दरवाजामधून बाहेर आल्यावर एक छोटे मैदान आहे. येथून राजघराण्यातील स्त्रिया निसर्गशोभा पाहात असाव्यात असा कयास आहे.

10. राणीवसा:

पालखी दरवाजामधून मेणा दरवाजाकडे जाण्याच्या मार्गावर उजव्या हातास सहा वाड्यांचे अवशेष दिसतात. त्यांना 'राणीवसा' असे म्हणतात.

11. राजभवन :

पालखी दरवाजातून आत गेल्यावर डाव्या बाजूस सिंहासनाकडे जाण्यास रस्ता आहे. पूर्व बाजूस तटबंदी असून 30 फूट रुंदीची एक जागा आहे. किल्ल्यावरील राजकीय कार्यालयाकडे जाण्याचा मार्ग येथूनच आहे. येथील मोकळ्या जागेतून बालेकिल्ल्यात प्रवेश करता येतो. बालेकिल्ल्यामध्ये 90 x 35 फूटांचा चौथरा आहे. ही बहुधा राजभवनाची इमारत असावी. या चौथऱ्याच्या उत्तरेकडे पाण्याचे दोन हौद आहेत. या दोन हौदांच्या पुढे आणखी दोन प्रशस्त हो बांधलेले आहेत. हे सर्व हौद ओलांडून गेल्यावर उत्तरेकडील तटाला एक दरवाजा आहे.

12. रत्नशाळा:

राजभवनाच्या पूर्वेकडे काही अंतर चालून गेल्यावर एक तळघर आहे. त्याचा आकार 18 फूट x 9 फूट असा आहे. ही जागा रत्नशाळा म्हणून ओळखली जाते. तळघरात उतरण्यासाठी 12 पायऱ्यांचा जिना आहे. पायऱ्या उतरल्यानंतर तळघरामध्ये जाता येते. याचा उपयोग मौल्यवान रत्ने व जडजवाहीर सुरक्षित ठेवण्यासाठी केला जात असावा.

13. सदर:

रत्नशाळेच्या पूर्वेकडे एक प्रशस्त चौथरा असून तेथे खांबाच्या बऱ्याच खुणा आहेत. ही इमारत अष्टकोणी असावी असे तेथील अवशेषांवरून वाटते. 91 कलमी बखरीमध्ये उल्लेख केलेली अष्टकोणी इमारत हीच असावी. हा महाल म्हणजे सुप्रसिद्ध सदरच होय.

14. सिंहासनाची जागा:

अष्टकोणी महालाच्या पुढे काही अंतर चालून गेल्यावर, चौथऱ्याचे अनेक अवशेष आढळतात. विद्वत्तसभा, कल्याण महाल इ. इमारती येथेच असाव्यात. तेथून थोडे पुढे गेल्यावर आपण राज्यसभेच्या पाठीमागे पोहोचतो. या इमारतीवर छत नाही; विटांच्या भिंती मात्र दिसतात. आता तिच्यावर छत नाही. इ.स.1663-64 मधील एका अप्रसिद्ध कागदपत्रामध्ये राजवाड्यावर 20 हजार कौलारूंची शाकारणी केल्याची नोंद मिळते. त्यावरून या इमारतीचे छत कौलारू असावे असे वाटते. सिंहासनाच्या इमारतीमध्ये मध्यभागी 12 फूट लांब x 10 फूट बंद चौथरा आहे. हिच महाराजांच्या सिंहासनाची जागा होय. या इमारतीच्या बाजूस पंधरा फूट रुंदीच्या दोन खोल्या आहेत. त्यांचा वापर बहुधा खजिन्यासाठी करत असावेत. सिंहासन व नगारखाना यामध्ये दोनशे दहा फूटांचे अंतर आहे. तसेच सिंहासनाजवळ हळू आवाजामध्ये बोलले तरी नगारखान्यामध्ये ऐकू येते. राजसभेतील भाषण किंवा आदेश नगारखान्यापर्यंत ऐकू जावे यासाठी अशा प्रकारची व्यवस्था केली असावी.

15. नगारखाना:

सिंहासनाच्या पूर्व बाजूलाच नगारखाना आहे. नगारखान्याची उंची जवळजवळ 50 फूट आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस नक्षीकाम असून शतदल कमळांची शिल्पे आहेत. नगारखान्यावर जाण्यासाठी 29 पायऱ्या असून या ठिकाणाहून सूर्यास्त व सूर्योदय व्यवस्थितरीत्या पाहता येतो. तसेच नगारखान्याच्या गच्चीतून राजगड. लिंगाणा, तोरणा, कागोरी, प्रतापगड व तळगड दिसतो.

16. कुशावर्त तलाव :

कुशावर्त तलाव हे नगारखान्याच्या उजव्या बाजूस काही अंतरावर स्थित आहे. छ. शिवाजी महाराजांच्या काळात या तलावात पाणी मोठ्या प्रमाणात असायचे. चढण्या-उतरण्यासाठी या तलावामध्ये पायऱ्यांची व्यवस्था केली आहे. तलावाच्या काठावर एक महादेवाचे मंदिर आहे. या परिसरामध्ये कवी कलशाचा वाडा होता. याच परिसरामध्ये अठरा कारखाने असावेत.

17. सचिवांची घरे :

कुशावर्त तलावापासून काही अंतरावर श्रीगोंदा टोक आहे. कुशावर्त तलावापासून ते श्रीगोंदा टोकांदरम्यान सचिवांच्या घरांचे अवशेष आढळून येतात. सचिवांची घरे व बालेकिल्ल्याच्या दरम्यान ३ अंधारकोठड्या आढळतात कदाचित येथे गुन्हेगारांना कैदेत ठेवले जात असे.

18. बाजारपेठ:

गडावरील बाजापेठ म्हणजे वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुनाच आहे. पेठेतील दोन्ही बाजूंस दुकानाची रांग आहे. प्रत्येक दुकानाचे माप 13 मीटर लांब व 9.5 मीटर रुंद असे आहे. फक्त उजव्या बाजूच्या रांगेतील शेवटच्या दुकानाची रुंदी 5 मीटर आहे. या दोन रांगांमधून 13 मीटर रुंदीचा रस्ता गेलेला आहे. प्रत्येक रांगेत 22 दुकाने आहेत. प्रत्येक दुकानाचे दोन भाग आहेत. दर्शनी भागात विक्री केली जात असे तर पाठीमागील भागामध्ये माल ठेवला जात असे. डाव्या बाजूच्या रांगेच्या मधोमध एक नागाचे उठावदार शिल्प आहे. आखीव-रेखीव दुकाने कशी असावीत, दुकानांच्या मधला रस्ता असावा, दुकाने किती उंचावर असावीत आदी सर्वांचा बारकाईने विचार करून त्या वेळच्या घोड्यावरून न उतरता खरेदी करता येईल अशा पद्धतीने हे बांधकाम केलेले आहे.

19. पिलखाना:

पिलखाना ही एक महत्त्वपूर्ण वास्तू बाजारपेठेच्या वायव्येस काही अंतरावर स्थित आहे. ही हत्ती बांधण्याची जागा होती. पिलखान्याच्या उजव्या व उत्तर बाजूस घरांचे काही अवशेष दिसतात. येथे शिबंदी ठेवली जात असावी.

20. शिर्काईचे मंदिर:

शिर्काई ही रायगड किल्ल्यावरील मुख्य देवता होय. हे गडावरील प्रसिद्ध देवस्थान असून होळीच्या माळाच्या डावीकडील बाजूस आहे. या मंदिरात अष्टभुजा महिषासुर मर्दिनीची मूर्ती आहे. हेन्री ऑक्सिडेन याच्या रोजनिशीमध्ये होळीच्या माळावर करमणुकीचे कार्यक्रम करीत असल्याचे व पोवाडे गायनाचे कार्यक्रम होत असल्याचा उल्लेख आहे.

21. टकमक टोक –

महाराजांच्या समाधी स्थापासून परत येताना बाजारपेठेपासून काही अंतरावर टकमक टोक लागते. टकमक टोकाजवळ किल्ल्याचा भाग चिंचोळा झाल्याने त्यामुळे सध्या टकमक टोकाच्या इथे कठडे बांधले आहेत. या टोकाच्या पुढे 2000 फूट खोल दरी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात देशद्रोह्याला मोठ्या गुन्हेगाराला या ठिकाणाहून कडेलोटाची शिक्षा दिली जायची. इ. स. 1689 मध्ये रायगडचा किल्लेदार रंगोजी काटकर याने येसाजी व शेदोजी फर्जद यांचा कडेलोट केला होता. येथून कोकणदिवा डोंगर, भिंगाचा किल्ला इ. गोष्टींचे दर्शन पर्यटकांना होते.

22. हिरकणी बुरुज –


हिरा गौळणीच्या कर्तुत्वाच्या गोष्टीमुळे हा बुरुज प्रसिद्ध आहे. गडाच्या पश्चिमेस 60 मीटर खोल हिरकणी बुरूज आहे. गडावर दूध घालावयास आलेली हिरकणी गवळण सूर्यास्तानंतर गडाचे दरवाजे बंद झाल्यानंतर आपल्या लहान बाळाच्या ओढीने या जागेवरून किल्ला उतरून घरी गेली होती; त्या वेळी तिच्या शौर्याचा गौरव म्हणून जरी महाराजांनी तिला साडीचोळी दिली असली तरी एक स्त्रीदेखील या बुरुजावरून खाली जाऊ शकते म्हणजेच गडाची सुरक्षितता किती कमकुवत आहे हे लक्षात घेऊन त्यांनी हा हिरकणी बुरूज अधिक भक्कमपणे बांधून घेतला.

23. जगदिश्वर मंदिर-

बाजारपेठेपासून साधारणपणे पाऊण किलोमीटर अंतरावर जगदिश्वराचे मंदिर आहे. हे मंदिर बांधताना मुगल आणि हेमाडपंती शैलींचा वापर झालेला आढळतो. या देवळावर कळस असून दरवाज्यावर दोन्ही बाजूस मिनार आहेत. जगदिश्वर मंदिराची लांबी 10.60 मीटर व रुंदी 6.70 मीटर असून त्याची उंची 5.50 मीटर आहे. जगदिश्वर मंदिर हे चिरेबंदी दगडामध्ये बांधले असून मंदिराचे

गर्भगृह 5 मीटर लांबी रुंदीचे आहे. येथील गर्भगृहामध्ये भिंतीला लागून मारुतीची मूर्ती असून प्रवेशद्वाराजवळ नंदी व गर्भगृहामध्ये शिवलिंग आहे. प्रवेशद्वारासमोर एक मोठे कासव कोरलेले आहे.

या मंदिराच्या उंबरठ्यावर कोरीव लेख आहे ज्यानुसार हिरोजी इंदलकर यांनी शिवरायांच्या आज्ञेवरून शके 1596 मध्ये मंदिर बांधल्याचा पुरावा प्राप्त होतो. मंदिराभोवती 47 मीटर लांब व 36 मीटर रुंद तट आहे. या तटास दोन दरवाजे असून पूर्व बाजूस मोठा तर पश्चिम बाजूस लहान दरवाजा आहे.



**जगदिश्वर मंदिराच्या पायरीवरील लेख**

24. शिवरायांची समाधी:

किल्ल्यावरील शिवरायांची समाधी ही अत्यंत महत्त्वाची वास्तू आहे. महाराजांची समाधी या जगदीश्वराच्या मंदिरासमोरच महाराजांची समाधी आहे. जगदीश्वर मंदिराजवळ शिवरायांचा अंत्यसंस्कार केल्याचा उल्लेख 91 कलमी बखरीमध्ये आहे. याच ठिकाणी महाराजांना अग्नी देण्यात आला. जिथे अंत्यसंस्कार करण्यात आला तिथे अष्टकोनी चौथरा बांधण्यात आला; परंतु चौथऱ्यावर छत्री उभारण्यात आली नाही. जरी ती उभारण्यात आली असली तरी 1818 मध्ये इंग्रजांच्या रायगडावरील तोफांच्या भडिमारामध्ये नष्ट झाली असावी. इ. स. 1926 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार पूर्ण करण्यात आला. अष्टकोनी चौथऱ्यावर मध्यभागी छत्री उभारून तिला घुमट बांधून त्यावर कळस बसविला आहे. चौथऱ्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यात आला. बाजूलाच महाराजांच्या आवडत्या कुत्र्याची- ‘वाघ्याची’ समाधी आहे.




**छ.शिवाजी महाराज यांची समाधी**

**मूल्यमापन:**

1869 साली महात्मा फुले यांनी मराठी भाषेतील शिवचरित्र (पोवाडा रूपी) लिहून प्रकाशित केले आणि छ. शिवाजी महाराजांचा अभिमानास्पद वारसा घराघरात पोहोचवला. छपाईची सुरूवात झाल्यापासूनचे मराठीतले हे पहिले शिवचरित्र मानले जाते. 1880 साली महात्मा ज्योतिबा फुले पुण्यातून चालत रायगडावर गेले. तिथे झाडा-झुडपात हरवलेली आणि पालापाचोळयात दिसत नसलेली शिवरायांची समाधी ज्योतिबा फुले यांनी मोठ्या कष्टाने शोधून काढली. त्याठिकाणी साफसफाई केली व शिवरायांच्या समाधीवर फुले वाहिली. ही माहिती जोतिरावांनी पुण्यात येऊन सारसबाग जवळ असलेल्या हिराबागेत आयोजित केलेल्या शिवसमाधी विषयक सभेत स्वतः सांगितल्याची नोंद मिळालेली आहे. या सभेत साफळकर स्वामी, गंगारामभाऊ म्हस्के आदी मान्यवर पुणेकरांची भाषणे झालेली होती. यावरून शिवरायांची समाधी महात्मा फुले यांनी शोधून काढल्याचे महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तावेज उपलब्ध झाले आहेत.

रायगडावरच्या महाराजांच्या समाधीची दुर्दशा 'जेम्स डग्लस' नावाच्या ब्रिटिश व्यक्तीने 1883 साली नोंदवली. त्याच सोबत गोविंद बाबाजी जोशी यांनी लिहीलेलं 'रायगड किल्ल्याचे वर्णन' हे पुस्तक 1885 मध्ये प्रसिद्ध झालं आणि त्यामुळे अस्वस्थता पसरली. याचा परिणाम म्हणून 1885 साली रावबहादूर जोशी, लोकमान्य टिळक, न्या. तेलंग, न्या. रानडे, न्या. कुंटे यांनी पुण्यात सभेचे आयोजन करुन समाधी जिर्णोध्दाराचं सुतोवाच केल्याचं थोरात यांनी म्हटलं आहे.

लोकमान्य टिळकांच्या पुढाकाराने श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाची स्थापना सन 1895 मध्ये झाली. ज्याच्या स्थापनेची प्रमुख दोन उद्दिष्टे होती. पहिले म्हणजे गडावरील समाधीची व इतर वास्तुंची देखभाल, दुरूस्ती व जीर्णोध्दार आणि दुसरे म्हणजे शिवपुण्यतिथीचा अभिवादन कार्यक्रम करणे, शिवचरित्राचा प्रचार, प्रसार करणे. लोकमान्य टिळकांनी शिवजयंतीला सार्वजनिक रूप देऊन त्याचे चळवळीमध्ये रूपांतर केले आणि आपला सहभाग देऊन त्यांनी हा उत्सव आणखी मोठा केला.

इंद्रजित सावंत यांनी रायगडावरील शिवाजी महाराजांच्या समाधीचा इतिहास सांगणारा 'शिवछत्रपतींच्या समाधीचा शोध व बोध' हे पुस्तक लिहिलं आहे. रायगडावरील शिवाजी महाराजांच्या समाधीची बिकट अवस्था महात्मा ज्योतीबा फुले यांनी समोर आणल्याचा नोंद असल्याचेही इंद्रजित सावंत यांनी म्हटले आहे.

रायगड किल्ल्याची उंची पाहता पायऱ्या चढून जाणे सर्वांना शक्य नसल्याने पायवाटेबरोबरच रोप वे ची सोय पर्यटकांसाठी करण्यात आली आहे. किल्ल्याचे वर्णन करण्यापेक्षाही किल्ला प्रत्यक्ष पाहणे हा मोठा प्रेरणादायी अनुभव आहे.



**रायगड येथील छ. शिवाजी महाराजांचे राजसिंहासन**

**क. दौलताबादचा किल्ला / किल्ले देवगिरी:**

**प्रस्तावना:**


सह्याद्रीच्या पुर्वकडे पसरलेल्या रांगेमध्ये अंकाई, टंकाई, राजधीर असे काही प्रसिद्ध व वैशिष्टपूर्ण किल्ले आहेत. या रांगेच्या माथ्यावर असलेला शेवटचा अजोड किल्ला म्हणजे दौलताबाद देवगिरी. जी यादवांची राजधानी म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. महाराष्ट्र हे दुर्ग व किल्ल्यांसाठी प्रसिद्ध असलेले राज्य आहे. महाराष्ट्रातील अनेक अप्रतिम उत्कृष्ट व दुर्गम किल्ल्यांमध्ये देवगिरी किल्ल्याचा उल्लेख करावा लागेल. देवगिरीचा किल्ला म्हणजे इतिहासातील अनेक घटनांचा, अंतर्गत कलह व दगलबाजीचा अनेक राजकीय सत्तांतराचा जणू मुख्य साक्षीदारच आहे. बाराव्या-तेराव्या शतकामध्ये महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण देशाच्या विस्तृत भागाचे सत्ताकेंद्र याठिकाणी एकवटलेले होते. देवांचा पर्वत म्हणजे देवगिरी तर धनसंपत्ती दौलत यांची विपुलता म्हणजे 'दौलताबाद' होय. देवगिरी किल्ला हा भुईकोट व गिरीदुर्ग या दोन्ही प्रकारात मोडतो. देवगिरीचा किल्ला म्हणजे जणू दक्षिणेचा रक्षकच होय.

दक्षिण भारतावर मुस्लिम सत्ताधिशाचे पहिले आक्रमण देवगिरीवर झाले. देवगिरीच्या यादवाचा 1296 मध्ये पराभव करुन अल्लाउद्दीन खिलजीने महाराष्ट्रातील वैभवशाली हिंदू राज्याचा पराभव केला व त्याचा नाश घडवून आणला. देवगिरीचा किल्ला म्हणजे यादवाची राजधानी मुस्लिम सत्ताधिशांच्या हातात गेली. तेंव्हापासून मराठवाडा मुक्तिसंग्राम किंवा हैद्राबाद मुक्तिसंग्राम (1948) यशस्वी होईपर्यंत देवगिरी किल्ला व परिसर हा मुस्लिम सत्ताधिशांच्या ताब्यात होता. या कालखंडात यादव, खिलजी, तुघलक, बहामणी, नगरचा निजामशहा, मुघल, मराठे व हैद्राबादचा निजाम या सत्ताधिशांच्या ताब्यात देवगिरीचा किल्ला होता. महाराष्ट्रात मध्ययुगामध्ये एकाच किल्यावर इतक्या सत्ताधिशांनी ताबा मिळवला ही महाराष्ट्रातील इतिहासातील एकमेव घटना आहे असे दिसून येते. यावरुन आपणास देवगिरीचे महत्त्व समजते. मुस्लिम राजवट सर्वात जास्त काळ महाराष्ट्रामध्ये याच परिसरात होती. या किल्ल्यात राजकीय व सांस्कृतिक घटनांचा साक्षीदार देवगिरी किल्ला आहे. यादवाची राजधानी, भारतीय साम्राज्याची म्हणजेच तुघलक काळातील राजधानी ते तुरुंग असा वैभवाचा व विपण्णावस्थेचा कालखंड या किल्ल्याच्या वाट्याला आले.

**देवगिरीचे ऐतिहासिक महत्त्व :**

यादव कुळ देवगिरीवर नांदू लागले, या कुळात भिल्लम, सिंघण, कृष्ण, महादवेराय यासारखे प्रबळ आणि नीतीमंत राजे नांदून गेले. त्यांच्या काळात यादव सत्तेची खुप भरभराट झाली. राजा भिल्लम यादव याने मुख्य दुर्गा भवती प्रचंड आणि मजबुत असा भुईकोट बांधला. राजा भिल्लम यादव यांनाच 'देवगिरी, पुरवर, पुरंदर' अशी बिरुदावली होती. त्यामुळे या किल्ल्यालाही राजाच्या नावानेच संबोधले गेले आहे. देवगिरीला प्राचीन काळी 'सुरगिरी' असे संबोधले जात होते. देवगिरीच्या ऐश्वर्य व संपन्नतेची तुलना इंद्रनगरीशी केल्याचे वर्णन ऐतिहासिक ग्रंथांमध्ये प्राप्त होतात.

खोलेश्वर, चिचणदेव, शंकर असे पराक्रमी सेनापती यादवांच्या काळात गाजले. गोविंदप्रभु हा चक्रधराचा गुरू यादवांच्या राज्यातच होवून गेला. प्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्य आणि 'रुक्मिणी स्वयंवर' या ग्रंथाचा कर्ता नरेंद्र हे देखील याच राज्यात होऊन गेले. महाराष्ट्र कुळींचा तन्मणि 'ज्ञानेश्वर' माऊलीने आपला 'ज्ञानेश्वरी' हा जगविख्यात ग्रंथ यादवराजा रामचंद्र यांच्या काळात 'नेवासे' येथे लिहिला.



**दौलताबादचा किल्ला**

**देवगिरीचे भौगोलिक स्थान :**

दौलताबाद म्हणजेच देवगिरी दक्षिणेकडे 19$^{0}$57'17’’ तर पूर्वेकडे 750$^{0}$15' 43" वर वसले आहे. देवगिरीचा किल्ला हा औरंगाबाद शहराच्या ईशान्येस असून तो 14 कि.मी. अंतरावर आहे. प्राचीन काळी ते गाव प्रतिष्ठानच्या (पैठण) मार्गावर होते. तर आता सध्या ते औरंगाबाद - धुळे मार्गावर आहे. औरंगाबादहून वेरुळला जाताना रस्त्यातच दौलताबाद किल्ला लागतो. या किल्ल्याची उंची पायथ्यापासून सुमारे 221 मीटर आहे. किल्ल्याला भक्कम तटबंदी असून त्याच्या आत किल्ला आहे. त्यामुळे हा किल्ला अभेद्य मानला जातो. इसवी सन 12 व्या व 13 व्या शतकातील महाराष्ट्र व आसपासच्या विस्तीर्ण प्रदेशाची राजकारण, समाजकारण व धर्मकारण या किल्ल्याभोवती फिरत होते.

यादव सम्राट भिल्लम पाचवा याने इसवी सन 1187 मध्ये आपली राजधानी बनवली. 600 फूट उंचीच्या शंखाकृती डोंगरावर हा किल्ला आहे. किल्ल्याच्या बांधणीसाठी डोंगराच्या ठेवणीचा वापर अत्यंत चांगल्या प्रकारे करून घेतला आहे. देवगिरीचे प्राचीन नाव सुरगिरी आहे. या किल्ल्याची देवगड व धारागिरी ही नावे ही इतिहासामध्ये नमूद केलेली आढळतात. त्रिकोणी आकाराचा हा किल्ला उत्तर भारतातून दक्षिण भारतावर होणारे आक्रमण थोपवण्यासाठी मोक्याच्या ठिकाणी आहे.

**किल्ल्याचे वर्णन:**

हा देवगिरी किल्ला डोंगरी असला तरी वास्तू व स्थापत्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास हा किल्ला म्हणजे डोंगरी व भुईकोट किल्ल्याचे मिश्रण दिसते. या किल्ल्याचे स्वरूप दोन्ही प्रकारचे आहे. हा किल्ला मुख्य किल्ल्याच्या पायथ्याशी भुईकोट किल्ल्यासारखा दिसतो. तसेच 215 मीटर उंचीच्या डोंगरावर बांधलेला किल्ला गिरीदुर्ग ठरतो. किल्ल्याच्या पायथ्याचा परिसर म्हणजे एक भुईकोट किल्लाच आहे. तर खंदकाच्या वर उंच डोंगरावर बांधलेल्या किल्ल्याच्या भोवती भक्कम तटबंदी आढळते. यादवांची राजधानी झाल्यापासून हा किल्ला प्रसिद्धीस आला व याचा विकासही झाला. सातवाहन काळात देवगिरीचे नाव देवपोली असे होते.

**देवगिरी किल्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

देवगिरीचा किल्ला नक्की कोणी बांधला, याबाबत फारशी माहिती उपलब्ध नाही. पण, राष्ट्रकूट राजांच्या काळात या किल्ल्याच्या उभारणीला प्रारंभ झाला, असे म्हटले जाते. कारण, याच राष्ट्रकूट राजांच्या काळात एलोरा येथील शिल्प घडत होते. तेंव्हा तेथीलच काही कारागिरांनी संरक्षणाच्या दृष्टीने उत्तम असलेली ही देवगिरी टेकडी निवडली आणि तिच्या उभ्या कडा तासून ही टेकडी किल्ल्यात रुपांतरीत झाली. राष्ट्रकूट घराण्यातील राजा दंतिदुर्ग याच्या काळात हे काम सुरु झाल्याचे सांगितले जाते.

या किल्ल्यात असलेला भुयारी मार्ग, जो अंधारी मार्ग म्हणून ओळखला जातो, तो देखील याच राष्ट्रकूट राजांच्या काळात निर्माण झाला असावा, असे वाटते. राष्ट्रकूटानंतर महाराष्ट्रावर कल्याणी येथील चालुक्य याचे घराणे सत्तेवर आले. पण देवगिरी किल्ल्यावर मात्र यादवांची नियुक्ती झाली. या यादव घराण्यातील राजा भिल्लम-पाचवा याने कर्नाटकातील होयसळ राजघराण्याशी धाखाडजवळ लोककुंडी सोराटूर या ठिकाणी प्रचंड लढाई दिली. नंतर त्याने महाराष्ट्रावर सत्ता प्रस्थापित केली. म्हणजेच देवगिरीवर सत्ता स्थापन केली.

देवगिरी किल्ल्याचा नावांबद्दलही कांही आख्यायिका आहेत. एक वेळा श्री शंकर आणि आदिमाता पार्वती हे दोघे देवगिरीच्या परिसरात सारीपाट खेळायला बसले. खेळत असताना हा डाव पार्वतीने जिंकला. याचा परिणाम म्हणजे शंकराने संसारचा सोडून अरण्यात गेले. तेंव्हा पार्वती त्याच्या मागे गेली. तीने स्वत:चे मूळचे रुप बदलले व शंकराच्या आजूबाजूला फिरु लागली. तिला पाहून शंकर तिच्या प्रेमात पडले. येथे कोणाचाही संपर्क नको म्हणून शंकरांनी इतर देवातांना या परिसरात येण्यास बंदी घातली. तेंव्हा इतर देवतांनी युक्ती केली. जवळच असणाऱ्या डोंगरावर सर्व देवतांनी वास्तव्य केले. या देवाचे ज्या डोंगरावर वास्तव्य होते, तो डोंगर म्हणजे देवगिरी पर्वत होय. जेथे देवांचे निवास होते, तो देवगिरी होय, असे नाव या डोंगरास मिळाले

देवगिरी हा किल्ला दौलताबाद या नावानेही ओळखला जातो. दौलत म्हणजे धन संपत्ती आणि आबाद म्हणजे खुप. जेथे खुप संपत्ती आहे तो दौलताबाद किंवा जो पर्वत धनाने समृध्द आहे, तो दौलताबाद या किल्ल्याचा उल्लेख काही नाण्यांवर फत्तेबाद असा ही आढळतो. अल्लाउद्दीन खिलजीचा मुलगा मुबारक खिलजीने काही काळ येथे वास्तव्य केले. त्याने देवगडचे नाव बदलून कुतुबाबाद असे नाव ठेवले. या प्रसंगाची आठवण म्हणून त्याने कुतुबाबाद टांकसाळीत नाणी पाडली.

**देवगिरीवर विविध सत्ताधिशांच्या काळात घडलेल्या घटना:**

1) **यादव कालखंड:**

यादव हे राष्ट्रकुटाचे मांडली राजे होते. राष्ट्रकुटानंतर देवगिरीवर यादवाची सत्ता होती. अल्लाउद्दीनच्या आक्रमणापैकी देवगिरीवर 'रामदेव' यांची सत्ता होती. अल्लाउद्दीन जेंव्हा देवगिरी येथे पोहचला, तेंव्हा त्याला फारसा प्रतिकार झाला नाही. कारण त्यावेळी त्याचे सैन्य बाहेर कुठेतरी लढण्यात गुंतले होते.

**2) अल्लाऊद्दीन खिजलीची दक्षिण स्वारी:**

अल्लाउद्दीनचा प्रतिकार करण्यासाठी रामदेवरायाने दोन-तीन हजार सैन्यासोबत लढण्यास तयार झाला. त्या हल्ल्याच्या गडबडीत किल्ल्यामध्ये धान्याऐवजी मिठाची पोती भरली. निरुपाय होवून रामदेवरायाने शरणागती पत्करली. रामदेवपुत्र शंकरदेवाने शर्थीची झुंज देवूनही शेवटी त्यास पराभव स्वीकारावा लागला.

रामदेव पुत्र सिंघणदेवाने ही मागणी अमान्य केली व युध्दास तयार झाला व या झालेल्या युध्दात रामदेवाचा पराभव झाला व तेंव्हा या उभय पक्षात तह होऊन 600 मण सोने, 7 मण पावळे, 2 मण जवाहीर अशा वस्तु रामदेवाने अल्लाउद्दीनला देण्याचे ठरले. ठरल्याप्रमाणे अल्लाउद्दीनने दौलताबाद मधील भरपूर संपत्ती घेऊन दिल्लीला गेला. या लुटीत अल्लाउद्दीनने रामदेवराय याची कन्या जेठाई हीस घेऊन गेले व तिच्याशी विवाह केला. जेठाईबद्दल असे सांगितले जाते की, ही कन्या दिसण्यास सुंदर होतीच, पण संगीत विद्येतही ती प्रख्यात होती. तिने आपल्या संगीत विद्येचे धडे राजा रामदेवरायांच्या दरबारात असलेल्या गोपाल नायक या संगीत तज्ञाकडून घेतले होते. ती रागविद्येची आपल्या कुलदैवताप्रमाणे भक्ती करीत असे. ती उत्तम वीणावादक असल्याचा उल्लेख छिदाईवार्ता या ग्रंथातुन मिळते.

दक्षिण भारतातील पहिले आक्रमण करुन अल्लाउद्दीनने रामदेवरायांस आपले मांडलिकत्व स्विकारण्यास भाग पाडले. यामध्ये खिलजीने आपली सत्ता दक्षिणेमध्ये स्थिर केली. लढाईत झालेल्या कराराप्रमाणे काही वर्षे रामदेवराय याने खंडणी दिली पण खिलजी मुघलांविरुध्दच्या संघर्षात गुंतल्याचे दिसता त्याने खंडणी देण्याचे बंद केले. परिणामी अल्लाउद्दीनने इ.स. 1307 मध्ये आपला सेनापती मलिक काफूर यास देवगिरीस पाठवले हे देवगिरीवरचे दुसरे आक्रमण होते.

मलिक काफूरच्या सैन्याने देवगिरीच्या आजुबाजूचा प्रदेश लुटला. यावेळी रामदेवराय याने पाहत बसण्याशिवाय काही केले नाही. असे म्हणतात की दक्षिण हिंदुस्थानात इस्लाम व सुफी पंथांचा प्रसार या किल्ल्यापासूनच झाला व त्याचा प्रारंभ अल्ला उद्दीमने केला. यादव कुळाच्या वैभवास ग्रहण लागले. पुढे शंकरदेवाने अलाउद्दीनाची सत्ता झुगारायचा प्रयत्न कला. पण मलिक काफुर या दिल्लीपतीच्या सेनापतीच्या हाते शंकरदेवही मारला गेला.

**3) हरपालदेव :**

दक्षिणेतील राजाच्या चुकीमुळे दक्षिणेतील राज्याला अल्लाउद्दीनपुढे खुप मोठी किंमत चुकवावी लागली. रामदेवाचा जावई व चालुक्य घराण्यातील वीरपुरुष हरपालदेव याने देवगिरीचा ताबा घेतला आणि आपण राजा असल्याचे जाहीर केले.

**4) कुतूबुद्दीन मुबारक :**

1316 मध्ये दिल्लीची सत्ता कुतबुद्दीन मुबारक याच्या हाती गेली. त्यावेळी त्याने पुन्हा देवगिरीवर आक्रमण केले व हरपाल देवाला अटक करुन अपमानास्पद स्थितीत म्हणजे अक्षरश: त्याच्या देहाची कातडी सोलुन, क्रुरपणे ठार मारण्यात आले.

**5) तुघलक सत्ता :**

खिलजी घराण्यानंतर दिल्ली येथे तुघलक घराण्याची सत्ता स्थापन झाली. गियासुद्दीन तुघलक हा या घराण्याचा संस्थापक मानला जातो. त्याने आपला पुत्र उलूघ बेग याला देवगिरीचा सुभेदार म्हणून नेमले. हाच पुढे महंमद बीन तुघलक किंवा वेडा मुहंमद म्हणुन ओळखला गेला. प्रारंभीची काही वर्षे तो देवगिरी येथे राहिल्यामुळे त्याला देवगिरीचे महत्त्व कळले.

मुहमद तुगलकाच्या काळात संपूर्ण हिंदुस्थानावर वचक ठेवण्यासाठी हिंदुस्थानच्या मध्यभागी राजधानी करावी, असा त्याचा विचार होता. या विचारानुसार नव्या राजधानीसाठी दौलताबादची निवड करण्यात आली. त्याप्रमाणे तुघलकाने आपली राजधानी दिल्लीहून इ.स. 1327 मध्ये दौलताबाद येथे हलविली. परंतु योग्य नियोजना अभावी दौलताबादला राजधानीच्या दर्जा लाभला नाही. ती पुन्हा दिल्लीला हलवण्यात आली.

**6) बहामनी सत्ता :**

मुहमद तुघलकाच्या ढिसाळ कामगिरीमुळे त्याच्या विरुध्द अनेक सरदारांनी बंड केले. अल्लाउद्दीन हसन गंगु बहामणी हा महंमद तुघलकाच्या काळातील देवगिरी येथे सुभेदार होता. त्याने देवगिरी येथे असतानाच महंमद तुघलकाविरुध्द बंड केले

आणि नवीन बहामनी राज्याची स्थापना इ.स.1347 मध्ये केली. विशेष म्हणजे त्यांचा राज्यारोहण समारंभ हा देवगिरी किल्ल्यातच झाला. काही काळानंतर त्याने आपल्या बहामनी राज्याची राजधानी गुलबर्गा येथे नेली.

**7) अहमदनगरचा निजाम:**

बहामनी साम्राज्याच्या अस्तानंतर देवगिरीचा ताबा अहमदनगरच्या निजामशहाकडे गेला. अहमदनगरच्या पाडावानंतर त्यात प्रामुख्याने चांदबिबीच्या मृत्युनंतर मलिक अंबरने निजामशाहीची राजधानी अहमदनगरहून दौलताबाद येथे स्थलांतर केले. परंतु मुघलांनी मलिक अंबरचा पराभव केल्याने त्याला खडकी (औरंगाबाद) येथे स्थलांतर व्हावे लागले. त्यावेळी देवगिरीचा विकास करताना मलिक अंबरला अनेक स्थानिक मराठा सरदारांची मदत झाली. यात शहाजी भोसले, मालोजी भोसले, परमोजी भोसले, खेलोजी भोसले यांचा समावेश होता. आजही त्यांच्या नावाने औरंगाबादच्या 52 पुऱ्यांमध्ये मालोजीपुरा, परसोजीपुरा, खेलोजीपुरा असे अवशेष पहायला मिळतात.

**8) मुघल सत्ता:**

मलिक अंबरच्या मृत्युनंतर मोगलांनी दौलताबाद हा किल्ला इ.स.1635 मध्ये जिंकून घेतला आणि आपले वर्चस्व तेथे प्रस्थापित केले. इ.स. 1636 मध्ये शहाजहान बादशहा काही महीने देवगिरी किल्ल्यावर मुक्कामास होता.

औरंगजेबांनी खडकी या गावाला औरंगाबाद हे नाव दिले. अत्ताउल्ला या स्थापत्यकाराच्या आणि हस्तपतराय या अभियंत्याच्या मार्गदर्शनाखाली औरंगजेबाने बीबी का मकबरा बांधला. ही वास्तु अतिशय भव्य आणि देखणी असून ती खाम नदीच्या काठावर दिमाखाने उभी आहे. मुघल शैलीतील वास्तूंचा वारसा सांगणारी ही अंतिम वास्तू आहे.

औरंगजेबाचे असे म्हणणे होते की, त्याच्या मृत्युनंतर त्यांची समाधी खुलताबाद येथे करावी. त्याच्या इच्छेने खुलताबाद येथे त्याची कबर बनवली गेली. म्हणूनच दौलताबादचे महत्त्व कमी होऊन खुलताबादचे व औरंगाबादचे महत्त्व वाढीस लागले. दौलताबादबद्दल असेही सांगितले की, औरंगजेबची पहिली पत्नी बेगम शहाजहान सफवीच्या घराण्यातील देखणी स्त्री होती. तिला दौलताबाद परिसराबद्दल घृणा होती. हा परिसर तिला मुळीच आवडत नव्हता. म्हणून तो तिच्यासह दौलताबाद सोडून औरंगाबादला आला आणि पुढील काळात तर औरंगजेब आणि औरंगाबाद या एका नाण्याच्या दोन बाजू झाल्या.

दौलताबादचा किल्लेदार सय्यद मुबारकखान हा औरंगजेबला इ.स. 1682 मध्ये भेटला तेंव्हा औरंगजेबाने त्याला खिलजीची वस्त्रे दिल्याची नोंद मासिरे आलमगिरी या ग्रंथात केलेली आढळते.

दौलताबादचा किल्लेदार सय्यद मुर्तजाखान याने बादशहाकडे अर्ज केला की, आपला बंधु अतिशखान हा बीडच्या फौजदाराकडे आहे. त्याची बदली दौलताबाद येथे करावी ही विनंती औरंगजेबाने मान्य केली नाही. वरील घटनावरुन दौलताबाद आणि औरंगजेब यांचा संबंध स्पष्ट होतो.

9. **मराठे:**

छ. शिवाजी महाराजांनी देवगिरीपेक्षा रायगडला महत्त्व जास्त दिले. 1760 मध्ये मराठे व निजाम यांच्यात उदगीर येथे लढाई झाली. या लढाईत निजामाचा पराभव झाला व उदगीर तह झाला. या तहाप्रमाणे दौलताबाद किल्ला मराठ्यांना देण्याचे ठरले. पण उत्तरेत मराठ्यांच्या पराभवाच्या बातम्या ऐकताच निजामाने किल्ला देण्यास टाळाटाळ केले. त्यावेळी निजामाला धडा शिकविण्यासाठी नानासाहेब पेशव्यांनी गोपाळराव पटवर्धन यांना पाठवले. पण गोपाळराव पटवर्धन यांनी किल्ला घेण्यास टाळाटाळ केली. तेंव्हा नानासाहेब पेशवे एका पत्रात गोपाळराव पटवर्धन यांना लिहतात, "तुमचा स्वभाव रागीट, यास्तव इतके दिवस सख्त लिहिले नाही. आता वारंवार तुम्ही विचार लिहून लागला, तेंव्हा नाइलाज जाणून लिहले आहे हे पत्र. कोणास ठाऊक नाही, लेकरादाखल सेवकावर एकान्ती रागे भरण्यास वाईट मानू नये."

नानासाहेब पेशव्याच्या मृत्युनंतर गोविंदराव पटवर्धन माधवराव पेशव्यांना पत्र लिहतात. ते म्हणतात की, "दौलताबाद ज्याकडे असते, त्याचे कल्याण होणार नाही. सहा महिने नाही गेले, तो श्रीमंत भाऊसाहेब यांचा मृत्यू झाला. वर्ष नाही भरले तो श्रीमंत नानासाहेब कैलासवासी झाले. याकरिता श्रीमंतांनी तो मोगलास देऊन टाकावा."

विशेष म्हणजे पेशव्यांनी हा सल्ला मानलेला दिसतो. कारण, दिनकर बल्लाळ यांच्याकडे पेशव्यांनी दौलताबादचा अंमल सोपविला होता. तेंव्हा पेशवे त्याला 1716 मध्ये कळवितात की, आता हा किल्ला निजामाकडे देण्यास ठरविले आहे. तेंव्हा किल्ला निजामाकडील पत्र घेऊन येणाऱ्या इसमाकडे सोपवावा म्हणून आज्ञा. वरील गोष्टीवरुन मराठ्यांचा व पेशव्यांचा दौलताबाद किल्ल्याविषयीचा दुषित दृष्टीकोन दिसून येतो.

10) **हैदराबादचा निजाम:**

मोगल साम्राज्याच्या ऱ्हासानंतर इसवी सन 1724 मध्ये हैदराबाद येथे आसफशाही स्थापन झाली. यानंतर दौलताबाद किल्ल्यावर निजामाचे वर्चस्व निर्माण झाले.1760 मध्ये उदगीरच्या लढाईनंतर निजाम व मराठे यांच्यामध्ये झालेल्या तहानुसार औरंगाबाद व दौलताबादचा प्रदेश व हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला. परंतू दोनच वर्षांनी पेडगावच्या तहाने हा किल्ला पुन्हा निजामाच्या ताब्यात गेला. सवाई माधवराव पेशवे यांच्या कारकिर्दीत देवगिरीचा किल्ला पेशव्यांनी हैदराबादच्या निजामाकडे सुपूर्द केला. त्यानंतर तो 1948 पर्यंत हैदराबादच्या निजामाच्या ताब्यात होता. हैदराबादला निजामाच्या ताब्यातून सूटका मिळवून देण्यासाठी 1937 मध्ये कै. रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हैदराबाद मुक्तिसंग्रामाची स्थापना झाली. भारताला स्वातंत्र्य मिळून सुध्दा हैदराबाद येथील जनतेस स्वातंत्र्य उपभोगता आले नाही. निजामाने जनतेवर केलेल्या अन्यायाच्या कहाण्या दिल्लीला पोहचल्यानंतर केंद्र सरकारने वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली कारवाई करुन 17 सप्टेंबर 1948 रोजी देवगिरीचे दास्यत्व संपुष्टात आले. पोलीस कारवाईनंतर हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. याबरोबरच दौलताबाद किल्ला महाराष्ट्रात आला.

थोडक्यात, मध्ययुगात यादव काळात देवगिरी हे धार्मिक व व्यापारी ठिकाण असल्याने त्याला महत्त्व प्राप्त झाले. हे महत्त्व जाणून यादवांनी येथे राजधानी स्थापन केली. संपत्तीच्या आकर्षणातुन अल्लाउद्दीन खिलजीने आक्रमण करुन यादवाचा नाश करुन येथील संपत्ती लुटुन नेली व देवगिरीच्या वैभवाला उतरती कळा लाभली. पुढे मुहमद तुघलकाने देवगिरीचे भौगोलिक व लष्करी महत्त्व ओळखून येथे भारताची राजधानी दिल्लीवरुन हलवली. त्यामुळे पुन्हा वैभव प्राप्त झाले. राजधानी पुन्हा दिल्लीला गेल्यावर हिचे महत्त्व कमी झाले. बहामणी साम्राज्याची स्थापना याच किल्ल्यावर झाली. याच कालखंडात राजकीय घडामोडीचे केंद्र पुन्हा देवगिरीवर आले. त्यांनी राजधानी गुलबर्गा येथे हलवल्यानंतर देवगिरीचे महत्त्व एक लष्करी केंद्र म्हणून राहीले. अशाप्रकारे देवगिरीच्या किल्ल्याच्या ऐतिहासिक महत्वाचे आपल्याला वर्णन करता येईल.

**दौलताबाद / देवगिरीच्या किल्ल्यावरील काही महत्त्वपूर्ण वास्तू:**

दौलताबाद म्हणजेच देवगिरीचा किल्ला हा त्याच्या प्रभावी स्थापत्य आणि ऐतिहासिक महत्त्वासाठी ओळखला जातो. देवगिरीच्या किल्ल्यावर अनेक उल्लेखनीय स्मारके आणि वैशिष्ट्ये आहेत ज्यापैकी पुढील काही महत्त्वपूर्ण वास्तू :

1. **कटक :**

देवगिरी किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या सखल भागाला कटक असे म्हंटले जात असे ज्यामध्ये अनेक इमारतींचे अवशेष आढळून येतात. पूर्वी येथे व्यापारी उलाढाल चालत असे. तसेच नृत्य-गायनाचे कार्यक्रम चालत होते. इब्नबतूताने आपल्या प्रवासवर्नानामध्ये कलावंतांचे आश्रयदाते असणारे यादव राजे नृत्य-गायनासाठी आवर्जून उपस्थित राहात अशी नोंद केली आहे. मुहम्मद तुघलकाने त्याची राजधानी या ठिकाणी वसविली होती.

2. **अंबरकोट :**

देवगिरी किल्ल्यावर असलेल्या तीन तटबंदींपैकी सर्वांत बाहेरची तटबंदी म्हणजे अंबरकोट होय. 16 व्या शतकात निजामाचा सरदार मलिक अंबर याने याची निर्मिती केली म्हणून याला अंबरकोट असे ओळखले जाते. अंबरकोटचा विस्तार मोठा आहे. या कोटास सात मोठे दरवाजे होते. आजही काही दरवाजे चांगल्या स्थितीत आहेत. अंबरकोटामध्येच दौलताबाद गाव वसलेले आहे. अंबरकोटाच्या आतमध्ये महाकोट, महाकोटाच्या आतमध्ये कालाकोट व त्यानंतर खंदक ओलांडून देवगिरीच्या बालेकिल्ल्यात जाता येते.

3. **महाकोट :**

अंबरकोटच्या आत किल्ल्यापर्यंतच्या भागात आणखी तीन कोट बांधले आहेत. त्यामध्ये पहिला महाकोट, दुसरा कालाकोट व तिसरा परकोट होय. महाकोटाच्या तटालाच मक्का व रोझा नावाच्या वास्तू दोन आहेत. पूर्वेकडील वेशीतून आत गेल्यावर ऐकानंतर एक असे तीन दरवाजे दृष्टीस पडतात.

4. **खंदक :**

देवगिरी किल्ल्याच्या सभोवताली खंदक खोदण्यात आलेला असून ज्याची रुंदी 16 मीटर आहे. किल्ल्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने याची निर्मिती केल्याचे दिसून येते.



**किल्ले दौलताबाद खंदक (सौजन्य -Majha Paper)**

**5. चिनी महाल:**

चिनी महाल किंवा 'चायनीज पॅलेस' ही या किल्ल्यातील आणखी एक सम्मोहनीय वास्तू आहे. पर्शिया म्हणजेच सध्याच्या इराणहून आयात केलेल्या सुंदर निळया आणि हिरव्या टाइल्सद्वारे याची निर्मिती केली आहे. त्याच्या भिंतींना सुंदर निळया आणि हिरव्या सिरॅमिक टाइल्सने सजवल्या कारणाने याला चिनी महाल असे हे नाव पडले आहे. 14 व्या शतकात बहमनी सुलतानाच्या राजवटीत चिनी महाल बांधण्यात आला होता. राजघराण्यांतील लोकांसाठी हा महाल विश्रांतीचे ठिकाण असल्याचे दिसून येते.हे एक इंडो-इस्लामिक स्थापत्यकलेचे उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. चीनी महल हा एक कारागृहच होता. ज्या ठिकाणी तानाशाह व त्यानंतर छ. संभाजी महाराजांना कैदेत ठेवले होते. गोवळकोंड्याचा शेवटचा राजा या ठिकाणी 13 वर्षे कैदेत होता.

**6. चांदमिनार:**

चांदमिनार, ज्याला 'टॉवर ऑफ द मून' असेही म्हटले जाते, दौलताबादच्या किल्ल्यातील प्रमुख वास्तूंपैकी एक आहे. चांदमिनार हा दक्षिण भारतातील इंडो-इस्लामिक स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. याची उंची 63 मीटर असून ती 4 मजली आहे. चांदमिनारचा जमिनीकडील घेर 10 मीटरचा आहे. चांदमिनारच्या पायथ्याशी एक छोटी मशीद किंवा प्रार्थनामंडप आहे, जो पर्शियन निळया टाइल्सने झाकलेला आहे. 1435 च्या दरम्यान सुलतान अहमदशहा याने गुजरातवरील स्वारीच्या विजयाप्रीत्यर्थ चाँदमिनार बांधण्यात आला असे काही इतिहासकार मानतात. तर काहींच्या मते, चाँदमिनारचे बांधकाम 1445 मध्ये अल्लाउद्दीन बहामनी याने चाँदमिनार ही वास्तू बांधली. हा मिनार गुंतागुंतीच्या भौमितिक आणि सुलेखन नक्षीकामाने सजावटीमुळे प्रसिद्ध आहे.

7. **हत्ती तलाव :**

दौलताबाद किल्ल्यावर हत्ती तलाव म्हणून ओळखली जाणारी एक मोठी कृत्रिम टाकी असून पाणी साठवण्यासाठी बांधण्यात आले होते. 38 मी. लांबी x 38 मी. रुंदी x 6.6 मी. खोलीचा हा प्रचंड तलाव 'हत्ती तलाव' म्हणून ओळखला जातो. मलिक अंबर हा अहमदनगरच्या निजामशाहीचा मुख्य प्रधान होता ज्याने पाणीपुरवठ्याच्या अनेक योजना राबविल्या. त्याने अहमदनगर, औरंगाबाद येथे तलाव, योजना यशस्वीपणे आमंलात आणल्या. त्याच्या काळातच या तलावाचे बांधकाम झाल्याचे दिसून येते. शाही हत्तींच्या जलविहारासाठी, सैनिकांना पोहण्याचे शिक्षण देण्यासाठी व सरावासाठी तसेच आणीबाणीच्या वेळी पाणी मिळावे याकारणासाठी या तलावाची निर्मिती केली असल्याची इतिहासकारांची मते आपल्याला पाहायला मिळतात.

**8. भारतमाता मंदिर:**

दौलताबाद किल्ल्यातील भारत माता मंदिर ही आणखी एक महत्त्वाची वास्तू मानली जाते. किल्ल्याच्या आत आपल्याला भारत माता मंदिर पाहायला मिळते. हे मंदिर "भारत मातेला समर्पित असून देशभक्ती आणि राष्ट्राप्रती श्रद्धेची भावना

दर्शवते. यादव कालखंडात देवगिरी येथे अनेक मंदिरांची निर्मिती करण्यात आली. मात्र 14 व्या शतकाच्या पूर्वार्धात कुतुबुद्दीन मुबारक खिल्जीने  त्याच्या देवगिरी येथील वास्तव्यात (इ. स. 1318-19) येथील अनेक मंदिरे उद्ध्वस्त करून मंदिराच्या अवशेषावर मशिदींची उभारणी केली. स्वातंत्र्यपूर्व काळात ही जुम्मा मशीद या नावाने ओळखली जाई. सन 1948 हैद्राबाद मुक्ती संग्रामानंतर हैदराबाद संस्थान प्रमुख उस्मानशहा निजामाकडून संस्थान खालसा करून भारतात विलीन केले गेले यानंतर लगेचच स्थानिक लोकांनी अत्यंत तत्परतेने येथे भारतमातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. हेच भारतमाता मंदिर म्हणून ओळखले जाते. या मंदिराच्या आत आपल्याला अखंड भारताचा एकसलग नकाशा पाहायला मिळतो, जो देशाच्या एकतेचे आणि विविधतेचे प्रतीक आहे.म्हणूनच हे आपल्या राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक आहे.

**9. बारादरी:**

देवगिरी किल्ल्यावरील उंच ठिकाणी एक पांढरी प्रशस्त अष्टकोनी इमारत दिसते. हिलाच 'बारादरी' असे म्हणतात. मुघल सुभेदारास उन्हाळ्यात येथे राहता यावे यासाठी या वास्तूची निर्मिती केली असल्याचे सांगितले जाते. पूर्वेकडील या इमारतीस एकूण बारा कमानी आहेत म्हणून यांस 'बारादरी' हे नाव मिळाले. देवगिरी किल्ल्यावरील चांगल्या अवस्थेत असणारी ही अत्यंत महत्त्वपूर्ण वास्तू होय.

10. **मेंढा तोफ:**

अहमदनगरच्या निजामशाही अधिकाऱ्यानी किल्ल्यावर पुष्कळसे महल तयार केले आहेत. त्याकाळात महालांचा उपयोग लक्षात घेता महालांना अनेक विभागात विभागण्यात आले होते. या राजमहालाच्या समोर काही पायऱ्या चढून गेल्यानंतर आपण एका गोलाकार ओट्यावर जावून पोहोचतो. येथे एक मोठी तोफ ठेवलेली आहे. या तोफेची लांबी 7 मीटर असून तोफ चौफेर फिरविता येईल अशा पद्धतीने बसविण्यात आली आहे. या तोफेच्या मागच्या भागावर मेंढयाची आकृती आहे. म्हणूनच हिला 'मेंढा तोफ' असे म्हणतात. या तोफेवर लेख कोरलेला आहे. या लेखात औरंगजेबाचा अधिकारी मोहंमद हुसेन अरबीची कामगिरी स्पष्ट करण्यात आली आहे. या कोरीव लेखामध्ये या तोफेला 'किल्ला- शिकन' म्हणजेच (किल्ला उद्ध्वस्त करणारी) असे म्हटले आहे.



**मेंढा तोफ (सौजन्य -Cityshor)**

**11. पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व:**

देवगिरी किल्ल्याच्या आवारामध्ये राजवाडा, तटबंदी, तोफा आणि असंख्य प्रवेशद्वार अशा इतर अनेक वास्तूंचा समावेश आहे. किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची गुंतागुंतीची संरक्षण यंत्रणा, ज्यात दरवाजे, बोगदे आणि वरच्या किल्ल्यावर तीव्र चढ यांचा समावेश आहे, ज्यामुळे परकीय आक्रमणकर्त्यांना जिंकणे आव्हानात्मक बनले होते. शंक्वाकार टेकडीवर देवगिरी किल्याचे स्थान असून प्रभावी वास्तुकलेमुळे हे भारतातील एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक आणि स्थापत्य स्थळ बनले आहे. हे एक लोकप्रिय पर्यटन स्थळ असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याच्या अंतर्गत संरक्षित स्मारक आहे.

स्मारके, मंदिरे, किल्ले आणि पुरातत्त्वीय स्थळांसह भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संरक्षण करण्याच्या प्राथमिक उद्देशाने ASI (Archaeological Survey of India) ची स्थापना 1861 साली ब्रिटिश राजवटीत झाली. तेव्हापासून अनेक किल्ल्यासह,मंदिरे व ऐतिहासिक स्थळांचे जतन व संवर्धन करण्याचे काम ASI ने केले आहे.



**चांदमिनार -किल्ले देवगिरी (सौजन्य -Miscellaneous Bharat)**

## स्वयं अध्ययनासाठी स्वाध्याय:

**प्रश्न 1. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा**

1. जंजिऱ्याचे खरे नाव जजीरे मेहरुब असे असून तो _______________ भाषेतील शब्द आहे.

अ. फारसी ब. अरबी क. संस्कृत ड. ग्रीक

2. कलाल बांगडी, चावरी आणि लांडा कसम या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तीन भव्य तोफा _______________किल्ल्यातील सर्वात उल्लेखनीय आकर्षण आहेत.

अ. जंजिरा ब. रायगड क. देवगिरी ड. पन्हाळा

3. _______________ तोफ म्हणजे 'आगीचा कल्लोळ' आणि धातूच्या बांगड्यानि ही तोफ बनली असल्याने उन्हामध्ये देखील तोफ गरम होत नाही.

अ. चावरी ब. गायमुख क. कलाल बांगडी ड. मेंढा

4.ब्रिटिश लोक _______________ या किल्ल्याचा अभेद्यपणा पाहून याला 'पूर्वेकडील जिब्रालटर' म्हणतात.

अ. जंजिरा ब. रायगड क. देवगिरी ड. पन्हाळा

5. रायगडावर खालील पैकी _______________ हे तलाव आहेत.

अ. कुर्षावत ब. गंगासागर क. हत्ती ड. वरील सर्व

6. शिर्काई ही _______________ किल्ल्यावरील मुख्य देवता होय.

अ. जंजिरा ब. रायगड क. देवगिरी ड. पन्हाळा

7. _______________ मंदिराच्या उंबरठ्यावरील कोरीव लेखानुसार हिरोजी इंदलकरानी शिवरायांच्या आज्ञेवरून शके 1596 मध्ये मंदिर बांधल्याचा पुरावा प्राप्त होतो.

अ. महालक्ष्मी ब. कार्तिकेय क. शिर्काई ड. जगदिश्वर

8. देवगिरीला _______________ असेही म्हंटले जाते.

अ. सुरगिरी ब. देवगड क. धारागिरी ड. वरील सर्व

9. _______________ च्या किल्ल्यातील प्रमुख वास्तूंपैकी एक 'टॉवर ऑफ द मून' यालाच चांदमिनार असेही म्हटले जाते.

अ. जंजिरा ब. रायगड क. देवगिरी ड. पन्हाळा

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

1. देवगिरीवरील विविध सत्ताधिशांच्या काळात घडलेल्या घटनांच्या माहितीचे विवरण करा.
2. दौलताबाद / देवगिरीच्या किल्ल्यावरील काही महत्त्वपूर्ण वास्तूंची माहिती थोडक्यात लिहा.
3. किल्ले रायगडाचा इतिहास सांगून व पर्यटनदृष्ट्या थोडक्यात महत्त्व विषद करा.

**प्रश्न 3. टिपा लिहा.**

अ. जंजिऱ्याचा इतिहास

ब. जंजिऱ्यावरील वास्तू

क. रायगडावरील जल व्यवस्थापन

# प्रकरण- 6

# परिशिष्टे

## अ. महाराष्ट्रातील महत्वपूर्ण बाबी

| अ. क्र. | महत्वपूर्ण बाबी | | स्थळ |
|---|---|---|---|
| 1. | महाराष्ट्रातील सर्वाधिक पावसाचे ठिकाण | - | अंबोली (सिंधुदुर्ग) |
| 2. | महाराष्ट्रातील सर्वात वेगवान एक्सप्रेस | - | शताब्दी एक्सप्रेस (पुणे - मुंबई) |
| 3. | महाराष्ट्रातील सर्वात मोठे नाट्यगृह / सभागृह | - | षण्मुखानंद सभागृह (मुंबई ) |
| 4. | सर्वात उंच शिखर | - | कळसुबाई शिखर (1646 मीटर) |
| 5. | सर्वाधिक किनारपट्टी लाभलेला जिल्हा | - | रत्नागिरी |
| 6. | सर्वाधिक अंतर धावणारी रेल्वे | - | महाराष्ट्र एक्सप्रेस (कोल्हापूर ते गोंदिया ) |
| 7. | महाराष्ट्रातील सर्वाधिक लांबीची नदी | - | गोदावरी |
| 8. | साखर कारखान्याचा जिल्हा | - | अहमदनगर |
| 9. | सात बेटांचे शहर व भारताचे प्रवेशद्वार | - | मुंबई |

## ब. महाराष्ट्रातील साडेतीन शक्ती स्थाने -

| अ.क्र. | शक्तीपीठ | | ठिकाण |
|---|---|---|---|
| 1. | रेणुका देवी | - | माहूर (नांदेड) |
| 2. | तुळजाभवानी | - | तुळजापूर (उस्मानाबाद) |
| 3. | सप्तश्रृंगी देवी | - | नाशिक |
| 4. | अंबाबाई | - | कोल्हापूर |

## क. महाराष्ट्रातील काही शहरे व समाधी स्थळे :

| अ.क्र. | शहराचे नाव | | समाधी स्थळे |
|---|---|---|---|
| 1. | नांदेड | - | गुरुगोविंद सिंग यांची समाधी |
| 2. | परभणी | - | संत जनाबाईंची समाधी |
| 3. | बुलढाणा शेगाव | - | गजानन महाराजांची समाधी |
| 4. | सातारा | - | सज्जनगड समर्थ रामदासांची समाधी |
| 5. | मंगळवेढा (सोलापूर) | - | संत चोखामेळा व संत दामाजीपंत यांची समाधी |
| 6. | मढी (अहमदनगर) | - | कानिफनाथ महाराजांची समाधी |
| 7. | तेर (उस्मानाबाद) | - | संत गोरा कुंभार यांची समाधी |
| 8. | पावस (रत्नागिरी ) | - | स्वामी स्वरुपानंद |

## ड. भारतातील राष्ट्रीय उद्याने

| अ.क्र. | उद्यानाचे नाव | | ठिकाण |
|---|---|---|---|
| 1. | ताडोबा राष्ट्रीय उद्यान | - | चंद्रपूर |
| 2. | प्रियदर्शनी इंदिरा, पेच राष्ट्रीय उद्यान | - | नागपूर |
| 3. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान | - | बोरिवली (मुंबई ) |
| 4. | नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान | - | गोंदिया |
| 5. | गुगामल राष्ट्रीय उद्यान | - | अमरावती |
| 6. | जिम कॉर्बेट नॅशनल पार्क | - | रामनगर (उत्तरांचल ) |
| 7. | हजारीबाग नॅशनल पार्क | - | हजारीबाग( झारखंड ) |

## <u>ई. भारतातील काही प्रसिद्ध व्यक्ती आणि त्यांची समाधी स्थळे</u>

| अ.क्र. | शहराचे नाव | मृत्यू दिनांक | समाधी स्थळे |
|---|---|---|---|
| 1. | महात्मा गांधी | 30 January 1948 | राजघाट |
| 2. | पंडित नेहरू | 27 May, 1964 | शांतीवन |
| 3. | इंदिरा गांधी | 31 October 1984 | शक्तीस्थळ |
| 4. | लालबहादूर शास्त्री | 11 January 1966 | विजयघाट |
| 5. | राजीव गांधी | 21 May 1991 | वीरभूमी |
| 6. | चरणसिंग | 29 May 1987 | किसानघाट |
| 7. | मोरारजी देसाई | 10 April 1995 | अभय घाट |
| 8. | झेलसिंग | 25 December 1994 | एकता स्थळ |
| 9. | गुलजारीलाल नंदा | 15 January 1998 | नारायण घाट |
| 10. | जगजीवन राम | 6 July 1986 | समता स्थळ |
| 11. | संजय गांधी | 23 June 1980 | शांतीघाट |
| 12. | इंद्रकुमार गुजराल | 30 NOV.2012 | स्मृती स्थळ |
| 13. | अटलबिहारी वाजपेयी | 16 August 2018 | सदैव अटल |
| 14. | शंकर दयाळ शर्मा | 26 Dec.1999 | कर्म भूमी |
| 15. | पी. व्हि. नरसिंहराव | 23 December 2004 | स्मृति स्थळ |

## उ. भारतातील राज्ये व तेथील नृत्यपरंपरा

| अ.क्र. | महत्वपूर्ण बाबी | | स्थळ |
|---|---|---|---|
| 1. | ओरिसा | - | ओडिसी |
| 2. | कर्नाटक | - | यक्षगान |
| 3. | केरळ | - | मोहिनीअट्टम |
| 4. | उत्तर प्रदेश | - | कथक |
| 5. | आंध्रप्रदेश | - | कुचिपुडी |
| 6. | पंजाब | - | भांगडा |
| 7. | राजस्थान | - | दांडिया |
| 8. | महाराष्ट्र | - | लावणी नृत्य |
| 9. | तामिळनाडू | - | भरतनाट्यम |
| 10. | गुजरात | - | गरबा |
| 11. | मणिपूर | - | मणिपुरी |

## **ऊ. भारतातील काही महत्वपूर्ण बाबी** :

| **अ.क्र** | **महत्वपूर्ण बाबी** | **स्थळ** |
|---|---|---|
| 1. | भारतातील सर्वांत उंच धबधबा | गिरसप्पा (जोग) धबधबा,<br>कर्नाटक |
| 2. | सर्वात उंच पुतळा | गोमटेश्वर (श्रवणबेळगोळ, कर्नाटक) |
| 3. | सर्वात उंच दरवाजा | बुलंद दरवाजा (फत्तेपूर सिक्री उत्तर प्रदेश) |
| 4. | सर्वात उंच पर्वतशिखर | K 2 गॉडविन ऑस्टिन (८६११ मीटर) |
| 5. | सर्वात उंच धरण | भाक्रा (सतलज नदीवर पंजाब) |
| 6. | सर्वांत उंच मिनार | कुतुब मिनार (दिल्ली ) |
| 7. | सर्वाधिक उंचीवरील रेल्वे स्टेशन | धूम , दार्जिलिंग (प. बंगाल) |
| 8. | सर्वाधिक उंचीवरील विमानतळ | लेह विमानतळ (लडाख, जम्मू काश्मीर) |
| 9. | भारतातील सर्वात लांब धरण | हिराकुड (महानदी ओरिसा) |
| 10. | भारतातील सर्वात लांब नदी | गंगा |

# संदर्भग्रंथ सूची


1. Government of India, Census of India 1961, Vol. X. Part VII-B, Fairs and Festivals in Maharashtra, Delhi, 1969.

2. Dr. Pran Nath Seth (2011), Successful Tourism Management Fundamental of Tourism, Sterling Publishers Private Ltd, Vol. 5, New Delhi

2. Patil P. B. (2006), Tourism Development: Problems and Prospects, Current Publications, Agra.

3. Neil Thompson (2011), Regional Tourism, Discovery Publishing House Pvt. Ltd

4. Bhatia, A.K. (2020), Tourism Development: Principles and Practice. Fourth Edition, Sterling Publishers, New Delhi

5. Jayapalan. (2001), An Introduction to Tourism, Atlantic Publishers, New Delhi.

6. Sinha, P.C.(1998), Tourism Management, Anmol Publications, New Delhi.

7. Pender.& Sharpley(2005), The Management of Tourism, Sage Publications.

8. Kamra.K.K. & Chand. M. (2004), Basics of Tourism: Theory, Operation and Practice, Kanishika Publishers, New Delhi.

9. Dr. G. B. Deglurkar (1974) , Temple Architecture and Sculpture of Maharashtra, Aparant Publications. Nagpur.

10. डॉ.प्रभाकर गद्रे (2002), भारतातील इतिहास प्रसिद्ध किल्ले ,श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

11. विनोद अग्रवाल (2012) भारतीय पर्यटन, अर्जुन पब्लिशिंग हाऊस ,दिल्ली

12. खतीब के.ए. (2006), पर्यटन भूगोल , मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे

13. अनुपम पांडे (2007), पर्यटन का स्वरूप, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती, दिल्ली.

14. राजेश गोयल (2011), भारतीय पर्यटन उद्योग, वंदना पब्लीकेशन, नवी दिल्ली.

15. ढेरे, रा. चिं`.(1976), "जोतिबा : शोध आणि बोध ", नवभारत, वर्ष 29, अंक चौथा, वाई.

# लेखक परिचय

## डॉ. एस. आर. कट्टीमनी



[एम.ए., बी.एड., नेट, सेट व पी.एच.डी. (इतिहास विषयातून),
एम.बी.ए. (मार्केटिंग व ह्युमन रिसोर्स), एम.ए. इंग्रजी.,
BJMS, DSM]

जन्म 13 जानेवारी, 1985 माळकवठे, तालुका - दक्षिण सोलापूर.

1. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये तेरा वर्षे अध्यापनाचा अनुभव.

2. सध्या विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे इतिहासविभाग प्रमुख म्हणून कार्यरत.

3. विवेकानंद कॉलेज कोल्हापूर हे स्वायत्त कॉलेज असून येथे आर्ट्स फॅकल्टीचे डीन (अधिष्ठाता), NIRF नोडल अधिकारी व NAAC Coordinator, NEP Coordinator, इतिहास Bos Chairman म्हणून ते कार्यरत आहेत.

4. तीन आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांचे व आठ राष्ट्रीय चर्चासत्रांचे यशस्वी आयोजन.

5. 'प्राचीन भारत का संक्षिप्त इतिहास' ह्या संदर्भ ग्रंथाचे हिंदी मधून लेखन.

6. 'आधुनिक महाराष्ट्रातील समाज सुधारणा व समाजसुधारक' या संदर्भ ग्रंथाचे मराठीतून लेखन .

7. 'आधुनिक भारताचा इतिहास' या संदर्भ ग्रंथाचे मराठीतून लेखन .

8. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून शोधनिबंधाचे प्रकाशन.

9. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामधून शोध निबंधांचे वाचन.

10. विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त) येथील इतिहास अभ्यासमंडळाचे अध्यक्ष म्हणून योगदान.

11. महावीर कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त) व कमला कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त) येथील इतिहास अभ्यासमंडळामध्ये सदस्य म्हणून योगदान.

12. 'सिद्धार्थ रिसर्च ॲनालिसिस व ईव्हॅल्युएशन' या आंतरराष्ट्रीय जर्नलचे चार वर्ष प्रमुख संपादक म्हणून कार्याचा अनुभव.

13. विद्यापीठ स्तरावरील अनेक महाविद्यालयांमध्ये इतिहास विषयावरील व्याख्यानाचा अनुभव.

14.शिवाजी विद्यापीठातील इतिहास विषयाचे पीएचडी Research Guide म्हणून मान्यता. तीन विद्यार्थी पीएच.डी. साठी व एक एम.फिल. साठी मार्गदर्शन घेत आहेत .

# ऐतिहासिक पर्यटन

(UPSC, MPSC, NET, SET व इतर स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त ई- संदर्भ ग्रंथ )




## डॉ. एस. आर. कट्टीमनी

[एम.ए., बी.एड., नेट, सेट, पीएच.डी.(इतिहास), बी.जे.एम.एस., एम.बी.ए.,

एम.ए.(इंग्रजी), डी.एस.एम.(डिप्लोमा इन स्कूल मॅनेजमेंट)]

इतिहास विभाग प्रमुख

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)



सिद्धार्थ प्रकाशन, कोल्हापूर ...

9 789359 802930